❖ संस्थापक : कै. वसंत काणे ❖ नोंदणी क्रमांक : १६६३/१९५७ ❖ पुणे आवृत्ती | शुक्रवार, दि. २१ ऑगस्ट २०२६ | ❖ पाने : ८ ❖ अंक : २३६ ❖ Gmail : news.sandhya@gmail.com ❖ किंमत : ७ रूपये

www.dainikesandhya.com | Epaper - www.sandhyaepaper.com | www.youtube.com/@sandhyalivenews

७० वर्ष
निर्भीड पत्रकारीतेची

# दैनिक संध्या

नि:पक्ष समीक्षणाचे....निर्भीड दैनिक

क्युआर स्कॅन करून
दै. संध्याच्या
यूट्युब चॅनलला सबस्क्राईब करा
SUBSCRIBE
www.sandhyaepaper.com

**संध्या प्रहार**




# सुटे तेल विक्रीवर पूर्णपणे बंदी

## तुकाराम मुंढेंचा मोठा निर्णय : नियम मोडणाऱ्यांवर होणार कठोर कारवाई

■ मुंबई (दै. संध्या)

दूध आणि अन्य अन्नपदार्थांमधील भेसळीविरोधात कारवाई केल्यानंतर FDA आयुक्त तुकाराम मुंढे यांनी आता खाद्यतेल विक्रीवर लक्ष केंद्रित केले आहे. भेसळ, निकृष्ट दर्जाचे तेल आणि ग्राहकांची दिशाभूल करणाऱ्या प्रकारांना आळा घालण्यासाठी राज्यात सुटे खाद्यतेल विक्रीवर पूर्णपणे बंदी घालण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. आजपासून या निर्णयाची अंमलबजावणी होणार असून, राज्यातील कोणत्याही दुकानदाराला सुटे खाद्यतेल विकता येणार नाही. नियमांचे उल्लंघन करून सुट्टे तेल विक्री सुरू ठेवल्यास संबंधित विक्रेत्यांवर FDAकडून कठोर कारवाई केली जाणार आहे. त्यामुळे खाद्यतेल विक्रेत्यांसाठी हा निर्णय महत्त्वाचा ठरणार असून, ग्राहकांना सुरक्षित आणि दर्जेदार खाद्यतेल मिळण्याचा मार्ग अधिक सुकर होणार आहे.

अन्न व औषध प्रशासनाने खाद्यतेल विक्रीसंदर्भात एक नवा 'अंमलबजावणी आदेश' जारी केला आहे. या नव्या आदेशानुसार, आजपासून संपूर्ण महाराष्ट्रात सुट्या तेलाच्या विक्रीवर बंदी घालण्यात आली आहे. पॅकिंग नसलेले किंवा उघड्यावर मिळणारे सुट्टे तेल आरोग्यासाठी अपायकारक ठरू शकते आणि त्यात भेसळीची



शक्यता सर्वाधिक असते. त्यामुळे जनआरोग्याच्या हितासाठी हा मोठा निर्णय घेण्यात आला आहे.

या निर्णयाची काटेकोर अंमलबजावणी केली जाणार असल्याचे प्रशासनाने स्पष्ट केले आहे. त्यामुळे यापुढे राज्यभरातील कोणत्याही दुकानदाराला ग्राहकांना सुट्टे तेल विकता येणार नाही. या आदेशाचे उल्लंघन करून जर कोणी दुकानदार सुट्टे तेल विकताना आढळला, तर त्याच्यावर थेट आणि कठोर कायदेशीर कारवाई केली जाईल, असा इशारा तुकाराम मुंढे यांनी दिला आहे. एफडीएच्या या निर्णयामुळे खाद्यतेलातील भेसळीला मोठा आळा बसेल आणि ग्राहकांना दर्जेदार व सुरक्षित तेल मिळण्याचा मार्ग मोकळा होईल, असा विश्वास व्यक्त केला जात आहे. भेसळखोर आणि नियमांचे उल्लंघन करणाऱ्या व्यापाऱ्यांचे मात्र या निर्णयामुळे धाबे दणाणले आहेत. तुकाराम मुंढे यांनी मागील वर्षभरात केलेल्या कारवाईची धक्कादायक आकडेवारी समोर ठेवली आहे. त्यांनी दिलेल्या माहितीनुसार, "गेल्या वर्षी आम्ही राज्यभरातून खाद्यतेलाचे एकूण १,२४७ नमुने तपासणीसाठी घेतले होते. यापैकी १,१४२ नमुने प्रमाणित आढळले.

### दुकानदारांवर कठोर कारवाई

नागरिकांच्या आरोग्याला सर्वोच्च प्राधान्य देत मुंढे यांनी नव्या नियमांची गरज स्पष्ट केली. "ही नवी 'कम्प्लायन्स ऑर्डर' (अंमलबजावणी आदेश) म्हणजे याच दिशेने टाकलेले पुढचे आणि अत्यंत कडक पाऊल आहे. लोकांना मिळणारे खाद्यतेल हे चुकीच्या ब्रँडिंगचे, असुरक्षित किंवा निकृष्ट दर्जाचे नसावे; ते पूर्णपणे सुरक्षित असावे, यासाठी या नियमांची कठोर अंमलबजावणी करणे गरजेचे झाले आहे," असेही आयुक्त तुकाराम मुंढे यांनी स्पष्ट केले.

# शिवसेना पक्ष-चिन्ह, अपात्रता खटला

## पक्षांतराचे फायदे ते आजही उपभोगत आहेत; त्यांना थेट अपात्र ठरवा

### देवदत्त कामत यांचा सुप्रीम कोर्टात जोरदार युक्तिवाद

■ नवी दिल्ली (दै. संध्या)

शिवसेना पक्ष-चिन्ह आणि आमदार अपात्रता प्रकरणाची सर्वोच्च न्यायालयातील आजची सुनावणी संपली आहे. आजच्या सुनावणीत ठाकरे गटाच्या वतीने ज्येष्ठ वकील देवदत्त कामत यांनी आमदारांच्या अपात्रतेच्या मुद्द्यावर अत्यंत आक्रमक आणि कायदेशीर दाखल्यांसह युक्तिवाद केला. कामत यांनी सर्वोच्च न्यायालयाला विनंती केली की, विधानसभा अध्यक्षांचा निर्णय चुकीचा ठरवत न्यायालयाने स्वतः एकनाथ शिंदे आणि त्यांच्या आमदारांना बंडखोरीच्या मूळ तारखेपासून अपात्र घोषित करावे. सरन्यायाधीश सूर्यकांत, न्यायमूर्ती जॉयमाल्या बागची आणि न्यायमूर्ती जे. व्ही. मोहना यांच्या खंडपीठासमोर सलग ७ व्या दिवशी या प्रकरणाची सुनावणी पार पडली. ॲड. कामत यांनी युक्तिवाद केला की, "एखादा आमदार अपात्र ठरला की त्याचे सदस्यत्व संपुष्टात येते. या खटल्यात एका विशिष्ट वेळेत सुनावणी पूर्ण होऊ न शकल्यामुळे शिंदे गटाने या पक्षांतराचा फायदा उपभोगला आहे. एवढेच नाही तर, निवडणूक आयोगाने केवळ 'विधिमंडळ बहुमताच्या' आधारावर त्यांना चिन्ह दिल्यामुळे आजही ते बंडखोरीचे आणि पक्षांतराचे फायदे उपभोगत आहेत." खंडपीठाने विचारले की, "कशातून अपात्र ठरवावे?" यावर कामत म्हणाले, "ज्या दिवशी पक्षांतराचे कृत्य घडले, त्याच मूळ तारखेपासून त्यांचे सदस्यत्व संपुष्टात आल्याची कायदेशीर घोषणा सर्वोच्च न्यायालयाने करावी, एवढीच माझी मागणी आहे. आता कदाचित त्याचे परिणाम पूर्ववत अमलात आणणे शक्य नसले, तरीही ते केव्हा अपात्र ठरले होते, हे न्यायालय नक्कीच घोषित करू शकते." खंडपीठाने विचारले की, संबंधित पक्ष आणि अध्यक्षांना त्यांची बाजू मांडण्याची संधी द्यावी लागेल. यावर कामत यांनी 'सुभाष देसाई' खटल्याची आठवण करून देत सांगितले, "आम्ही त्यावेळीही हीच मागणी केली होती की सर्वोच्च न्यायालयाने स्वतः निर्णय घ्यावा, कारण अध्यक्षांवर आमचा विश्वास नव्हता. त्यांनी निकाल देण्यासाठी महिनोनमहिने लावले. आज सर्व पक्ष न्यायालयात उपस्थित आहेत. सर्वोच्च न्यायालय त्यांचा बचाव ऐकून घेऊन थेट निर्णय देऊ शकते."

## थोडक्यात...

### शिक्षिकेने मारले, मांडीवर कोसळून मुलाचा मृत्यू

**विशाखापट्टणम : दैनिक संध्या**

विशाखापट्टणममध्ये गुरुवारी शिक्षिकेने मारहाण केल्यामुळे एका सहा वर्षांच्या मुलाचा मृत्यू झाला. मारहाणीनंतर लगेचच तो मुलगा शिक्षिकेच्या मांडीवर कोसळल्याचे सीसीटीव्ही फुटेजमध्ये दिसत आहे. मारहाणीच्या धक्क्यामुळे मुलाला हृदयविकाराचा झटका आला, असा आरोप त्याच्या कुटुंबीयांनी केला आहे. ही संपूर्ण घटना वर्गातील सीसीटीव्ही कॅमेऱ्यात कैद झाली आहे. फुटेजमध्ये शिक्षिका त्या मुलाचे कपडे काढण्याचा प्रयत्न करताना आणि त्याला दोनदा थप्पड मारताना दिसत आहेत. मिळालेल्या माहितीनुसार, मृत मुलाचे नाव प्रणय तेजा होते आणि तो 'लिटल गार्डन्स स्कूल'मध्ये यूकेजी वर्गात शिकत होता. शिक्षिकेच्या मांडीवर कोसळल्यानंतर त्याला तातडीने 'किंग जॉर्ज हॉस्पिटल'मध्ये नेण्यात आले, मात्र तिथे डॉक्टरांनी त्याला मृत घोषित केले.

### जंतर-मंतर : SCकडून चौकशी समिती स्थापन

**नवी दिल्ली : दैनिक संध्या**


सर्वोच्च न्यायालयाने जंतर मंतर येथे कॉकरोच जनता पार्टीच्या आंदोलकांवर बळाचा वापर केल्याच्या आरोपांची चौकशी करण्यासाठी पाच सदस्यीय उच्चाधिकार समिती स्थापन केली आहे. या समितीचे अध्यक्षस्थान सर्वोच्च न्यायालयाचे माजी न्यायमूर्ती आर. सुभाष रेड्डी भूषवतील. इतर सदस्यांमध्ये पंजाब-हरियाणा उच्च न्यायालयाचे माजी मुख्य न्यायमूर्ती रवी शंकर झा, दिल्ली उच्च न्यायालयाच्या माजी न्यायमूर्ती शालिंदर कौर, सीबीआयचे माजी संचालक ऋषी कुमार शुक्ला आणि मेघालयचे निवृत्त डीजीपी डॉ. एलआर बिश्नोई यांचा समावेश आहे. ही समिती पॅलेट गन, इलेक्ट्रिक लाठ्या, लाठीमार आणि अश्रुधुराच्या अतिवापराची चौकशी करेल. तसेच, महिला आंदोलकांविरुद्ध कथित हिंसाचार, पोलिसांचे पाळत ठेवणे, जमाव नियंत्रण पद्धती, जखमींवर उपचार आणि पीडितांना नुकसानभरपाईशी संबंधित प्रकरणांचीही चौकशी करेल. ही समिती त्या आरोपांची चौकशी करेल, ज्यात आंदोलकांवर पोलीस, निमलष्करी दल आणि इतर सुरक्षा कर्मचाऱ्यांनी बळाचा वापर केल्याचे आरोप लावण्यात आले होते.

### काँग्रेस नेते सज्जन कुमार यांचे तिहारमध्ये निधन

**नवी दिल्ली : दैनिक संध्या**

काँग्रेसचे माजी खासदार आणि नेते सज्जन कुमार यांचे गुरुवारी वयाच्या 80 व्या वर्षी निधन झाले आहे. न्यूज एजन्सी एएनआयच्या सूत्रांनुसार, सज्जन कुमार यांना दिल्लीतील सफदरजंग रुग्णालयात मृत अवस्थेत आणण्यात आले होते. ते 1984 च्या शीखविरोधी दंगलीतील तीनपैकी दोन प्रकरणांमध्ये दोषी ठरल्यानंतर तिहार तुरुंगात जन्मठेपेची शिक्षा भोगत होते. त्यांना एका प्रकरणात निर्दोष मुक्त करण्यात आले होते. सज्जन कुमार यांचा जन्म 23 सप्टेंबर 1945 रोजी दिल्लीत झाला होता. ते मॅट्रिकपर्यंत शिकले होते. त्यांचे लग्न राम कौर यांच्याशी झाले होते. त्यांना एक मुलगा आणि दोन मुली आहेत. त्यांनी 1977 मध्ये दिल्ली महानगरपालिका नगरसेवक म्हणून राजकारणात प्रवेश केला. नंतर ते दिल्ली प्रदेश काँग्रेसचे सरचिटणीस बनले. 1980 मध्ये ते पहिल्यांदा बाह्य दिल्लीतून खासदार म्हणून निवडून आले.

# तानंग फाट्याजवळ कंटेनरमध्ये दीड कोटींचा गांजा जप्त, ओडीसातून तस्करी



■ सांगली (दै. संध्या)

ओडीसा राज्यातून तस्करी करून आणलेला तब्बल दीड कोटी रूपयांचा गांजा असलेला कंटेनर पुण्याकडे जाण्यापूर्वी मिरज-पंढरपूर महामार्गावरील तानंग फाट्यावर स्थानिक गुन्हे अन्वेषणच्या पथकाने पकडला. संशयित मंगेश प्रकाश मोरे (वय ४६, रा. बोरजाईवाडी, ता. कोरेगाव, जि. सातारा) याला अटक करून दीड कोटींचा ३०० किलो गांजा आणि कंटेनर असा पावणे दोन कोटींचा मुद्देमाल जप्त केला. अमली पदार्थाची तस्करी व विक्री रोखण्यासाठी पोलिस अधीक्षक तुषार दोशी यांनी यापूर्वीच स्थानिक गुन्हे अन्वेषणच्या पथकाला सूचना दिल्या आहेत. त्यानुसार निरीक्षक संजीव झाडे यांनी सहायक निरीक्षक प्रशांत निशाणदार यांचे पथक कार्यरत केले आहे. या पथकाला संशयित मंगेश मोरे हा कंटेनर (एनएए ०१ एडी ९३६६) मधून मिरज ते पंढरपूर रस्त्याने गांजाची तस्करी करणार असल्याची माहिती गुरूवारी मिळाली. त्यानुसार पथकाने मिरज-पंढरपूर महामार्गावरील तानंग फाटा ते मालगाव जाणाऱ्या रस्त्यावर सापळा रचला. फाट्यावर कंटेनर अडवून मोरे याला ताब्यात घेतले. त्याच्या कंटेनरमधील चालकाच्या केबीनमधील कप्प्याची झडती घेतल्यानंतर २ किलो वजनाचे खाकी रंगाच्या चिकटपट्टीने गुंडाळलेले गांजाचे १५० पॅकेट आढळून आले. पथकाने पंचाच्या समक्ष पडताळणी केल्यानंतर हिरवट काळपट रंगाचा फुलबोंडे असलेला तयार गांजा असल्याचे स्पष्ट झाले.

# २८ तारखेपर्यंत ठोस निर्णय घ्या : मनोज जरांगे-पाटील

### ‘बावनकुळे, शिरसाठ यांच्या माध्यमातून षडयंत्र’

■ वडीगोद्री (दै. संध्या)

मराठा आरक्षणाच्या प्रश्नावरून राज्यातील वातावरण पुन्हा तापण्याची चिन्हे दिसत असून, मराठा आंदोलनाचे नेते मनोज जरांगे पाटील यांनी सरकारला २९ ऑगस्टची अंतिम मुदत देत अंतरवाली सराटी येथे मोठे आंदोलन उभारण्याचा इशारा दिला आहे. मराठा समाजाला आतापर्यंत सरकारने केवळ आश्वासने आणि ‘चॉकलेट’ दिले; मात्र आरक्षणाच्या प्रश्नावर अद्याप ठोस निर्णय झालेला नाही, असा आरोप मराठा आरक्षण आंदोलनाचे नेते मनोज जरांगे पाटील यांनी केला. अंतरवाली सराटी येथे गुरुवारी सायंकाळी माध्यमांशी बोलताना जरांगे पाटील म्हणाले की, मराठा समाज आता आरक्षणाच्या प्रश्नावर शेवटच्या टप्प्यावर येऊन ठेपला आहे. गोरगरीब मराठा समाजासाठी आपण पुन्हा एकदा आंदोलन उभे करणार असून, हे आपले शेवटचे आंदोलन असेल, असा इशाराही त्यांनी दिला. मराठा समाजाला देण्यात आलेल्या कुणबी प्रमाणपत्रांच्या मुद्द्यावरूनही जरांगे पाटील यांनी सरकारवर जोरदार टीका केली. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या सरकारने कुणबी प्रमाणपत्रे देण्याची प्रक्रिया सुरू केली; मात्र आता काही प्रमाणपत्रे रद्द



करण्याची कारवाई सुरू असल्याचा आरोप त्यांनी केला. गोरगरीब समाजाच्या परिस्थितीची जाणीव सरकारला असायला हवी होती. प्रमाणपत्रे रद्द करण्याची कारवाई सुरू केल्यास त्याचे परिणाम सरकारला भोगावे लागतील, असा इशारा त्यांनी दिला. ‘सरकारला २८ ऑगस्टपर्यंत ठोस निर्णय घेण्याची संधी आहे.

या मुदतीत निर्णय झाला नाही, तर २९ ऑगस्टचे आंदोलन निश्चित आहे. त्यानंतरचे आंदोलन सरकारला झेपणार नाही,’ असा इशारा जरांगे पाटील यांनी दिला. कुणबी प्रमाणपत्रांच्या मुद्द्यावरून त्यांनी महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे आणि मंत्री संजय शिरसाठ यांच्यावरही निशाणा साधला. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी बावनकुळे व शिरसाठ यांच्या माध्यमातून कुणबी प्रमाणपत्रांच्या बाबतीत षडयंत्र रचल्याचा आरोप जरांगे पाटील यांनी केला. प्रमाणपत्रे रद्द करण्याची कारवाई योग्य आहे का, असा सवालही त्यांनी उपस्थित केला.

### ‘सरकारविरोधात खदखद’

राज्यातील विविध घटकांमध्ये सरकारविरोधात नाराजी असल्याचा दावाही जरांगे पाटील यांनी केला. शेतकरी, मुस्लिम, दलित, आदिवासी, ओबीसी यांच्यासह कोणताही घटक सध्या सुखी नसल्याचे ते म्हणाले. विविध प्रश्नांमुळे नागरिकांमध्ये प्रचंड नाराजी असून, या नाराजीचा उद्रेक होण्यापूर्वी सरकारने ठोस निर्णय घेणे आवश्यक आहे, असे त्यांनी सांगितले. ‘सरकारला आता ठिकाणावर आणण्यासाठी २९ ऑगस्ट निश्चित आहे. त्या दिवशी सरकारला जनतेची ताकद काय असते, हे कळेल,’ असा इशाराही जरांगे पाटील यांनी दिला. दरम्यान, २९ ऑगस्टच्या आंदोलनाच्या पार्श्वभूमीवर अंतरवाली सराटी येथे मराठा समाजाच्या कार्यकर्त्यांकडून तयारी सुरू झाली असून, सरकार या मुद्द्यावर कोणता निर्णय घेते, याकडे राज्याचे लक्ष लागले आहे.

# मेडिकल- मेयोमधील कामांची मुख्यमंत्र्यांकडून पाहणी

### सर्पदंश पीडित बालिकेच्या प्रकृतीची चौकशी



■ नागपूर (दै. संध्या)

शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालय (मेडिकल) तसेच इंदिरा गांधी शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालय (मेयो) येथे सुरू असलेल्या विविध विकास कामांची तसेच वैद्यकीय सुविधांची मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी आज पाहणी करून समाधान व्यक्त केले. त्याचप्रमाणे गडचिरोली जिल्ह्यातील जपतलाई येथील सर्पदंश पीडित बालिकेच्या प्रकृतीचीही मुख्यमंत्र्यांनी चौकशी केली.

नागपुरातील मेडिकल आणि मेयो या दोन मोठ्या शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालयांना विविध विकास कामांसाठी राज्य शासनाने मोठ्या प्रमाणात निधी उपलब्ध करून दिला आहे. या कामांची प्रगती पाहण्यासाठी मुख्यमंत्री श्री. फडणवीस यांनी येथे भेट दिली. रुग्ण तसेच रुग्णांचे नातेवाईक यांच्याही दृष्टीने या दोन्ही रुग्णालयांमध्ये विविध सुविधा उपलब्ध करण्यात येत आहेत तसेच अत्याधुनिक वैद्यकीय सुविधांची निर्मिती या ठिकाणी केली जात आहे. मेडिकलमध्ये एनआयसी, पीआयसीयू येथे भेट देऊन पीआयसीयूमधील व्हेंटिलेटर युनिटचे लोकार्पण यावेळी मुख्यमंत्री श्री. फडणवीस यांच्या हस्ते करण्यात आले. त्याचप्रमाणे शस्त्रक्रियागृह, सर्जिकल आयसीयु येथेही मुख्यमंत्र्यांनी पाहणी करून कामाचा वेग वाढविण्याच्या सूचना केल्या.

अधिष्ठाता डॉ. राज गजभिये यांनी सुरू असलेल्या कामांची माहिती मुख्यमंत्र्यांना दिली. गडचिरोली जिल्ह्यातील धानोरा तालुक्यातील जपतलाई येथील आदिवासी आश्रम शाळेतील सर्पदंश होण्याची घटना नुकतीच घडली होती. या घटनेतील एक विद्यार्थिनी नागपूरला मेडिकल रुग्णालयात दाखल आहे. मुख्यमंत्री श्री. फडणवीस यांनी आज या विद्यार्थिनीची भेट घेऊन तिच्या आईशी संवाद साधला. त्याचप्रमाणे या बालिकेच्या प्रकृतीची योग्य काळजी घेण्याच्या सूचना त्यांनी डॉक्टरांना दिल्या. उपअधिष्ठाता डॉ. देवेंद्र माहोरे, वैद्यकीय अधीक्षक डॉ. अविनाश गावंडे, आ. मोहन मते, नगरसेवक रितेश गावंडे यावेळी उपस्थित होते.

मेडिकलनंतर मुख्यमंत्री श्री. फडणवीस इंदिरा गांधी शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालयात गेले. येथेही सध्या मोठ्या प्रमाणात विकास कामे सुरू आहेत. अधिष्ठाता डॉ. रवी चव्हाण यांनी त्यांचे स्वागत केले. या रुग्णालयात मेडिकल ब्लॉक, सर्जिकल ब्लॉक, शस्त्रक्रियागृह यांची पाहणी करून त्यांनी अधिकाऱ्यांशी संवाद साधला. झालेल्या कामांविषयी समाधान व्यक्त करतानाच कामाचा वेग वाढवा, अशी सूचनाही मुख्यमंत्र्यांनी यावेळी केली. महानगरपालिका आयुक्त डॉ. विपीन इटनकर, जिल्हाधिकारी कुमार आशीर्वाद यावेळी उपस्थित होते.

### अंबाझरी तलावाची केली पाहणी जलपर्णी निर्मूलन मोहिमेचे केले कौतुक



नागपूरचे वैभव म्हणून अंबाझरी तलावाकडे पाहिले जाते. पाण्याची व्यवस्था नव्हती तेव्हा नागनदीवरील धरण किंवा साठवण तलाव म्हणून याकडे पाहिले जायचे. अनेक वर्ष या तलावाने पिण्याचे पाणी नागपूर शहराला दिले. मध्यंतरी जलपर्णीने हा तलाव व्यापला होता. मात्र, महानगरपालिकेने जलपर्णी नामशेष करण्यासाठी प्रयत्न केले व ते अत्यंत यशस्वी झाले आहेत. एक उत्तम पर्यटनस्थळ म्हणून हा तलाव विकसित करण्यासाठी राज्य शासन महानगरपालिकेला संपूर्ण सहकार्य करणार असल्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी सांगितले. नागपूरची ओळख असलेल्या ऐतिहासिक अंबाझरी तलावाचे सौंदर्य आणि पर्यावरणीय महत्त्व जपण्यासाठी नागपूर महानगरपालिकेने राबविलेल्या जलपर्णी निर्मूलन मोहिमेची मुख्यमंत्री फडणवीस यांनी आज पाहणी केली. तलाव जलपर्णीमुक्त करण्यासाठी मनपाने केलेल्या प्रयत्नांचे कौतुक करत मुख्यमंत्र्यांनी स्वतः नौकेतून अंबाझरी तलावाची पाहणी केली. यावेळी महापौर नीता ठाकरे, उपमहापौर लीला हाथीबेड, स्थायी समिती सभापती शिवानी दाणी-वखरे, सत्ता पक्षनेते नरेंद्र (बाल्या) बोरकर, मनपा आयुक्त डॉ. विपीन इटनकर, माजी महापौर दयाशंकर तिवारी, विविध समित्यांचे सभापती, नगरसेवक-नगरसेविका यांच्यासह मनपाचे वरिष्ठ अधिकारी उपस्थित होते.

# बॅज तीन महिन्यांसाठी निलंबित : सरनाईक

■ मुंबई (दै. संध्या)

महाराष्ट्रात व्यावसायिक प्रवासी वाहने चालविणाऱ्या चालकांना प्रवाशांशी सुसंवाद साधता यावा, यासाठी व्यावहारिक मराठी भाषेचे ज्ञान अनिवार्य करण्यात आले आहे. या नियमाच्या अंमलबजावणीसाठी राज्यभर तपासणी मोहीम सुरू करण्यात आली आहे. ज्या चालकांना व्यावहारिक मराठीचे ज्ञान नसल्याचे तपासणीत आढळेल, त्यांना नोटीस बजावून एक महिन्याच्या कालावधीत मराठी भाषा शिकणे बंधनकारक करण्यात येत आहे. या मुदतीत मराठी भाषेचे ज्ञान आत्मसात न केल्यास संबंधित चालकाचा बॅज तीन महिन्यांसाठी निलंबित करण्यात येईल, अशी माहिती परिवहन मंत्री प्रताप सरनाईक यांनी दिली. मुंबई महानगर क्षेत्रात झालेल्या तपासणीत ३ हजार ९९५ वाहनचालकांची तपासणी करण्यात आली. त्यापैकी ६०४ चालकांना व्यवहारिक मराठीचे पुरेसे ज्ञान नसल्याचे आढळून आले असून, या सर्वांना नोटिसा बजावण्यात आल्या आहेत. राज्यातील उर्वरित आकडेवारीनुसार आतापर्यंत ४ हजार २२२ चालकांची तपासणी करण्यात आली असून, त्यापैकी ६६४ चालकांना नोटिसा देण्यात आल्या आहेत. “महाराष्ट्रात व्यवसाय करून प्रवाशांशी थेट संवाद साधणाऱ्या व्यावसायिक वाहनचालकांना व्यवहारिक मराठी येणे ही केवळ नियमांची बाब नाही, तर प्रवाशांच्या सोयी-सुरक्षेशी संबंधित बाब आहे. चालकांना मराठी शिकण्यासाठी पुरेसा कालावधी दिला जात आहे. मात्र, दिलेल्या मुदतीनंतरही नियमाचे पालन न करणाऱ्यांवर कठोर कारवाई केली जाईल,” असे मंत्री सरनाईक यांनी सांगितले.

## संपादकीय

# दु:खात सुचती मार्ग सुखाचे...

मेळघाट, गडचिरोलीसारखा निसर्गदत्त श्रीमंत भाग विदर्भाच्या भाळी आला. त्यातून कुठे वैभवाचे लेणे लाभले, तर कुठे अभावाचे अभागी जगणे. दुर्गम भाग, जिथे सुविधा पोहोचल्या नाही, तिथे यंत्रणांचे दुर्लक्ष झाले हे वास्तव आहे. वास्तव हेसुद्धा आहे की तेथील लोक रडत बसले नाहीत. जे समोर वाढून ठेवले आहे, त्याच्याशी लढत परिस्थितीला सामोरे गेले. जपतलाईच्या आश्रमशाळेत सहा मुलींना साप चावला. त्यातील तीन मृत्युमुखी पडल्या. एकीला उपचारांसाठी हेलिकॉप्टरने नागपुरात आणले. शर्थीच्या प्रयत्नांनी ती बचावली. मृत्यूच्या दारातून आत बघून मोठ्या हिमतीने परत आलेली मुलगी जेव्हा बरी होऊन तिच्या गावाकडे जायला निघाली, तेव्हा तिला घेऊन जाणारी बस खराब रस्त्यांमुळे चिखलात रुतून बसली. तिला धक्के देऊन चिखलातून काढावे लागले. या बातम्या वाचून अनेक जण हळहळले. काहींना संताप आला असेल; पण या बिकट परिस्थितीवर मात कशी करावी हे कुणालाही सुचले नसेल; कारण त्यांच्या दु:खाची, संतापाची तीव्रता तेवढी नसावी; जेवढी तुळशीराम गेडाम यांची होती.

तुळशीराम गेडाम हे महाराष्ट्र आणि तेलंगण सीमेवरील घोडनकप्पी या दुर्गम गावाचे रहिवासी. त्यांची पत्नी गर्भवती होती. ते दोघे नव्या जिवाच्या आगमनाची स्वप्ने बघत होते. अचानक पत्नीची प्रकृती बिघडली. त्यांनी रुग्णवाहिका बोलावली. मात्र, रस्ते खराब असल्याने ती वेळेवर पोहोचू शकली नाही. त्यांच्या गर्भवती पत्नीचा आणि तिच्या पोटातील बाळाचा मृत्यू झाला. कोणतीही व्यक्ती अशा घटनेने चिडून जाईल, मोडून जाईल. तुळशीरामांना दु:ख झाले; पण ते चिडले नाहीत आणि मोडलेही नाहीत. त्यांच्या दु:खातून एका ध्येयाने जन्म घेतला. आपली पत्नी ज्या परिस्थितीला बळी पडली, ही परिस्थिती इतर कुणाच्या वाट्याला येऊ नये, अन्य कुण्या मातेचे



बाळ अकाली जाऊ नये, पित्याच्या डोळ्यांत आसू येऊ नयेत म्हणून त्यांनी हातात कुदळ-फावडे घेतले आणि रस्ता बनवायच्या कामी लागले. हळूहळू गावकरी त्यांच्या सोबत जुळले. वीस गावकऱ्यांच्या मदतीने त्यांनी काही दिवसांतच दीड किलोमीटरचा रस्ता बनवला. आता त्या रस्त्यावरून वाहने भरधाव पळू शकतात. ना कुणाकडे अर्ज केला, ना कुणाला निवेदन दिले. ना शासनाच्या मदतीची अपेक्षा बाळगली, ना सहानुभूतीची अपेक्षा. मनगटाच्या जोरावर बदल करून दाखविला. वाशीम जिल्ह्यातील कळंबेश्वर गावात यापेक्षा काय वेगळे घडले होते! काही वर्षांपूर्वी गजानन ताजणे या कष्टकरी व्यक्तीची पत्नी संगीता, भर उन्हाळ्यात पाणी भरण्यासाठी हंडा घेऊन शेजारच्या विहिरीवर गेली. 'मलेच नाही पुरत तं तुले काय देऊ' म्हणत त्याने तिला पाणी तर भरू दिलेच नाही; उलट वाईट शब्दांची लाखोली वाहिली. ती रडतच घरी आली. तिच्या अश्रूंनी कमाल केली. ताजणेंच्या मनात ऊर्मी जागवली. त्यांनी कडकत्या उन्हात फावडे-कुदळ हाती घेतले आणि विहीर खोदण्यास प्रारंभ केला. शेजारीपाजारी हसत होते. पंधरा-वीस फूट खोल खोदत नाही तो विहिरीला झरा लागला. पाणी आले. सलग महिनाभर घाम गाळून त्यांनी आपल्या पत्नीला पाणीदार भेट तर दिलीच; पण ज्यांच्या मनात माणुसकीचा दुष्काळ दाटला होता, त्या पाणी नाकारणाऱ्यांच्या पाषाणहृदयाला पाझर फोडला. त्यांच्या विहिरीला मुबलक पाणी आहे. ते घेऊन जाण्यास कुणालाच मनाई नाही. दशरथ मांझीने डोंगर फोडून रस्ता केला, तेव्हा त्याला 'माउंटन मॅन' म्हणून गौरवले. या दोन वैदर्भीय वीरांना काय म्हणावे? त्यांना काहीच म्हणू नये; त्यांच्या कार्यातून धडा तेवढा घ्यावा. परिस्थिती बदलण्यासाठी नेहमी सरकारचीच सोबत लागते, मोठी साधने लागतात असे नव्हे. इच्छाशक्ती प्रबळ असली की, साधी कुदळ पुरेशी ठरते. ती निर्धाराने जमिनीत खुपसली पाहिजे, निराशेची माती उकरली पाहिजे. तेव्हा बिकट वाटा, चांगल्या रस्त्याचे रूप घेतात आणि विहिरीतील दगडांना पाझर फुटतो.

## संस्कृत सुभाषित

कल्पतरू खाली । फळे येती मागितली
तेथे बैसल्याचा भाव । विचारूनी बोले ठाव ।
द्यावे ते उत्तर । येतो प्रति त्याचा फेर
तुका म्हणजे मनी । आपुल्याच लाभ हानी ।
खल: कापट्या दोषेन दूरेणैव विसृज्यते । अपाय
रांकिमिलौके विषेणाशी विषो यथा ।

## गुरु वचन

### सर्वांप्रती समान भाव असावा

एक स्वामी शारीरिक प्रकृतीने खूपच कमजोर होते. परंतु दररोज गंगास्नानाशिवायही इतरही काम ते करायचे. नदीच्या काठावर त्यांना खूप अडचण येत असे यासाठी स्नानाच्यावेळी ते ब्राह्मणाची मदत घेत होते व नंतर परतताना कोणत्याही जातीच्या व्यक्तीच्या खांद्यावर हाथ ठेऊन वरती येत होते. स्वामींच्या या वागणुकीला तेथील साधू–संत चांगले मानत नव्हते. व त्यांनाही काही म्हणू शकत नव्हते.

एकावेळी एका शिष्याने स्वामीजीला विचारले की, आपल्या गंगा स्नानाचा काय फायदा, आपण स्नान करण्यासाठी ब्राह्मण लोकांची मदत घेतात आणि परतताना इतर कोणत्याही जातीच्या व्यक्तीची. यामुळे तर स्नान केल्यानंतरही अपवित्र होते. स्वामीजी शिष्याला म्हणाले, वत्सा हा तुझा भ्रम आहे. स्नानामुळे तर केवळ माझ्या शरीराचा वरील मळ साफ होतो. शरीरातील मळ तर तसाच राहतो आणि तो मळ त्या व्यक्तीसोबत येण्याजाण्याने साफ होतो. ज्याला तू कनिष्ठ जातीचा समजतोस. स्वामीजींचे हे म्हणणे ऐकून शिष्य म्हणाला, मला काही समजले नाही. तेव्हा स्वामीजी म्हणाले, वत्सा मी मानवामानवात अंतर समजत नाही. माझ्यासाठी सर्व जाती–संप्रदाय समान आहेत. मी त्या कनिष्ठ जातींच्या लोकांना जवळ करुन संदेश देऊ इच्छित आहे आणि असे केल्यामुळे मन शुद्ध होते. दुसऱ्यापेक्षा आपण मोठे असल्याचा भाव मनात अहंकार निर्माण करतो आणि हा अहंकार मनुष्याच्या प्रगतीचा सर्वात मोठा अडथळा आहे. तोपर्यंत मनाचा अहंकार नष्ट होत नाही. तोपर्यंत मनुष्य कधीही शुद्ध होऊ शकत नाही. कोणी लहान–मोठे नसते तर केवळ मनाचा भाव आपल्याला लहान–मोठा बनवतो आणि लहान–मोठा भेदभाव नष्ट करणे हा माझा उद्देश आहे. स्वामीजीचे हे वचन ऐकून शिष्य त्यांच्या मार्गाने चालू लागला.

## दैं. 'संध्या' धमाल सूडोकु क्र. १०४६

| | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| 8 | | | 4 | 3 | 9 | | 5 | 1 |
| | 3 | 6 | | | | 4 | | 9 |
| 1 | 9 | | | | | | | |
| | 8 | | | 9 | | | | 4 |
| 2 | 1 | 9 | | | | 3 | 6 | 7 |
| 6 | | | | 1 | | | 8 | |
| | | | | | | | 7 | 6 |
| 7 | | 3 | | | | 8 | 4 | |
| 4 | 6 | | 8 | 7 | 2 | | | 3 |

### : सूडोकु :

खेळाचे नियम : प्रत्येक उभी लाइन, आडवी लाइन आणि ३–३ च्या वर्गात १ ते ९ पर्यंतची संख्या भरा. परंतु ही अट आहे की, नंबरची पुनरावृत्ति कोणत्याही उभ्या किंवा आडव्या लाइन आणि चौकानात आली नाही पाहिजे. प्रत्येक कोड्याचे केवळ एकच उत्तर आहे.या कोड्याला भरण्यासाठी आपण पेन्सिलचा आणि खोड रबराचा उपयोग केला तर ते आपल्यासाठी अधिक सुविधा जनक होईल.

– उत्तर उद्याच्या अंकात

सूडोकु क्र. १०४५ चे उत्तर

| | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| 9 | 7 | 4 | 3 | 6 | 5 | 2 | 1 | 8 |
| 8 | 3 | 5 | 1 | 7 | 2 | 9 | 6 | 4 |
| 1 | 6 | 2 | 8 | 4 | 9 | 3 | 7 | 5 |
| 6 | 4 | 1 | 7 | 8 | 3 | 5 | 2 | 9 |
| 2 | 9 | 3 | 5 | 1 | 6 | 4 | 8 | 7 |
| 7 | 5 | 8 | 2 | 9 | 4 | 1 | 3 | 6 |
| 5 | 1 | 9 | 6 | 2 | 7 | 8 | 4 | 3 |
| 3 | 2 | 6 | 4 | 5 | 8 | 7 | 9 | 1 |
| 4 | 8 | 7 | 9 | 3 | 1 | 6 | 5 | 2 |

## इतिहासात आजचा दिवस

### आंतरराष्ट्रीय

- १९२७ – न्यूयॉर्क येथे चौथी पॅन–आफ्रिकन काँग्रेसची मिटींग.
- १९८२ – पॅलेस्टाईनी अतिरेकी बेरुतमधून पसार झाले.
- १९५९ – हवाई अमेरिकेचा ५०वा राज्य बनला.
- २००६ – इजिप्तमध्ये एकाच रुळावर येऊन दोन रेल्वे समोरासमोर धडकल्याने झालेल्या अपघातात ८० जण ठार झाले.
- २००८ – स्पेनची राजधानी माद्रीदच्या विमान तळावर स्पेन एअरच्या एक प्रवाशी विमान उड्डाण करत असताना अपघातग्रस्त होऊन १५३ प्रवाशी ठार झाले.
- २००८ – पाकिस्तानात दुहेरी बॉम्बस्फोटात ७० जण ठार झाले.

### राष्ट्रीय

- १९८७ – सुनिल गावस्कर कसोटी व प्रथम श्रेणी क्रिकेटमधून निवृत्त.
- २००७ – अंबानी बंधुंचा जगातील ५० कुशल उद्योगपतींमध्ये समावेश झाला.


### जन्म

- १८७१ – गोपाळ कृष्ण देवधर,पुण्यातील 'सेवासदन' संस्थेचे संस्थापक.
- १९१० – नारायण श्रीधर बेंद्रे, भारतीयमराठी चित्रकार
- १९१५ – इस्मत चुगताई, उर्दू साहित्यिक.

### निधन

- १९७८ – विनू मांकड, भारतीय क्रिकेट खेळाडू.
- १९३१ – पंडित विष्णू दिगंबर पलुस्कर कीर्तीवंत गायक व संगीतप्रसारक.
- २००१ – शरद तळवलकर, मराठी चित्रपट अभिनेते.
- २००६ – उस्ताद बिस्मिल्ला खान, जगप्रसिद्ध शहनाईवादक.
- २००६ – प्रकाश चोप्रा, प्रसिद्ध चित्रपट निर्माता बी.आर.चोप्रा यांच्या पत्नी.

## 'दैं. संध्या' जम्बो शब्दकोडे क्र. १०४६



**आडवे शब्द**

१. गप्पागोष्टींचा शौक असलेला
४. आजूबाजूला
७. अगरबत्ती
९. त्याचप्रमाणे
१०. वर्ष, साल
११. फाशीचा खांब
१२. पाणी
१४. घसरगुंडी
१५. लहान
१६. विजयी, कीर्तीमान
१८. मृत्यूचा राजा
२०. कृष्ण
२१. नृत्य, नर्तन
२२. होडी
२३. फसवणूक
२५. एकरूप
२७. लेंगा
२९. जन्मदाता
३१. नारायणाचा मंत्र जपणारा
३२. माळी
३३. मिरवणूक
३५. साहित्यातील शूरत्वाचा रस
३६. पोलिस
३९. घोंगडी विणणारी जमात
४१. नवरा (ग्रामीण)
४२. माझे
४४. कान ताठ करणे
४६. वरचढ
४७. घर (हिंदी)
४९. येऊन पोहोचणे
५१. लढाई, चुरस
५२. कनवट
५३. उणीव
५६. शामलवर्णी
५७. युद्धक्षेत्र
५८. बर्फाळ प्रदेशातील केसाळ प्राणी
५९. बघा!
६०. परावर्तित ऊन
६२. जागृती
६५. लाकडी वस्तू तयार करणारा
६७. बोलीभाषेत मुख्याध्यापक
६९. दुर्योधनमित्र
७०. पळणे
७१. विमानवेधी यंत्रणा
७२. भ्रमर, भुंगा

**उभे शब्द**

१. गुप्त, खाजगी
२. छडीची वनस्पती
३. तिबेटची राजधानी
४. जन्म महिना
५. पर्जन्यकाळ
६. श्रीमंत
७. जमीन व पाणी दोन्ही ठिकाणी वावरणारा
८. शक्तिमान
१०. उजवा, उजवीकडील
१३. रम्य
१७. तजवीज
१९. जनतेचा कौल
२०. संधीसाधू ही स्वत:ची बचावतात!
२१. ज्ञान्रेरांचे समाधी स्थान शोधणारे संत
२३. झोळी घेऊन फिरणारा
२४. गाजावाजा
२६. श्वत, चिरंतन
२७. झाडाचे कात टाकणे
२८. मोठा, जास्त
३०. ओला गोळा
३४. ढीग
३६. शंकराने पचविलेले विष
३७. दडवून ठेवणे
३८. भटकबहाद्दर
४०. मौल्यवान खडा
४१. कणीदार
४३. धान्याचे वजन मोजण्याचे एक जुने परिमाण
४५. दुर्लक्ष करणे
४७. माया
४८. 'अ'चा 'आ' याच्यामुळे होतो
५०. मान्यता, संमती
५१. रेचक
५२. मिठी
५३. थोडेफार
५४. सिद्ध
५५. प्रधानजीचा 'बॉस'
५६. सरळमार्गी
५७. पांढराशुभ्र प्राणी
६१. इमारतीच्या पायात वापरला जाणारा राडारोडा
६३. उष्ण
६४. कळशी
६६. कागदाचे एक परिमाण
६७. शत्रूचे गुप्तपणे काम करणारा
६८. फक्त, केवळ
६९. मांडी, आकडा

**जम्बो शब्दकोडे क्र. १०४५ चे उत्तर**

आडवे उत्तर : १.रहाटगाडगे ५.हद्दपार ७.अवसान ९.मटका १०.अवस ११.सत्याग्रह १२.वास १४.स्थानबद्ध १६.यथार्थ १८.राग १९.रखरखीत २२.दास २३.अमर २४.रबर २५.जबाबदारी २७.सटरफटर ३०.वजन ३१.सहदेव ३३.टप ३५.पायजमा ३६.वरवर ३८.कटकट ३९.पालव ४१.दार ४२.आळ ४३.सव ४४.आदानप्रदान ४८.आरा ४९.वाचाळ ५०.कलेवर ५२.धाम ५३.समसमान ५५.सारक ५६.वर्तन ५७.दर ५८.नवागत ६०.मोठा ६१.खरवस ६२.कामकाज ६४.सरस ६६.कलह ६७.रग ६८.दाभण ६९.खनन ७१.रावा ७३.रसद ७४.कसर ७५.अंगतपंगत

उभे उत्तर : १.रमणीय २.हाट ३.टका ४.गेहत्याग ५.हरहर महादेव ६.पारावार ७.अवस्था ८.वसन ११.सरासरी १३.सखी १५.बोरबर १७.थापेबाज २०.खर २१.तत्पर २२.दादा २४.खटपट २५.जवळपास २६.बनपाव २८.टक्कर २९.फटकळ ३१.समाधान ३२.वरदान ३४.अटकळ ३७.वर ४०.लवकर ४२.आरास ४४.आव ४५.दारवठा ४६.प्रधान ४७.दाम ४८.आमरस ४९.वानवा ५१.लेक ५३.सदवर्तन ५४.मानद ५५.सावकार ५९.ताहहयात ६०.मोजदाद ६१.खसखस ६३.मगर ६४.सण ६५.पराग ७०.नर ७२.वात

## उपदेशकथा

### निराधार

कृष्ण जेवत होते. दोन घास खाल्ले आणि ताट बाजूला सारून ते दरवाजाकडे गेले. रुक्मिणी म्हणाली, 'असं भरल्या ताटावरून कुणी उठतं का?' काहीही उत्तर न देता कृष्ण दरवाजापर्यंत गेले आणि परत येऊन जेवू लागले. रुक्मिणीने विचारताच ते म्हणाले, 'माझा आवडता भक्त रस्त्यातून जात होता. काही लोक त्याला दगड मारीत होते. रक्ताळलेल्या अवस्थेतही तो हसत होता. त्याला माझी गरज होती, म्हणून उठलो होतो.' रुक्मिणी म्हणाली, 'मग परत का आलात?' कृष्ण म्हणाला, 'दरवाजाजवळ गेलो तेव्हा त्याला माझी गरज राहिली नव्हती. त्या भक्ताने स्वत:च दगड घेऊन प्रत्युत्तर द्यायला सुरवात केली होती. जोपर्यंत तो निराधार होता तोपर्यंत त्याचे प्राण मला चुंबकाप्रमाणे खेचून घेत होते. आता तो निराधार नाही. त्याला दगडाचा आधार आहे. त्याच्याजवळ ताकद आहे. तो लढतो आहे. अशावेळी त्याला माझा आधार देऊन निर्बल बनविणे योग्य नाही.'

कथा उपदेश : आपले हात–मन भरलेले आहे, तोपर्यंत परमात्म्याचा आधार नाही. जेव्हा त्याचा आधार लाभतो, तेव्हा माणूस संपूर्ण निराधार होतो. निर्बल आणि दुर्बल होतो.

## : SMS :

Doctor: Aap roz 1 ghanta walk kiya karo
Patient: Doctor sahab, Domino's 30 min me delivery deta hai... walk kaun karega?

## आजचे राशिभविष्य

**मेष :** शुभ रंग : पांढरा, अनुकूल दिशा : उत्तर
बुद्धि चातुर्याने कामे केल्यास आजचा दिवस चांगला सिद्ध होऊ शकेल.

**तुळ :** शुभ रंग : केसरी, अनुकूल दिशा : पश्चिम
धाडसाने विरोधकांचा पराभव करु शकाल. सामाजिक प्रशंसनेने आनंद होईल.

**वृषभ :** शुभ रंग: निळा, अनुकूल दिशा : उत्तर
वाद–विवाद आणि भांडणांनी मानसिक त्रास वाढेल.

**वृश्चिक :** शुभ रंग : काळा, अनुकूल दिशा : उत्तर
सामाजिक कार्यात आपला सहभाग राहील. महत्वाची कामे पूर्ण करु शकाल.

**मिथुन :** शुभ रंग: गुलाबी, अनुकूल दिशा : उत्तर
जवळच्या व्यक्तींकडून उपयोगी सल्ला मिळेल. राज्यपक्षाच्या कामासाठी दिवस चांगला राहील.

**धनु :** शुभ रंग : जांभळा, अनुकूल दिशा : पश्चिम
वेळेवर कामे न झाल्यामुळे चिंता वाढेल. खर्च अधिक होईल.

**कर्क :** शुभ रंग: हिरवा, अनुकूल दिशा: पश्चिम
आर्थिक लाभ झाल्याने आनंद होईल. नोकरीत बढती मिळण्याचे योग येतील.

**मकर :** शुभ रंग: गुलाबी, अनुकूल दिशा : दक्षिण
जुनी समस्या दूर होण्याची शक्यता आहे. दृढ निश्चय असल्या कारणाने प्रत्येक क्षेत्रात यश मिळेल.

**सिंह :** शुभ रंग: लाल, अनुकूल दिशा : पश्चिम
कुंटूबासमवेत वेळ मनोरंजनात जाईल. व्यापारात नवीन संबंध जुळून येतील, जे भविष्यात फायदेशीर ठरतील.

**कुंभ :** शुभ रंग: हिरवा, अनुकूल दिशा : उत्तर
कौटूंबिक तसेच संपत्ती संबंधातील अडचणींचे समाधान शक्य आहे. मिळकतीत वाढ होईल.

**कन्या :** शुभ रंग: पिवळा, अनुकूल दिशा : दक्षिण
आपल्या प्रयत्नांनी घरगूती समस्या सुटतील. आर्थिक स्थिती उत्साहवर्धक राहील.

**मीन :** शुभ रंग : लाल, अनुकूल दिशा : उत्तर
सज्जन माणसांचा सहवास लाभेल. अभ्यासात मन रमेल. समाजात मान प्रतिष्ठा तसेच लोप्रियता मिळेल.

## पंचांग

| | |
|---|---|
| पंचांग | ११:५२:३७ |
| २१ ऑगस्ट २०२६ | योग:वैधृति २९:१७:४८+ |
| शुक्रवार | करण:बालव १०:२५:५७ |
| विक्रम संवत्– २०८२ | करण:कौलव २३:३६:२६ |
| श्रावण शके | सूर्य:सिंह |
| संवत्– १९४८ | चन्द्र:वृश्चिक |
| संवत्सर – पराभवनाम | हिजरी सन् – १४४८ |
| अयन– दक्षिणयन | मुस्लिम मास – रबिलावल |
| मास– श्रावण | तारीख – ७ |
| ऋतु– सौर वर्षा | विशेष |
| शुक्ल पक्ष | जरा – जिवंतिका पूजन |
| तिथि:नवमी २३:३६:२६ | नारयण महाराज पुण्यतिथी |
| नक्षत्र:अनुराधा | – पद्मतीर्थ (वाशिम) |

## हवामानाचा अंदाज

| | | |
|---|---|---|
| औरंगाबाद | ३०.८ | २३ |
| अहमदनगर | ३१.२ | २२.६ |
| अकोला | ३३.५ | २५.६ |
| अमरावती | ३२.७ | २५.३ |
| बीड | ३३.९ | २६.९ |
| भंडारा | ३२.८ | २५.९ |
| बुलढाणा | ४३.४ | २६.९ |
| चंद्रपूर | ३३.६ | २६.७ |
| चेन्नई | ४०.८ | ३०.८ |
| नवी दिल्ली | ४०.८ | ३४.५ |
| धुळे | ३५ | २४.४ |
| गोंदिया | ३०.२ | २५.४ |
| जळगाव | ३४ | २५ |
| कोल्हापूर | २७.३ | २२.९ |
| लातूर | ३०.९ | २३.१ |
| मुंबई | ३४.८ | ३०.७ |
| नागपूर | ३५ | २५.९ |
| नांदेड | ३२.२ | २५ |
| नंदूरबार | ३१.२ | २४.२ |
| नाशिक | ३०.५ | २३.२ |
| पुणे | २६.६ | २२.२ |
| पंढरपूर | ३३.३ | २३.८ |
| सातारा | ३०.३ | २२.५ |
| सांगली | ३०.९ | २३.१ |
| सोलापूर | ३३.३ | २४ |
| वर्धा | ३२.९ | २६.३ |

RNI No. 1663/1957 (DAILY SANDHYA) |
दैनिक संध्या पब्लिकेशन्स प्रा. लि. यांच्या मालकीचे हे दैनिक मुद्रक व प्रकाशक ज्योती नाळे यांनी सामना प्रेस (प्रबोधन प्रकाशन) सिंहगड रोड, वडगांव खुर्द पुणे–४११०४१ येथे छापून, १०३८ आकार भवन, दुसरा मजला, टिळक रोड, पुणे – ४११००२ येथे प्रसिद्ध केले.
संपादिका : ज्योती नाळे (पी.आर.बी. कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी.) (फोन : ०२०–२४४७९२९२)
Daily "Sandhya" News paper is owned by Dainik Sandhya Publications Pvt. Ltd. Printed & Published by Jyoti Nale, Printed at Saamana Press (Prabodhan Prakashan) Pvt. Ltd. Sihagad Road, Vadgaon Khurd, Pune 411 041, published at 1038, Aakar Bhavan, Tilak Road, Pune 411002. Editor - Jyoti Nale.

## थोडक्यात पण महत्वाचे



### राजीव गांधी जयंतीनिमित्त सद्भावना दिवस साजरा

**गोजुबावी : दैनिक संध्या**

न्यू इंग्लिश स्कूल,गोजुबावी विद्यालयात भारताचे माजी पंतप्रधान राजीव गांधी यांच्या जयंतीनिमित्त सद्भावना दिवस उत्साहात साजरा करण्यात आला. कार्यक्रमाचे संपूर्ण नियोजन इयत्ता नववीच्या विद्यार्थ्यांनी केले. यावेळी सर्व शिक्षक,शिक्षकेतर कर्मचारी व विद्यार्थी उपस्थित होते. सर्व शिक्षकांच्या हस्ते राजीव गांधी यांच्या प्रतिमेचे पूजन करण्यात आले. कार्यक्रमात सौ.वीरकर मॅडम,सौ.अनारसे मॅडम तसेच विद्यार्थिनींनी राजीव गांधी यांच्या कार्याविषयी व सद्भावना दिवसाच्या महत्त्वाविषयी मनोगत व्यक्त केले. या कार्यक्रमातून विद्यार्थ्यांना राष्ट्रीय एकात्मता,बंधुभाव,शांतता व सद्भावना यांचे महत्त्व पटवून देण्यात आले. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी इयत्ता नववीच्या विद्यार्थ्यांनी व वर्गशिक्षकांनी सहकार्य केले.




### प्रतिगामी शक्तींच्या विरोधात पेटून उठण्याची गरज : उल्हास पवार

**पुणे : दैनिक संध्या**

देवभूमी म्हणून ओळखल्या जाणाऱ्या उत्तराखंडात केवळ दलित म्हणून अत्यंत विद्वान, कर्तृत्ववान आणि राज्यसभेतील विरोधी पक्ष नेते असलेल्या मल्लिकार्जुन खर्गे यांचा केवळ दलित म्हणून करण्यात आलेला अपमान सहन करता कामा नये. सामाजिक समतेसाठी आणि प्रतिगामी शक्तींना विरोध करण्यासाठी पेटून उठण्याची गरज आहे, असे मत काँग्रेसचे ज्येष्ठ नेते आणि विचारवंत उल्हास पवार यांनी व्यक्त केले. भारतीय संविधान संवर्धन समितीच्या वतीने भारतीय संविधान आणि मल्लिकार्जुन खर्गे यांचा अपमान करणाऱ्या जातीयवादी प्रवृत्तीच्या विरोधात पुणे शहर आणि जिल्ह्यातील सर्वपक्षीय संविधानवादी नागरिकांच्या वतीने जिल्हाधिकारी कार्यालयासमोर धरणे आंदोलन करण्यात आले. या आंदोलनात उल्हास पवार यांच्यासह माजी आमदार जयदेव गायकवाड, काँग्रेस पक्ष अनुसूचित जाती विभागाचे पुणे (पूर्व विभाग) शहराध्यक्ष, आंदोलनाचे मुख्य समन्वयक कुणाल राजगुरू, माजी नगरसेविका लता राजगुरू, विठ्ठल गायकवाड, शैलेंद्र मोरे, संग्राम रोहम, वसंत साळवे, रोहिदास गायकवाड, रवींद्र माळवदकर आदी सर्वपक्षीय नेते मंडळी आणि नागरिक मोठ्या प्रमाणात उपस्थित होते. मल्लिकार्जुन खर्गे यांना लहानपणापासून सामाजिक विषमतेचे चटके सोसावे लागले. त्यांच्या कुटुंबातील पाच जणांना जाळून मारण्यात आले. तरीही खचून न जाता खरगे यांनी मोठे कर्तृत्व गाजवले. राष्ट्रीय स्वयंसेवक संघाची नोंदणी, घटना, उद्दिष्ट आणि पार्श्वभूमी यावर प्रश्न उपस्थित करण्याचे धैर्य त्यांनी दाखवले. समाजासाठी उपयुक्त आणि क्रांतिकारक ठरतील असे अनेक निर्णय त्यांनी आपल्या राजकीय कारकिर्दीत घेतले. ते विद्वान आहेत. बहुभाषिक आहेत. घटनात्मक पदावर आहेत. तरीही केवळ दलित म्हणून त्यांचा अवमान करणे कदापी सहन केले जाणार नाही, असा इशारा उल्हास पवार यांनी यावेळी दिला. सध्याच्या काळात सत्तारूढ भारतीय जनता पक्षाला काँग्रेस हाच एकमेव पर्याय ठरू शकतो. काँग्रेसने स्थापनेपासूनच सामाजिक समतेचा पुरस्कार केला आहे. काँग्रेसच्या दरवर्षीच्या अधिवेशनानंतर सामाजिक परिषद आयोजित केली जात असे. या परिषदेत सामाजिक विषमता मोडून काढून समता प्रस्थापित करण्याच्या दृष्टीने विचार मंथन होत असे. स्वातंत्र्यानंतर स्पृश्यता निर्मूलनाला प्राधान्य देण्यात आले. काँग्रेस हा पुरोगामी विचारांचा पक्ष आहे, असे मत जयदेव गायकवाड यांनी यावेळी मांडले. लोकसभेतील विरोधी पक्ष नेते राहुल गांधी यांना देशातील जनतेने डोक्यावर घेण्याची वेळ आली आहे, असेही ते म्हणाले. विजय शंखनाथ रॅलीच्या कार्यक्रमासाठी उत्तराखंडमध्ये हलदानी येथील रामलीला मैदानावर मल्लिकार्जुन खर्गे उपस्थित होते. कार्यक्रम संपल्यानंतर काही जातीयवादी शक्तींनी गोमूत्र शिंपडून रामलीला मैदान पवित्र केल्याचा दावा केला. या कृत्याचा निषेध करण्यासाठी प्रातिनिधिक स्वरूपात हे धरणे आंदोलन करण्यात आले.

### सॅमसंगकडून भारतातील टॉप ४० युवा नवोन्मेषकांची घोषणा

**पुणे : दैनिक संध्या**

सॅमसंग इंडियाने आपल्या प्रमुख युवा नवोन्मेष कार्यक्रम 'सॅमसंग सॉल्व्ह फॉर टुमॉरो' च्या २०२६च्या आवृत्तीतील टॉप ४० उपांत्य फेरीतील संघांची घोषणा केली आहे. देशातील तरुणांना त्यांच्या आजूबाजूच्या समस्या ओळखून तंत्रज्ञान, मार्गदर्शन आणि प्रत्यक्ष अनुभवाच्या माध्यमातून त्यांचे नाविन्यपूर्ण उपाय विकसित करण्यासाठी या कार्यक्रमाचे व्यासपीठ उपलब्ध करून दिले जाते. यंदा भारतात या कार्यक्रमाची पाचवी आवृत्ती होत असून, १४ ते २२ वर्षे वयोगटातील तरुणांना त्यात सहभागी होता येते. देशातील पुढील पिढीमध्ये समस्या सोडविण्याची क्षमता, सर्जनशीलता आणि नवोन्मेषाला चालना देणे हा या उपक्रमाचा उद्देश आहे. टॉप ४० संघ १५ राज्ये आणि २६ शहरांचे प्रतिनिधित्व करतात. विशेष म्हणजे, निम्म्याहून अधिक संघ टियर-२ आणि टियर-३ शहरांमधून आले आहेत. वाराणसी, कोयंबतूर, गुन्टूर, अमृतसर, सुंदरगड आणि राजकोट यांसारख्या शहरांतील युवा नवोन्मेषकांनी राष्ट्रीय उपांत्य फेरीत स्थान मिळवले आहे. या वर्षीच्या निवडीत 'भारतासाठी कृत्रिम बुद्धिमत्ता', 'आरोग्य आणि शिक्षण', 'पर्यावरणीय शाश्वतता' तसेच 'क्रीडा आणि तंत्रज्ञान' या चार विषयांमध्ये प्रत्येकी १० संघांचा समावेश आहे. उपांत्य फेरीतील संघांना त्यांच्या नमुना-उत्पादनांच्या विकासासाठी एकत्रित ८ लाख रुपयांचा निधी देण्यात येणार असून, प्रत्येक संघ सदस्याला सॅमसंगचा लॅपटॉप मिळणार आहे. सॅमसंग दक्षिण-पश्चिम आशियाचे कॉर्पोरेट उपाध्यक्ष एस. पी. चुन म्हणाले, "यंदाच्या टॉप ४० संघांमधील सर्वात उल्लेखनीय बाब म्हणजे तरुण आपल्या आजूबाजूच्या जगाकडे अत्यंत बारकाईने पाहत आहेत. समुदाय, वर्गखोल्या, शेत, व्यवसाय आणि क्रीडांगणांमधील समस्या ओळखून तंत्रज्ञानाच्या माध्यमातून त्यावर उपाय शोधण्याचा प्रयत्न ते करीत आहेत. निम्म्याहून अधिक संघ टियर-२ आणि टियर-३ शहरांमधून आले आहेत, ही विशेष उत्साहवर्धक बाब आहे. नवोन्मेषाची पुढील पिढी देशातील कोणत्याही भागातून पुढे येऊ शकते, हे यातून दिसून येते." ते पुढे म्हणाले, "सॅमसंग सॉल्व्ह फॉर टुमॉरोच्या माध्यमातून या युवा नवोन्मेषकांना त्यांच्या कल्पनांचे प्रभावी उपायांमध्ये रूपांतर करण्यासाठी मार्गदर्शन, तंत्रज्ञान आणि संधी उपलब्ध करून देणे ही आमची भूमिका आहे. सॅमसंग भारतात ३० वर्षे पूर्ण करत असताना, देशाची पुढील ३० वर्षे घडविणाऱ्या कल्पना आणि प्रतिभेमध्ये गुंतवणूक करत राहण्याची आमची इच्छा आहे." उपांत्य फेरीतील युवा संघ आर्थिक आणि अत्यावश्यक माहिती अधिक सुलभ करणाऱ्या कृत्रिम बुद्धिमत्ता साधनांपासून कृषी अवशेष व्यवस्थापन, दिव्यांग व्यक्तींसाठी सहाय्यक तंत्रज्ञान, परवडणारी आरोग्यसेवा आणि शिक्षण साधने तसेच क्रीडा अधिक सर्वसमावेशक करणाऱ्या तंत्रज्ञानापर्यंत विविध क्षेत्रांमध्ये काम करीत आहेत.

# 'बीड फाइल्स'मध्ये तृप्ती देसाईंची भूमिका ठरणार लक्षवेधी

## बीडमधील गुन्हेगारीवर चित्रपटातून परखड भाष्य

■ पुणे (दै. संध्या)

बीड जिल्ह्यातील वाढती गुन्हेगारी, ढासळलेली कायदा-सुव्यवस्था आणि या परिस्थितीमुळे सामान्य नागरिकांमध्ये निर्माण झालेली असुरक्षितता यावर भाष्य करणारा 'बीड फाइल्स' हा नवा मराठी चित्रपट लवकरच रुपेरी पडद्यावर येत आहे. या चित्रपटाच्या माध्यमातून सामाजिक कार्यकर्त्या तृप्ती देसाई यांच्याशी संबंधित व्यक्तिरेखा आणि सामाजिक वास्तवावर विशेष प्रकाश टाकला जाणार असल्याने चित्रपटाची उत्सुकता वाढली आहे.

डॉ. डोईफोडे फिल्म्सच्या बॅनरखाली निर्मिती होत असलेल्या 'बीड फाइल्स'मध्ये बीडमधील गुन्हेगारीच्या घटनांमागील सामाजिक आणि व्यवस्थात्मक वास्तवाचा वेध घेण्यात येणार आहे. गुन्हेगारीला खतपाणी घालणारी परिस्थिती, व्यवस्थेतील त्रुटी आणि सामान्य नागरिकांच्या सुरक्षिततेचे प्रश्न या चित्रपटाच्या केंद्रस्थानी आहेत.

चित्रपटाच्या पहिल्या पोस्टरचे नुकतेच अनावरण करण्यात आले. या पोस्टरमधून चित्रपटाच्या गंभीर आणि वास्तववादी आशयाची झलक पाहायला मिळते. विशेषतः तृप्ती देसाई यांना केंद्रस्थानी ठेवून मांडण्यात येणारा सामाजिक दृष्टिकोन चित्रपटाला वेगळी धार देणार असल्याचे




दिसून येत आहे. डॉ. शशिकांत डोईफोडे हे चित्रपटाचे निर्माते असून शिवराज बांगर सह-निर्माते आहेत. चित्रपटाचे दिग्दर्शन गणेश शिंदे करणार आहेत. चित्रपटातील इतर कलाकारांची नावे अद्याप जाहीर करण्यात आलेली नाहीत. त्यामुळे तृप्ती देसाईंची भूमिका नेमकी कशा स्वरूपाची असेल आणि बीडमधील वास्तवाचे चित्रण कोणत्या पद्धतीने केले जाणार, याबाबत प्रेक्षकांमध्ये उत्सुकता निर्माण झाली आहे.

मनोरंजनासोबतच सामाजिक प्रश्नांना वाचा फोडण्याचा प्रयत्न करणारा 'बीड फाइल्स' हा चित्रपट बीडमधील गुन्हेगारी आणि कायदा-सुव्यवस्थेच्या प्रश्नांकडे प्रेक्षकांचे लक्ष वेधण्याची शक्यता आहे.

## बारामती कार्यक्षेत्रातील रुग्णवाहिकांचे सुधारित भाडेदर निश्चित - सुरेंद्र निकम

■ बारामती (दै. संध्या)

बारामती कार्यक्षेत्रामधील रुग्णवाहिकांचे सुधारित भाडेदर निश्चित करण्यात आले असून हे भाडेदर रुग्णवाहिकेत रुग्ण बसल्यापासून परतीच्या अंतरासाठी लागू राहतील, रुग्णवाहिकांकरिता निश्चित केलेल्या दरपत्रकाची काटेकोरपणे अंमलबजावणी न करणाऱ्या वाहन चालक, मालक यांच्यावर दंडात्मक कारवाई करण्यात येईल, असे उप प्रादेशिक परिवहन अधिकारी सुरेंद्र निकम यांनी कळविले आहे. सुधारित दर पत्रकानुसार अवातानुकुलीत मारुती व्हॅन साठी २५ कि.मी. अथवा दोन तासासाठी ७०० रुपये, त्यापुढील प्रती किलोमीटर साठी १६ रुपये, प्रति प्रतिक्षा तास १२५ रुपये, प्रतिदिन किंवा ३०० कि.मी. साठी ४ हजार रुपये, इंधन, देखभाल व दुरुस्ती व चालकांशिवाय १ हजार रुपये प्रतिदिन दर राहतील. अवातानुकुलीत मारुती ईको, टाटा मॅजिक यासाठी २५ कि.मी. अथवा दोन तासासाठी ९०० रुपये, त्यापुढील प्रती किलोमीटर साठी १७ रुपये, प्रति प्रतिक्षा तास १२५ रुपये, प्रतिदिन किंवा ३०० कि.मी. साठी ४ हजार ५०० रुपये, इंधन, देखभाल व दुरुस्ती व चालकांशिवाय १ हजार २०० रुपये प्रतिदिन दर राहतील.

अवातानुकुलीत महिंद्रा बोलेरो, फोर्स क्रुझरसाठी २५ कि.मी. अथवा दोन तासासाठी १ हजार २०० रुपये, त्यापुढील प्रती किलोमीटर साठी १८ रुपये, प्रति प्रतिक्षा तास १५० रुपये, प्रतिदिन किंवा ३०० कि.मी. साठी ५ हजार रुपये, इंधन, देखभाल व दुरुस्ती व चालकांशिवाय १ हजार ५०० रुपये प्रतिदिन दर राहतील.

अवातानुकुलीत फोर्स टेम्पो ट्रॅव्हलरसाठी २५ कि.मी. अथवा दोन तासासाठी १ हजार ५०० रुपये, त्यापुढील प्रती किलोमीटर साठी २२ रुपये, प्रति प्रतिक्षा तास १७५ रुपये, प्रतिदिन किंवा ३०० कि.मी. साठी ७ हजार रुपये, इंधन, देखभाल व दुरुस्ती व चालकांशिवाय २ हजार रुपये प्रतिदिन दर राहतील.

वातानुकुलीत फोर्स टेम्पो ट्रॅव्हलरसाठी (आयसीयु) २५ कि.मी. अथवा दोन तासासाठी २ हजार ५०० रुपये, त्यापुढील प्रती किलोमीटर साठी ३० रुपये, प्रति प्रतिक्षा तास २५९ रुपये, प्रतिदिन किंवा ३०० कि.मी. साठी १० हजार रुपये, इंधन, देखभाल व दुरुस्ती व चालकांशिवाय ४ हजार रुपये प्रतिदिन दर राहतील.

> निश्चित केलेल्या भाडेदरापेक्षा जास्त भाडेदर आकारणी करणाऱ्या वाहनमालक, चालकांवर दंडात्मक कारवाई म्हणून पहिल्या गुन्ह्याकरिता ५ हजार रुपये दुसऱ्या गुन्ह्याकरिता १० हजार रुपये व तिसऱ्या व त्यापुढील प्रत्येक गुन्ह्याकरिता २० हजार रुपये याप्रमाणे दंडात्मक कारवाई करण्यात येईल, असेही श्री. निकम यांनी कळविले आहे.

## शासकीय आश्रमशाळांमध्ये लवकरच २ हजाराहून अधिक शिक्षकांच्या पदांची भरती

■ पुणे (दै. संध्या)

महाराष्ट्र शासनाच्या आदिवासी विकास विभागांतर्गत कार्यरत असलेल्या शासकीय आश्रमशाळांमधील पंचायत (अनुसूचित क्षेत्रांसाठी विस्तार) कायदा, १९९६ (पेसा) व नॉन-पेसा क्षेत्रातील वर्ग ३ संवर्गातील प्राथमिक, माध्यमिक आणि उच्च माध्यमिक शिक्षकांची (शिक्षण सेवक) २ हजार ४२१ रिक्त पदांसाठी भरती प्रक्रिया 'पवित्र' पोर्टलद्वारे राबविण्यात येणार आहे, अशी माहिती आदिवासी विकास आयुक्तालयाच्या उपायुक्त शशिकला अहिरराव यांनी दिली आहे. या भरती प्रकियेत नाशिक विभागात ८२६ पदे, ठाणे ६१३, नागपूर ५१४ आणि अमरावती विभागात ४६८ रिक्त पदांकरिता भरती प्रक्रिया सुरु आहे. यामध्ये प्राथमिक व माध्यमिक शिक्षक (मराठी व इंग्रजी माध्यम) आणि उच्च माध्यमिक शिक्षक (शिक्षण सेवक) अशा विविध पदांचा समावेश आहे. यामध्ये पेसा क्षेत्रातील ८८५ तर नॉन-पेसा क्षेत्रातील १ हजार ५३६ पदांचा समावेश आहे. प्राथमिक शिक्षक (मराठी माध्यम) नॉन-पेसा क्षेत्रामध्ये ८६२ जागा तर पेसा क्षेत्रामध्ये ४३६ जागा, प्राथमिक शिक्षक (इंग्रजी माध्यम) पेसा क्षेत्रामध्ये ६७ व नॉन-पेसा क्षेत्रामध्ये १६१ जागांवर तसेच माध्यमिक शिक्षक (मराठी माध्यम) नॉन-पेसा क्षेत्रामध्ये ३५२ तर पेसा क्षेत्रात १३८ जागा, माध्यमिक शिक्षक (इंग्रजी माध्यम) पेसा क्षेत्रात ५ आणि नॉन-पेसा क्षेत्रात २२ जागांवर भरती प्रक्रिया राबविण्यात येणार आहे. उच्च माध्यमिक शिक्षकांच्या पेसा क्षेत्रामध्ये २५१ आणि नॉन-पेसा क्षेत्रामध्ये १०६ अशा एकूण ३५७ जागा उपलब्ध आहेत. यात मराठी, इंग्रजी, इतिहास, राज्यशास्त्र, भूगोल, अर्थशास्त्र, गणित, जीवशास्त्र, रसायनशास्त्र आणि भौतिकशास्त्र या उच्च माध्यमिक स्तरावरील विविध शाखांच्या विषयांचा समावेश आहे.

## पुण्यात बार्टीच्या संशोधक विद्यार्थ्यांचा संताप

■ पुणे (दै. संध्या)

डॉ. बाबासाहेब आंबेडकर संशोधन व प्रशिक्षण संस्थेच्या (बार्टी) फेलोशिपधारक अनुसूचित जातीच्या (SC) विद्यार्थ्यांनी पुकारलेले बेमुदत धरणे आंदोलन आता अधिक उग्र झाले आहे. 'आंबेडकराईट स्टुडंट असोसिएशन'च्या नेतृत्वाखाली कालपासून पुणे येथील समाजकल्याण आयुक्त कार्यालयाबाहेर सुरू असलेल्या या आंदोलनात आज विद्यार्थ्यांनी अत्यंत आक्रमक भूमिका घेतली. शासनाने लागू केलेला २०२३ चा 'सर्वंकष समान धोरण' शासन निर्णय (GR) पूर्णपणे संविधानविरोधी असून यामुळे अनुसूचित जातींचा विशेष घटनात्मक दर्जा धोक्यात येत असल्याचा घणाघात करत विद्यार्थ्यांनी या अन्यायकारक जीआरची जाहीर होळी केली. पीएच.डी. करणाऱ्या अनुसूचित जातीच्या विद्यार्थ्यांना उच्च शिक्षणापासून वंचित ठेवण्यासाठीच सरकारने या जाचक अटी लादल्या असल्याचा आरोप आंदोलकांनी केला आहे. सामाजिक न्याय विभागाकडे पुरेसा निधी उपलब्ध असतानाही केवळ प्रशासकीय टाळाटाळ केली जात आहे. बार्टीच्या माध्यमातून उच्चशिक्षण घेणाऱ्या ५८ जातींमधील विद्यार्थ्यांची संख्या केवळ १०० वर आणून सरकारने पीएच.डी. शिक्षणाचे केलेले 'रेशिनिंग' अत्यंत निंदनीय आहे, अशी तीव्र भावना विद्यार्थ्यांनी व्यक्त केली. ही सरकारची दलितविरोधी मानसिकता स्पष्ट करते, अशी टीकाही यावेळी करण्यात आली. या आंदोलनाला पाठिंबा देण्यासाठी आंबेडकरवादी चळवळीतील प्रमुख नेते राहुल डंबाळे, डॉ. हर्षवर्धन दवणे, डॉ. राहुल ससाणे, स्वप्निल नारबाग, राहुल नगटिळक, राजरत्न बलखांडे , सुरेखा वासनिक , नितीन आंधळे, मानसीताई वानखेडे, आदी मान्यवर आज सलग दुसऱ्या दिवशीही आंदोलनात प्रत्यक्ष सहभागी झाले होते. त्यांच्यासह राज्यभरातून आलेले शेकडो संशोधक विद्यार्थी या आंदोलनात ताकदीने उतरले आहेत. काल आंदोलनाच्या पहिल्या दिवशी बार्टीच्या निबंधक सुचिता शिंदे यांनी बार्टी कार्यालयात विद्यार्थी आणि मान्यवरांशी सविस्तर चर्चा केली होती. मात्र, ठोस तोडगा न निघाल्याने आज संतप्त विद्यार्थ्यांनी थेट शासन निर्णयाची होळी करून आपला लढा तीव्र केला. फेलोशिपची संख्या किमान ६०० करावी, वयोमर्यादा व लाभार्थी संख्येची अट तातडीने रद्द करून सर्व पात्र विद्यार्थ्यांना सरसकट फेलोशिप द्यावी, या मागण्या मान्य होईपर्यंत आंदोलन मागे न घेण्याचा निर्धार विद्यार्थी व मान्यवरांनी केला आहे.




■ जाचक अटींच्या शासन निर्णयाची समाजकल्याण कार्यालयासमोर जाहीर होळी!

'निरोगी सखी राहील सुखी' महापौर महिला आरोग्य अभियानाचा दुसरा टप्पा सुरू

## महिलांनी आरोग्य तपासणीचा लाभ घेऊन निरोगी जीवनशैलीचा अंगीकार करावा : महापौर सौ. मंजुषाताई नागपुरे

■ पुणे (दै. संध्या)

पुणे महानगरपालिकेच्या 'पुणे प्रथम' या संकल्पनेअंतर्गत 'निरोगी सखी राहील सुखी – महापौर महिला आरोग्य अभियान' राबविण्यात येत असून, या अभियानाच्या दुसऱ्या टप्प्याला आजपासून सुरुवात झाली. या निमित्ताने आयोजित कार्यक्रमास पुण्याच्या महापौर सौ. मंजुषाताई नागपुरे उपस्थित होत्या.




कार्यक्रमाची सुरुवात दीपप्रज्वलन तसेच महापुरुषांच्या प्रतिमेचे पूजन करून करण्यात आली. यावेळी उपस्थित महिला भगिनींना आरोग्य विषयक मूलभूत सुविधा, तपासण्या व आवश्यक आरोग्य मार्गदर्शनाचा लाभ उपलब्ध करून देण्यात आला. यावेळी बोलताना महापौर सौ. मंजुषाताई नागपुरे म्हणाल्या, "महिलांचे आरोग्य हे कुटुंबाच्या आणि समाजाच्या आरोग्याचा पाया आहे. अनेक महिला आपल्या कुटुंबाच्या जबाबदाऱ्या पार पाडताना स्वतःच्या आरोग्याकडे दुर्लक्ष करतात. त्यामुळे महिलांना त्यांच्या दैनंदिन जीवनाच्या जवळ आरोग्य तपासणी आणि मार्गदर्शन उपलब्ध करून देण्याच्या उद्देशाने 'निरोगी सखी राहील सुखी' हे अभियान सुरू करण्यात आले आहे. या अभियानाचा जास्तीत जास्त महिलांनी लाभ घ्यावा आणि आपल्या आरोग्याची नियमित तपासणी करून घ्यावी." या अभियानाच्या माध्यमातून महिलांना आरोग्य तपासणी, प्राथमिक निदान, आवश्यक वैद्यकीय मार्गदर्शन आणि आरोग्यविषयक जनजागृती उपलब्ध करून देण्यावर भर देण्यात येत आहे. महिलांनी आजाराची लक्षणे जाणवण्याची वाट न पाहता नियमित आरोग्य तपासणी करून घेणे आवश्यक असल्याचेही महापौरांनी सांगितले.

'निरोगी सखी राहील सुखी' हे अभियान केवळ आरोग्य तपासणीपुरते मर्यादित न राहता महिलांमध्ये प्रतिबंधात्मक आरोग्याची जाणीव निर्माण करणारे व्यापक अभियान म्हणून पुढे नेण्याचा पुणे महानगरपालिकेचा मानस आहे. पुणे शहरातील अधिकाधिक महिलांपर्यंत या अभियानाचा लाभ पोहोचविण्यासाठी आरोग्य विभागाने प्रभावी नियोजन करावे, असे निर्देशही महापौरांनी दिले.

कार्यक्रमास उपमहापौर श्री. परशुरामजी वाडेकर, अतिरिक्त आयुक्त सौ. पवनित कैर, नगरसचिव सौ. योगिता भोसले, नगरसेविका सौ. संगीताताई दांगट, ऐश्वर्या थोरात, अल्पना वर्पे, सौ. स्वरदा बापट, सौ. स्वप्नाली पंडीत, अर्चना पाटील, पूजा दांडेकर, रूपाली पवार, सौ. स्नेहाताई माळवदे, सौ. मनिषा बुटाला, सौ. कल्पना बहिरट, सौ. रुपाली पवार, सौ. शैलजा भोसले, सौ. जयश्रीताई भुमकर तसेच आरोग्य प्रमुख मीना बोराडे, डॉ. वैशाली जाधव, डॉ. मनिषा नाईक, डॉ. राजेश दिघे, डॉ. आंधळे, सारिका फुंदे यांच्यासह पुणे महानगरपालिकेचे आरोग्य विभागातील अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते.

# राजीव गांधी स्मारक समितीतर्फे जयंतीनिमित्त अभिवादन

## महिला आणि तरुणांचे पुरस्कर्ते, दूरदृष्टीचे नेते राजीव गांधींच्या विचारांची देशाला गरज : बी. संदीप

■ पुणे (दै. संध्या)

भारताच्या विकासाचा पाया घालणाऱ्या काँग्रेसच्या नेत्यांनी देशासाठी मोठे योगदान दिले आहे. पंडित जवाहरलाल नेहरू यांनी देशाच्या प्रगतीचा पाया घातला, तर माजी पंतप्रधान स्वर्गीय राजीव गांधी यांनी आधुनिक भारताच्या निर्मितीला आणि तंत्रज्ञानाच्या विकासाला नवी दिशा दिली. राजीव गांधी यांच्या विचारांवर वाटचाल करून त्यांच्या स्वप्नातील भारत घडविण्यासाठी प्रत्येकाने कटिबद्ध राहणे आवश्यक आहे. त्यांचे सकारात्मक, आधुनिक आणि विकासाभिमुख विचार आजही देशासाठी मार्गदर्शक असून त्यांची देशाला गरज आहे, असे प्रतिपादन अखिल भारतीय काँग्रेस समितीचे सचिव तथा




महाराष्ट्राचे सहप्रभारी बी. संदीप यांनी केले.

राजीव गांधी स्मारक समितीतर्फे माजी पंतप्रधान राजीव गांधी यांच्या जयंतीनिमित्त कात्रज येथील राजीव गांधी प्राणीसंग्रहालयासमोरील त्यांच्या पुतळ्यास पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. यावेळी आयोजित कार्यक्रमात बी. संदीप बोलत होते. राजीव गांधी स्मारक समितीचे अध्यक्ष तथा काँग्रेसचे राज्य प्रवक्ते गोपाळदादा तिवारी यांनी स्वागत व प्रास्ताविक केले.

बी. संदीप म्हणाले, राजीव गांधी यांनी देशात संगणक आणि आधुनिक तंत्रज्ञानाच्या क्रांतीचा पाया घातला. त्यांच्या दूरदृष्टीमुळे भारताच्या तंत्रज्ञान क्षेत्राला नवी दिशा मिळाली आणि तरुणांसाठी रोजगाराच्या अनेक नव्या संधी निर्माण झाल्या. देशासाठी राजीव गांधी यांनी दिलेले योगदान तसेच त्यांचे बलिदान आजच्या तरुण पिढीपर्यंत पोहोचविणे गरजेचे आहे.

अखिल भारतीय काँग्रेसच्या सचिव रेहाना चिस्ती म्हणाल्या, राजीव गांधी यांच्या सकारात्मक राजकारणामुळे देशात संगणक क्रांतीला चालना मिळाली. त्यांचे विचार युवकांपर्यंत पोहोचवून अधिकाधिक तरुणांना राजकारणाच्या मुख्य प्रवाहात आणण्याची गरज आहे. राजीव गांधी यांचे विचार आजही देशाला दिशा देणारे आहेत.

पुणे शहर काँग्रेस पश्चिम विभागाच्या अध्यक्षा दीप्ती चौधरी यांच्या अध्यक्षतेखाली हा कार्यक्रम झाला. चौधरी म्हणाल्या, राजीव गांधी यांचा पुतळा उभारण्यासाठी गोपाळदादा तिवारी यांनी घेतलेला पुढाकार स्तुत्य आहे. राजीव गांधी यांचे विचार तरुणांपर्यंत पोहोचविण्यासाठी व्यापक स्वरूपात काम करण्याची आवश्यकता आहे. पंतप्रधान म्हणून अल्प कालावधी मिळूनही राजीव गांधी यांनी देशाच्या विकासासाठी अनेक महत्त्वपूर्ण निर्णय घेतले. त्यांच्या दूरदृष्टीमुळे संगणक आणि तंत्रज्ञान क्षेत्रात मोठी क्रांती घडली. सध्याच्या राजकारणात निर्माण झालेल्या नकारात्मक वातावरणाला सकारात्मक दिशा देण्यासाठी राजीव गांधी यांच्या विचारांची गरज आहे.

## थोडक्यात पण महत्वाचे




## ७८० मीटर लांबीचा डी.पी. रस्ता सामंजस्याने पूर्ण करा : अण्णा बनसोडे यांचे निर्देश

**मुंबई : दैनिक संध्या**

ठाणे येथील कासारवडवली-मोगरपाडा गाव परिसरातील २० मीटर रुंद आणि ७८० मीटर लांबीच्या डी.पी. रस्त्याचे काम स्थानिक नागरिकांशी सामंजस्याने चर्चा करून पूर्ण करण्याचे निर्देश विधानसभा उपाध्यक्ष अण्णा बनसोडे यांनी संबंधित अधिकाऱ्यांना दिले. या संदर्भात विधानसभा उपाध्यक्ष अण्णा बनसोडे यांच्या अध्यक्षतेखाली बैठक आयोजित करण्यात आली. बैठकीस एमएमआरडीए आणि ठाणे महानगरपालिकेचे संबंधित अधिकारी उपस्थित होते. या रस्त्याच्या ७८० मीटर लांबीपैकी सुमारे १८० मीटर जागा ताब्यात आली असून उर्वरित ६०० मीटर जागेसाठी नोटिसा बजावण्यात आल्याची माहिती संबंधित अधिकाऱ्यांनी बैठकीत दिली. उर्वरित जागा ताब्यात घेण्यास स्थानिक पातळीवर अडचणी येत असल्याचेही अधिकाऱ्यांनी सांगितले. या रस्त्याचा उपयोग स्थानिक नागरिकांसाठीच होणार असल्याने स्थानिकांशी संवाद साधून आणि सामंजस्याने प्रश्न मार्गी लावावा, असे निर्देश विधानसभा उपाध्यक्ष अण्णा बनसोडे यांनी दिले. संबंधित अधिकाऱ्यांनी स्थानिक नागरिकांसोबत प्रत्यक्ष बैठक घेऊन त्यांच्या अडचणी समजून घ्याव्यात आणि सर्वांच्या सहकार्याने रस्त्याचे काम पूर्ण करण्यासाठी आवश्यक कार्यवाही करावी, असेही त्यांनी स्पष्ट केले. एमएमआरडीएकडून या रस्त्याच्या कामासाठी मेसर्स गजानन कन्स्ट्रक्शन कंपनीला ७ फेब्रुवारी २०२५ रोजी कार्यादेश देण्यात आला आहे. मात्र, स्थानिक नागरिकांच्या विरोधामुळे कामात अडथळे येत असल्याचे निदर्शनास आले. या पार्श्वभूमीवर आवश्यकतेनुसार स्थानिक पोलिसांचे सहकार्य घेऊन काम सुरळीतपणे पूर्ण करण्याबाबतही कार्यवाही करण्याच्या सूचना देण्यात आल्या. तसेच कासारवडवली येथील रस्त्याचे काम निर्धारित वेळेत पूर्ण करण्यासाठी संबंधित कंत्राटदाराला ठाणे महानगरपालिकेने आवश्यक सूचना द्याव्यात, असेही निर्देश देण्यात आले.


## जाहीर नोटीस

प्रति,

सर्व लोकांस विशेषतः गांव काटेडे, ता. जुन्नर, जि. पुणे येथील व परिसरातील सर्व लोकांस, आमचे आशील १) श्री. दिनेश विजय वाव्हळ २) श्री. उमेश विजय वाव्हळ ३) कामिनी विजय वाव्हळ, ४) सौ. चैताली राजेश ओहाळ, नं. १ व ३ रा. काटेडे, ता. जुन्नर, जि. पुणे तसेच दिवा आगासान रोड, धर्मवीर नगर, रतन प्लाझा बिल्डींग, रूम नं. २१२, दुसरा मजला, दिवा, ठाणे पुर्व ६११, नं. २ सध्या रा. बी. आर. नगर, सांधवी अपार्टमेंट, तिसरा मजला, रूम नं. ३०३, दिवा, आगासान रोड, दिवा, ठाणे पुर्व ६११, नं. ४ रा. वाई, सोनजाई नगर, ता. वाई, जि. सातारा आज समक्ष जुन्नर यांनी प्रत्यक्ष सांगितलेवरून व दिलेल्या माहितीप्रमाणे जाहीररित्या कळविणेत येते ते येणे प्रमाणे :- २) मिळकतिचे वर्णन :- अ) तु. व जि. पुणे, पो. तु. ता. व पं. स. जुन्नर, जि. प. पुणे पैकी ग्रामपंचायत काटेडेचे हद्दीतील मिळकत.

| अ. क्र. | ग. नं. | क्षेत्र हे. आर | आकार रू. पै. |
|---|---|---|---|
| १) | ६४ | ००.२४ | ००.८७ |
| २) | ६५ | ००.१४<br>पो.ख. ००.०२<br>एकूण ००.१६ | ००.५० |
| ३) | ८१ | ००.२८ | ०१.१२ |
| ४) | ८८ | ००.०३ | ००.१२ |

येणे प्रमाणे वर्णनाच्या शेतजमिनी त्यातील झाडझाडोरा तदंगभूत वस्तू व जाणेयेणेचे वहिवाटीचे सर्व हक्कासह.

ब) ग्रामपंचायत काटेडे, ता. जुन्नर, जि. पुणेचे हद्दीतील ग्रामपंचायत मिळकत या वडज धरणाचे कामी बडीत क्षेत्रात गेलेले व त्या मोबदल्यात काटेडे नवीन गावठाणास मिळालेला भुखंड.

२) वर कलम १ मध्ये वर्णन केलेली मिळकत आमचे आशिलांचे जनक पिता विजय मनाजी वाव्हळ व त्यांचे चुलते मनाजी सखाराम वाव्हळ यांचेमध्ये झालेल्या सरस-निरस मानाने वाटपानुसार विजयचे हिश्यास आलेली असून विजय व विजयचे मृत्युनंतर आमचे आशील उपरोक्त मिळकतीचा मालकी हक्काने आजातागायत उपभोग घेत आलेले आहेत. वर नमूद मिळकतिचे मालकी वहिवाटीची व ताब्याशी जनाजी सखाराम वाव्हळ याचा व त्याचे वाली-वारसांचा सन १९८९ चे वाटपापासून कुठल्याही प्रकारचा मालकी हक्क, हितसंबंध, ताबा वहिवाट आजपर्यंत नव्हता व नाही. परंतू आमचे आशिलांचे परस्पर व संबंधीत महसूल अधिकाऱ्यांची दिशाभूल करून वस्तुस्थिती दडवून ठेवून अस्तित्वात आणलेल्या पोकळीस्त नोंदीचे आधारे इसम नामे १) श्री. संतोष विष्णू वाव्हळ २) श्री. विनोद विष्णू वाव्हळ ३) अर्चना विष्णू वाव्हळ ४) श्रीमती कलाबाई विष्णू वाव्हळ ५) श्री. मनिष गौतम वाव्हळ ६) श्री. रोहीत गौतम वाव्हळ ७) श्रीमती विद्या गौतम वाव्हळ ८) श्रीमती कमल जगन्नाथ साबळे हे वर नमूद मिळकतिचे संदर्भात केवळ आमचे आशिलांना लुबाडण्याचे हेतुने व अनुचीत, आर्थिक लाभ उठविण्याचे इराद्याने वर नमूद केलेल्या जमिनीचे संदर्भात काही हस्तांतरणाचा व्यवहार करण्याचे जोरदार प्रयत्नात असलेचे व काही लोक त्याबाबत त्यांचेशी बोलणी करीत असल्याचे आमचे आशिलांस खात्रीलायकरित्या समजते. परंतू तसला कुठलाही हस्तांतराचा, तबदिलीचा व्यवहार तसेच त्याअनुषंगाने केलेले करार-मदार हे वर नमूद जमिनीमधील आमचे आशिलांचे मालकी व ताब्यावर कायद्यानेच बंधनकारक ठरणार नाहीत व संबंधीत व्यक्तीस वर नमूद मिळकतिची मालकी व ताबाही मिळणार नाही याची नोंद घ्यावी.

३) तरी सर्व लोकांस अशी समज देणेत येते की, वर नमूद जमिनीचे संदर्भात वर नमूद इसमांबरोबर कोणीही खरेदी, विक्री, दान, गहाण, लिज, बक्षीस अगर त्याअनुषंगाने करार-मदार करू नयेत व सदरहू मिळकतीवर कोणत्याही वित्त पुरवठा करणारे कुठल्याही संस्थांनी कर्ज पुरवठा करून तारणाचे व्यवहार करू नयेत. तसले कुठलेही व्यवहार आमचे आशिलांचे वर नमूद मिळकतीमधील मालकी हक्कावर व हिश्यावर बंधनकारक ठरणार नाहीत याची नोंद घ्यावी.

कुणाचीही फसवणूक होवू नये म्हणून आगावू प्रसिध्दीस दिली असे.

कळावे.
येणे प्रमाणे जाहीर नोटीस
दि. १६/०८/२०२६

ॲडव्होकेट
श्री. कौस्तुभ पंढरीनाथ कर्पे
"ईशान" किल्ले शिवनेरी पायथा,
ओम शक्ती नगर, जुन्नर, जि. पुणे
संपर्क : ९१४६७४०१७९


# पेप्सिको इंडियाच्या पुणे प्लांटची २५ वर्षे पूर्ण

■ ६०० कोटींच्या गुंतवणुकीसह रांजणगावातील प्रकल्पाची उत्पादन क्षमता वर्षाला ६२,१०० टन

■ रांजणगाव (दै. संध्या)

स्नॅक्स आणि पेये क्षेत्रातील प्रमुख कंपनी पेप्सिको इंडियाच्या पुणे उत्पादक प्रकल्पाने २५ वर्षांचा महत्त्वपूर्ण टप्पा पूर्ण केला आहे. २००१ मध्ये सुरू झालेल्या रांजणगाव येथील या १५ एकरच्या प्रकल्पात आतापर्यंत ६०० कोटी रुपयांहून अधिक गुंतवणूक झाली असून, कंपनीच्या 'भारतात, भारतासाठी' या बांधिलकीचे हे महत्त्वाचे उदाहरण ठरले आहे.

वर्षाला ६२,१०० टन उत्पादन क्षमता असलेल्या या प्रकल्पात लेज, कुरकुरे, चीटोस, सॉलिड मस्ती आणि अंकल चिप्स या उत्पादनांची निर्मिती केली जाते. या उत्पादनांचा पुरवठा प्रामुख्याने पश्चिम आणि दक्षिण भारतातील ग्राहकांना केला जातो.

पुणे प्रकल्प हा शेतकरी, स्थानिक समुदाय, कर्मचारी, उद्योग भागीदार आणि महाराष्ट्र सरकारसोबतच्या दीर्घकालीन सहकार्याचे उदाहरण आहे. या प्रकल्पामुळे प्रत्यक्ष आणि अप्रत्यक्ष रोजगाराच्या माध्यमातून सुमारे १,४०० लोकांच्या उपजीविकेला हातभार लागला असून, महाराष्ट्रातील स्थानिक पुरवठादार आणि पूरक उद्योगांच्या वाढीलाही चालना मिळाली आहे. पेप्सिको इंडिया आणि दक्षिण आशियाचे मुख्य कार्यकारी अधिकारी जागृत कोटेचा म्हणाले, "गेल्या २५ वर्षांपासून पुणे हा पेप्सिको इंडियाच्या विकासातील महत्त्वाचा भाग आहे. भारतातील हा आमचा दुसरा खाद्यपदार्थ निर्मिती प्रकल्प आहे. या प्रकल्पाची क्षमता आता सहा पटीने वाढली असून, प्रत्यक्ष आणि अप्रत्यक्ष रोजगाराच्या माध्यमातून जवळपास १,४०० लोकांच्या उपजीविकेला हातभार लागला आहे." ते पुढे म्हणाले, "पुणे प्रकल्पाने पेप्सिको इंडियासाठी अनेक नाविन्यपूर्ण उपक्रमांची सुरुवात केली आहे. देशातील पहिली स्वयंचलित मालरचना प्रणाली आणि बटाट्याचे डिजिटल स्वयंचलित प्रतवारीकरण यांसारख्या उपक्रमांपासून पाण्याचा वापर कमी करणाऱ्या पुनर्वापर तंत्रज्ञानापर्यंत अनेक प्रयोग येथे झाले आहेत. २०२२ पासून हा प्रकल्प शून्य द्रव उत्सर्जन प्रकल्प म्हणून कार्यरत आहे."

पुणे प्रकल्पाचे यश स्थानिक कृषी व्यवस्थेशीही जोडलेले आहे. पेप्सिको इंडिया महाराष्ट्रातील शेकडो शेतकऱ्यांसोबत भागीदारी करून प्रकल्पासाठी कच्चा माल मिळवते. या माध्यमातून पिकांचे उत्पादन आणि गुणवत्ता सुधारण्याबरोबरच पुनरुज्जीवनक्षम शेती पद्धतींनाही प्रोत्साहन दिले जात आहे. महाराष्ट्र आणि गुजरातसह प्रमुख राज्यांमधील बटाटा उत्पादक भागीदार शेतांमध्ये कंपनीने १०० टक्के सूक्ष्म सिंचनाचा वापर साध्य केला आहे. पेप्सिकोच्या शाश्वत विकासाच्या धोरणांतर्गत पुणे प्रकल्पात आधुनिक उत्पादन तंत्रज्ञानासोबत पर्यावरणपूरक पद्धतींचाही अवलंब करण्यात आला आहे.

### सहा गावांमध्ये जलसंधारणाचा उपक्रम

पेप्सिको इंडियाचा पुण्यातील शाश्वत जलस्रोत विकास आणि व्यवस्थापन कार्यक्रम स्थानिक समुदायांच्या सहभागातून जलसंधारण आणि जलपुनर्भरणावर भर देतो. सहा गावांमध्ये राबविण्यात येणाऱ्या या उपक्रमाचा सुमारे १५ हजार नागरिकांना फायदा होत आहे. जलस्रोतांचे शाश्वत व्यवस्थापन करण्याची स्थानिक क्षमता वाढविण्यासोबतच या भागात १०० टक्क्यांहून अधिक पाणी पुनर्भरणास मदत होत आहे. पुणे प्रकल्पाच्या २५ वर्षांच्या प्रवासातून उत्पादन, नाविन्य, शाश्वतता आणि सर्वसमावेशक विकास यांचा समन्वय साधण्याच्या पेप्सिको इंडियाच्या प्रयत्नांचे दर्शन घडते. स्थानिक पातळीवर मूल्यनिर्मिती आणि रोजगाराला चालना देत महाराष्ट्राच्या आर्थिक विकासात योगदान देण्याबरोबरच देशभरातील ग्राहकांना दर्जेदार उत्पादने उपलब्ध करून देण्यात हा प्रकल्प महत्त्वाची भूमिका बजावत आहे.

प्रकल्पाला सध्या आवश्यक असलेल्या विजेपैकी ९८.६ टक्के वीज अक्षय ऊर्जास्रोतांमधून मिळते. गेल्या सलग सहा वर्षांपासून प्रकल्पाने शून्य भूसाठवण कचऱ्याचा दर्जा कायम ठेवला आहे. नोव्हेंबर २०२२ पासून तो शून्य द्रव उत्सर्जन प्रकल्प म्हणून कार्यरत असून, लागू असलेल्या विस्तारित उत्पादक जबाबदारीच्या नियमांचेही पालन केले जाते. बटाट्यातील ओलावा पुन्हा मिळवण्याच्या तंत्रज्ञानासह विविध नाविन्यपूर्ण पद्धतींचा वापर येथे केला जातो. बटाटे धुतल्यानंतर निर्माण होणारे स्टार्चयुक्त पाणी पुन्हा उत्पादन प्रक्रियेत वापरले जाते.


तसेच तळण्याच्या प्रक्रियेत निर्माण होणारी वाफ गोळा करून तिच्यावर प्रक्रिया केली जाते आणि वापरण्यायोग्य पाण्यात तिचे रूपांतर केले जाते. या उपायांमुळे वर्षाला सुमारे २५५ दशलक्ष लिटर पाण्याची बचत झाली असून, हे प्रमाण सुमारे १,३०० कुटुंबांच्या एका वर्षाच्या पाण्याच्या गरजेइतके आहे.

## चारमिनार बिर्लानू अल्ट्रा-प्रीमियम रूफ्स

### प्रत्येक ऋतूत आकर्षक, मजबूत आणि देखणे छत

■ पुणे (दै. संध्या)

काही दशकांपासून फायबर सिमेंट रूफिंगला मजबूती आणि टिकाऊपणासाठी पसंती दिली जात आहे. मात्र, बदलत्या ग्राहक अपेक्षांमुळे या क्षेत्राचे स्वरूप आता वेगाने बदलत आहे. आज ग्राहकांना केवळ दीर्घकाळ टिकणारे छत नको आहे, तर दीर्घकाळ आपले सौंदर्य आणि पृष्ठभागाचा दर्जा कायम ठेवणारे रूफिंग सोल्युशनही अपेक्षित आहे. विशेषतः भारतातील निवासी आणि व्यावसायिक बांधकाम क्षेत्रात, मुसळधार पाऊस, आर्द्रता आणि बदलत्या हवामानाचा सामना करताना छताची कार्यक्षमता आणि देखणेपणा टिकवून ठेवणे महत्त्वाचे ठरत आहे. हवामानामुळे होणारी झीज कमी करणे, पृष्ठभागाचा फिनिश कायम राखणे आणि देखभालीची आवश्यकता कमी करणे या




बाबी आता रूफिंगच्या निवडीतील महत्त्वाचे निकष बनले आहेत.

या बदलत्या गरजा लक्षात घेऊन चारमिनार बिर्लानू अल्ट्रा-प्रीमियम फायबर सिमेंट रूफ्स विकसित करण्यात आले आहेत. निवासी तसेच व्यावसायिक वापरासाठी तयार करण्यात आलेले हे रूफिंग सोल्युशन फायबर सिमेंटच्या मूलभूत कार्यक्षमतेसोबत अधिक उत्कृष्ट पृष्ठभाग गुणवत्ता देण्यावर भर देते.

## प्लॅटिनमआरएक्समुळे देशात कुठूनही पालकांची मासिक औषधे मागवणे शक्य

### नियमित औषधांच्या खर्चात ६० टक्क्यांपर्यंत बचतीचा दावा; १९ हजारांहून अधिक पिनकोडवर वितरण

■ बंगळुरू (दै. संध्या)

नोकरी किंवा व्यवसायानिमित्त वेगवेगळ्या शहरांमध्ये राहणाऱ्या तरुण व्यावसायिकांना त्यांच्या पालकांची नियमित औषधे घरपोच मागवता यावीत, यासाठी प्लॅटिनमआरएक्स हे व्यासपीठ सुविधा देत आहे. कंपनीच्या माहितीनुसार, या माध्यमातून नियमित औषधांच्या खर्चात ६० टक्क्यांपर्यंत बचत होऊ शकते.

या व्यासपीठावर डॉक्टरांनी लिहून दिलेल्या औषधांमधील समान औषधी घटक आणि गुणवत्तेची परवडणारी पर्यायी औषधे उपलब्ध करून दिली जातात. पालकांपासून दूर राहणाऱ्या तरुणांना मधुमेह, उच्च रक्तदाब, कोलेस्ट्रॉल आणि हृदयविकार यांसारख्या दीर्घकालीन आजारांसाठी लागणारी औषधे थेट त्यांच्या पालकांच्या घरी मागवता येतात. कंपनीच्या माहितीनुसार, प्लॅटिनमआरएक्सच्या माध्यमातून आतापर्यंत १० लाखांहून अधिक ग्राहकांनी औषधांच्या खर्चात एकत्रितपणे १३७ कोटी रुपयांपेक्षा जास्त बचत केली आहे. सध्या भारतातील १९ हजारांहून अधिक पिनकोडवर औषधांची वितरण सुविधा उपलब्ध आहे. त्यामुळे बंगळुरू, हैदराबाद किंवा चेन्नईसारख्या शहरांत काम करणाऱ्या व्यक्तींना आपल्या मूळ गावी राहणाऱ्या पालकांसाठी औषधांची ऑर्डर देता येते. नोकरीसाठी घरापासून दूर जाणाऱ्या तरुणांची संख्या वाढत असल्याने ही सुविधा उपयुक्त ठरत आहे. पालकांपासून दूर राहून त्यांची आरोग्याची जबाबदारी सांभाळताना औषधांचे प्रिस्क्रिप्शन जपणे, वेळेवर औषधे पुन्हा मागवणे आणि दीर्घकालीन उपचारांचा वाढता खर्च सांभाळणे, अशी अनेक आव्हाने तरुणांसमोर असतात.

उदाहरणार्थ, बंगळुरूमध्ये काम करणाऱ्या एखाद्या तंत्रज्ञान क्षेत्रातील व्यावसायिकाला लखनौमध्ये राहणाऱ्या मधुमेहग्रस्त पालकांची मासिक औषधे घरपोच मागवता येऊ शकतात. कंपनीच्या माहितीनुसार, कुटुंबाचा औषधांवरील मासिक खर्च सुमारे ५ हजार रुपये असल्यास, डॉक्टरांच्या प्रिस्क्रिप्शननुसार उपलब्ध परवडणारा पर्याय निवडल्यास सुमारे ३ हजार रुपयांपर्यंत बचत होऊ शकते.

## इकोटेक व्होल्ट लॉन्च, बॅटरी बॅकअपसह बीएलडीसी सीलिंग फॅन

■ नवी दिल्ली (दै. संध्या)

ओरिएंट इलेक्ट्रिक लिमिटेड, विविधीकृत ३ अब्ज अमेरिकन डॉलर्स सीकेए बिरला ग्रुपचा भाग, यांनी अंगभूत बॅटरी बॅकअपसह इकोटेक व्होल्ट बीएलडीसी सीलिंग फॅन लॉन्च केला आहे. हा फॅन देशातील घरांमधील सर्वात मोठ्या समस्यांपैकी एक असलेल्या वीज कपातीवर उपाय देतो आणि इन्व्हर्टर किंवा बाह्य पॉवर बॅकअपशिवाय 10 तासांपर्यंत अखंड थंडावा देतो. वीज कपातीमुळे भारतीय घरांमधील झोप, काम आणि दैनंदिन दिनचर्या सतत विस्कळीत होत असतात. इकोटेक व्होल्ट या समस्येवर उपाय म्हणून दीर्घकाळ टिकणारी रिचार्जेबल बॅटरी फॅनमध्ये सहजपणे एकत्रित केली आहे. याचा परिणाम म्हणजे अधिक स्मार्ट, किफायतशीर फॅन जो वीज नसतानाही घरांना आरामदायी ठेवतो. रवींद्र सिंह नेगी, मॅनेजिंग डायरेक्टर आणि सीईओ, ओरिएंट इलेक्ट्रिक यांनी सांगितले, "इकोटेक व्होल्टचे लॉन्च हे ग्राहकांच्या खऱ्या गरजा



पूर्ण करणाऱ्या नवकल्पनांच्या आमच्या वचनबद्धतेतील आणखी एक पाऊल आहे. वीज कपातीमुळे अजूनही लाखो घरांवर परिणाम होत आहे आणि इकोटेक व्होल्टसह आम्ही पुन्हा एकदा सीलिंग फॅनचे पुनर्रचना केली आहे, जेणेकरून ग्राहकांना सर्वाधिक गरज असताना अखंड आराम मिळावा. यामधील अंगभूत बॅटरी बॅकअप वीज गेल्यावर 10 तासांपर्यंत सतत थंडावा देतोच, शिवाय इन्व्हर्टर असलेल्या घरांमध्ये इतर आवश्यक उपकरणांसाठी इन्व्हर्टरची क्षमता मोकळी करतो आणि इन्व्हर्टर नसलेल्या घरांसाठी विश्वासार्ह उपाय ठरतो. ओरिएंट इलेक्ट्रिकमध्ये आम्ही मानतो की सर्वोत्तम नवकल्पना त्या असतात ज्या ग्राहकांच्या गरजांच्या सखोल समजुतीतून जन्म घेतात, आणि इकोटेक व्होल्ट हे त्याचे उत्तम उदाहरण आहे." इकोटेक व्होल्टच्या केंद्रस्थानी आहे उच्च-कार्यक्षमता, ऊर्जा-कार्यक्षम २८ वॅट बीएलडीसी मोटर जी पारंपरिक इंडक्शन फॅनपेक्षा 50% कमी ऊर्जा वापरते. टिकाऊ डबल बॉल-बेअरिंग मेकॅनिझमसह तयार केलेला हा फॅन १२० व्होल्ट ते २८० व्होल्ट या विस्तृत व्होल्टेज फ्लक्चुएशन्समध्येही सातत्यपूर्ण आणि विश्वासार्ह परफॉर्मन्स देतो. ग्लेशियर ग्रे आणि व्हाईट या रंगांमध्ये उपलब्ध असलेला इकोटेक व्होल्ट स्वच्छ आणि सदाबहार डिझाइनसह घराच्या इंटिरियरला पूरक ठरतो. अंगभूत बॅटरी दीर्घकाळ टिकण्यासाठी डिझाइन केली असून 500 चार्ज सायकल्सनंतरही तिचे 80% हेल्थ टिकते. फॅनसोबत 3 वर्षांची वॉरंटी दिली जाते.

## गिनीज विक्रम; १२ तासांत ३५२ ॲनोरेक्टल तपासण्या

■ पुणे (दै. संध्या)

कोलोरेक्टल आरोग्यसेवा क्षेत्रात कार्यरत हीलिंग हँड्स फाऊंडेशनने १२ तासांत ३५२ पात्र व्यक्तींची ॲनोरेक्टल तपासणी करून गिनीज वर्ल्ड रेकॉर्डमध्ये नोंद केली आहे. वर्ल्ड पाईल्स डेच्या निमित्ताने २० नोव्हेंबर २०२५ रोजी आयोजित विशेष




समुदाय आरोग्य उपक्रमात हा विक्रम नोंदविण्यात आला. पुण्यात आयोजित या उपक्रमांतर्गत मोठ्या प्रमाणावर मोफत ॲनोरेक्टल तपासणी तसेच जनजागृती मोहीम राबविण्यात आली. मूळव्याध, गुदभेग आणि भगंदर यांसारख्या आजारांवर वेळेत उपचार घेण्यासाठी नागरिकांना प्रोत्साहित करणे हा या मोहिमेचा उद्देश होता. संकोच, आजारांबाबत अपुरी माहिती आणि निदानास होणारा विलंब यामुळे अनेक रुग्ण या आजारांकडे दुर्लक्ष करतात. हीलिंग हँड्स फाऊंडेशनने १२ संस्थांच्या सहकार्याने पुणे जिल्ह्यातील ग्रामीण आणि निमशहरी भागात जनजागृती उपक्रम राबविले. या माध्यमातून २० हजारांहून अधिक जनजागृती साहित्याचे वाटप करण्यात आले. नागरिकांना आजारांचे वेळीच निदान आणि उपचारांचे महत्त्व समजावून सांगण्यात आले. ही तपासणी मोहीम हीलिंग हँड्स क्लिनिक, पुणे स्टेशन येथे ६० आरोग्यसेवा व्यावसायिक आणि स्वयंसेवकांच्या बहुविद्याशाखीय पथकाने राबविली. सलग १२ तास चाललेल्या या मोहिमेत रुग्णांची नोंदणी, वैद्यकीय तपासणी, व्हिडिओ प्रोक्टोस्कोपी, समुपदेशन, औषधवाटप आणि संसर्ग नियंत्रणाच्या नियमांचे पालन करण्यात आले.

## iQOO Z11 5G भारतात लॉंच; AI उत्पादकता आणि MediaTek Dimensity 7500 Turbo प्रोसेसरसह

■ नवी दिल्ली (दै. संध्या)

उच्च-कार्यक्षमता स्मार्टफोन ब्रँड iQOO ने भारतात iQOO Z11 5G स्मार्टफोन लॉंच केला आहे. विद्यार्थ्यांचे दैनंदिन जीवन अधिक उत्पादक, कार्यक्षम आणि सोपे करण्याच्या उद्देशाने तयार करण्यात आलेल्या या स्मार्टफोनमध्ये कृत्रिम बुद्धिमत्ता आधारित उत्पादकता वैशिष्ट्ये, MediaTek Dimensity 7500 Turbo प्रोसेसर, मोठा उच्च-गुणवत्तेचा डिस्प्ले आणि दीर्घकाळ टिकणारी बॅटरी देण्यात आली आहे. कंपनीने यासोबत ५० तासांच्या बॅटरी क्षमतेसह iQOO Buds देखील सादर केले आहेत. iQOO Z11 5G मध्ये थेट व्याख्यानांचा सारांश तयार करणे, ध्वनिमुद्रणाचे लेखी रूपांतर, भाषांतर, असाइनमेंट सुधारणा, दस्तऐवजांवर काम करणे आणि सामग्री तयार करणे यांसारखी कृत्रिम बुद्धिमत्ता आधारित वैशिष्ट्ये देण्यात आली आहेत.

**चार प्रकारांमध्ये उपलब्ध**

iQOO Z11 5G ची किंमत पुढीलप्रमाणे आहे :

६ जीबी + १२८ जीबी – ₹३४,९९९;
प्रभावी किंमत ₹३१,४९९
८ जीबी + १२८ जीबी – ₹३९,९९९;
प्रभावी किंमत ₹३५,९९९




८ जीबी + २५६ जीबी – ₹४४,९९९;
प्रभावी किंमत ₹४०,९९९
१२ जीबी + २५६ जीबी – ₹४९,९९९;
प्रभावी किंमत ₹४५,९९९

हा स्मार्टफोन सेलेस्टियल ब्लू आणि अरोरा ग्रीन या दोन रंगांमध्ये उपलब्ध होणार आहे. २५ ऑगस्ट २०२६ पासून iQOO ई-स्टोअर, Amazon.in, Vivo एक्सक्लुझिव्ह स्टोअर्स, रिलायन्स डिजिटल आणि निवडक किरकोळ दुकानांमध्ये विक्री सुरू होईल.

iQOO Buds ची किंमत आणि प्रभावी किंमत मात्र कंपनीने दिलेल्या माहितीत निश्चित करण्यात आलेली नाही. त्यांची विक्री २४ ऑगस्टपासून Amazon.in वर सुरू होणार आहे.


## महाराष्ट्र शासन

सार्वजनिक बांधकाम विभाग, पुणे- ४११ ००१

दुरध्वनी क्रमांक ०२०/२६१२२४८५ व २६१२२४१४ फॅक्स क्र.०२०/२६१२२४८५

Web- www.mahapwd.gov.in & e-mail- pune.ee@mahapwd.gov.in

*ई-निविदा सूचना क्रमांक २९ सन २०२६-२०२७*

कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग, पुणे मध्यवर्ती इमारत आवार पुणे १ (दुरध्वनी क्रमांक ०२०-२६१२२४८५/२६१२२४१४) हे महाराष्ट्र शासन सार्वजनिक बांधकाम विभाग, शासन निर्णय क्रमांक सीएटी/२०१७/प्र. क्र. ०८/इमा-२, दिनांक २७/९/२०१८ व शासन सा. बां. विभाग मुंबई परिपत्रक क्र. सीएटी/२०१७/प्र. क्र. ८/इमा-२, दिनांक २२/१०/२०१८ आणि शासन सा. बां. विभाग, मंत्रालय, मुंबई शासन निर्णय क्रमांक सीएटी-२०१७/प्र. क्र. ८/इमा-२, दिनांक २०/५/२०२१ आणि शासन निर्णय क्र. सीएटी/२०१७/प्र. क्र. ०८/इमा-२, दिनांक ३१/०८/२०२३ आणि शासन निर्णय क्र. संकीर्ण-२०२२/ प्र. क्र. १०४/इमा-२, दिनांक १४/२/२०२५ अन्वये नोंदणीकृत अथवा अनोंदणीकृत आणि निविदेमधील दिलेल्या पात्रता पुर्ण करत असलेल्या कंत्राटदारांकडून **रू. १००.०० लक्षपेक्षा जास्त किंमतीचे कामासाठी बी-१ नमुन्यातील निविदा ई-निविदा** प्रणालीद्वारे (ऑनलाईन) मागवित आहेत.

निविदा कागदपत्रे शासनाच्या संकेतस्थळ https://mahatenders.gov.in येथून डाऊनलोड करण्यांत यावीत. तसेच निविदा स्विकारण्याचा अथवा नाकारण्याचा अधिकार कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग, पुणे - १ यांनी राखून ठेवलेला आहे. अट असलेली निविदा स्विकारली जाणार नाही.

| | | |
|---|---|---|
| ई-निविदा उपलब्ध/ऑनलाईन विक्री कालावधी आणि निविदा सादर करावयाचा कालावधी | :- | दिनांक २१/०८/२०२६ सकाळी १०.०० वा.ते दिनांक २८/०८/२०२६ सांयकाळी १८.०० वाजेपर्यंत. |
| निविदा पुर्व चर्चा बैठक | :- | दि. २४/०८/२०२६ रोजी वेळ दुपारी १५.०० वाजता. मा. अधीक्षक अभियंता, सा. बां. मंडळ, पुणे, जुनी मध्यवर्ती इमारत, तळमजला, पुणे १ यांचे कार्यालयामध्ये. |
| ऑनलाईन ई निविदा उघडणेचा कालावधी | :- | दिनांक ३१/०८/२०२६ रोजी सकाळी १०.०० वा. ऑनलाईन उघडण्यात येतील. (शक्य झाल्यास) |

खालील संकेतस्थळावर ई-निविदेची सर्व माहिती उपलब्ध आहे.

1. web - www.mahapwd.gov.in (फक्त निविदा सुचना)
2. https://mahatenders.gov.in (सदर निविदा सुचनेमध्ये काही बदल होत असल्यास त्याबाबतची शुध्दीपत्रके वरील वेबसाईटवरती कळविण्यात येईल.)
3. कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग, पुणे - १ मध्यवर्ती इमारत आवार, पुणे या कार्यालयातील सुचना फलक.

सही/-
(प्रशांत शंकर खैरमोडे)
कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग, पुणे ४११ ००१.

आरओसी-२०२६-२७/क्र-५/C२३९९

## थोडक्यात पण महत्वाचे



## दहावी वार्षिक सर्वसाधारण सभा उत्साहात संपन्न

**पिंपळे सौदागर : दैनिक संध्या**

पिंपळे सौदागर येथील ऑल सिनियर सिटीझन असोसिएशनची दहावी वार्षिक सर्वसाधारण सभा तसेच दशकपूर्ती स्मरणिका प्रकाशन समारंभ उत्साहपूर्ण वातावरणात पार पडला. मंगळवार (दि.१८) रोजी गोविंद गार्डन येथील बासुरी हॉलमध्ये आयोजित करण्यात आलेल्या या कार्यक्रमास विविध क्षेत्रातील मान्यवरांची उपस्थिती लाभली. या कार्यक्रमास पिंपरी-चिंचवड भाजपाचे शहराध्यक्ष तथा नगरसेवक शत्रुघ्न (बापू) काटे, नगरसेवक विठ्ठल (नाना) काटे, नगरसेविका डॉ. कुंदा भिसे, उद्योजक संजय भिसे, पी. के. इंटरनॅशनल स्कूलचे संस्थापक जगन्नाथ काटे, पिंपरी-चिंचवड ज्येष्ठ नागरिक महासंघाच्या अध्यक्षा वृषाली मरळ, सामाजिक कार्यकर्ते संदेश काटे तसेच संघटनेचे माजी अध्यक्ष ॲड. शंकरराव पाटील प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते. कार्यक्रमाची सुरुवात दीपप्रज्वलनाने करण्यात आली. यानंतर उपस्थित मान्यवरांचा शाल व स्मृतिचिन्ह देऊन सत्कार करण्यात आला. संघटनेचे अध्यक्ष डॉ. सुभाषचंद्र पवार यांनी प्रास्ताविकातून संस्थेच्या दशकभरातील वाटचालीचा आढावा घेतला. सचिव सखाराम ढाकणे यांनी वार्षिक अहवाल सादर केला, तर कोषाध्यक्ष सुभाष पाटील यांनी संस्थेचा आर्थिक लेखाजोखा मांडला. यावेळी संस्थेच्या दशकपूर्ती स्मरणिकेचे प्रकाशन मान्यवरांच्या हस्ते करण्यात आले. तसेच वार्षिक सभेच्या निमित्ताने ज्येष्ठ कलावंतांनी भजन, अभंग आणि चित्रपट गीतांचे सादरीकरण करून उपस्थितांची मने जिंकली. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन शकुंतला शिंदे, भामिनी महाले आणि रवींद्र संधानशिवे यांनी केले. विवेकानंद लिगाडे यांनी आभार प्रदर्शन केले. राष्ट्रगीत आणि सामूहिक भोजनाने कार्यक्रमाची सांगता झाली. या यशस्वी कार्यक्रमासाठी संघटनेच्या सर्व पदाधिकारी व सदस्यांनी विशेष परिश्रम घेतल्याचे यावेळी नमूद करण्यात आले.

## शिवसेनेच्या वतीने भव्य नोकरी मेळाव्याचे आयोजन

**पिंपरी : दैनिक संध्या**

मावळ लोकसभेचे संसद रत्न खासदार श्रीरंग आप्पा बारणे यांच्या मार्गदर्शनाखाली भव्य रोजगार मेळाव्याचे आयोजन करण्यात आले आहे.रविवारी ( दि.३० ऑगस्ट) सकाळी ९ वाजता, चिंचवड गावातील चिंचवडे लॉन्स येथे याचे उद्घाटन होणार आहे अशी माहिती शिवसेना उपनेत्या व ज्येष्ठ नगरसेविका सुलभाताई उबाळे यांनी बुधवारी पत्रकार परिषदेत दिली. यावेळी पिंपरी चिंचवड महानगरपालिका शिवसेना गटनेते विश्वजीत बारणे, समन्वयक किरण राहणे, दीपक पवार आदी उपस्थित होते. या रोजगार मेळाव्यात बँकिंग, आयटी, बीपीओ, केपीओ, रिअल इस्टेट, मॅन्युफॅक्चरिंग, ऑटोमोबाईल, टेक्नॉलॉजी यांसह विविध उद्योग क्षेत्रांतील कंपन्या व उद्योग प्रतिनिधी सहभागी होणार आहेत अशी माहिती सुलभा उबाळे यांनी दिली. विश्वजीत बारणे यांनी सांगितले की, या मेळाव्यात ॲक्सिस बँक, आयसीआयसीआय बँक, टाटा मोटर्स, हुडास टेक्नॉलॉजी, विगल स्पेस, बजाज, ह्युंदाई, डॉ. रेड्डी फाउंडेशन, बीव्हीजी इंडिया अशा नामांकित आस्थापनांचे प्रतिनिधी उपस्थित राहून मुलाखती घेणार आहेत. अवघ्या पाचवी पास झालेल्या उमेदवारापासून ते आयटीआय, डिप्लोमा, पदवीधर, इंजिनिअरिंग तसेच इतर उच्चशिक्षित उमेदवारांपर्यंत सर्वांना त्यांच्या शैक्षणिक पात्रता, अनुभव आणि कौशल्यांनुसार योग्य रोजगाराच्या संधी उपलब्ध करून देण्याचा प्रयत्न या मेळाव्यात करण्यात येणार आहे. तसेच दिव्यांग बांधवांनाही रोजगाराच्या संधी उपलब्ध करून देण्यासाठी विशेष व्यवस्था करण्यात आली आहे. ज्या उमेदवारांना मेळाव्याच्या दिवशी थेट नोकरी मिळणार नाही, अशा उमेदवारांना 'खासदार शिवसेना जॉब कार्ड'चे वाटप करण्यात येणार आहे. त्यांची माहिती संकलित करून भविष्यात उपलब्ध होणाऱ्या योग्य रोजगाराच्या संधींबाबत त्यांना मार्गदर्शन करून संधी उपलब्ध करून देण्यात येणार आहेत. सहभागी उमेदवारांना भविष्यातील रोजगाराच्या संधींशी जोडणारा हा उपक्रम आहे. महिलांसाठीही या मेळाव्यात स्वयंरोजगार, उद्योजकता, कौशल्य विकास व व्यवसायाच्या संधींबाबत मार्गदर्शन आणि प्रशिक्षण उपलब्ध करून देण्यात येणार आहे. महिलांना नोकरीसोबतच स्वतःचा व्यवसाय उभारण्याच्या संधींबाबत माहिती देऊन आर्थिकदृष्ट्या सक्षम करण्याचा प्रयत्न या माध्यमातून करण्यात येणार आहे.

## प्रकरणे निकाली काढण्याचे निर्देश; अन्यथा अधिवेशनात अधिकाऱ्यांना धारेवर धरणार!

**पिंपरी : दैनिक संध्या**

पिंपरी-चिंचवड शहरातील विविध विकासकामांसाठी आवश्यक असलेल्या भूसंपादनाच्या प्रलंबित प्रकरणांना गती देण्यासाठी भाजपा आमदार महेश लांडगे यांनी जिल्हा प्रशासनाला स्पष्ट 'अल्टिमेटम' दिला आहे. सादर झालेली भूसंपादनाची प्रकरणे पुढील दीड महिन्यात निकाली काढावीत; अन्यथा येत्या अधिवेशनात संबंधित अधिकाऱ्यांना धारेवर धरले जाईल, असा इशारा आमदार लांडगे यांनी दिला. विशेष म्हणजे, नाशिक फाटा ते खेड एलिव्हेटेड कॉरिडॉरसाठी भूसंपादन १०० टक्के होत आहे. त्याची कार्यवाही अंतिम टप्प्यात आहे, असे जिल्हाधिकारी यांनी सांगितले आहे. त्यामुळे पुणे-नाशिक महामार्ग रुंदीकरण प्रकल्पाला गती मिळणार आहे. पुणे जिल्हाधिकारी जितेंद्र डुडी यांच्या उपस्थितीत भूसंपादनासंदर्भात महत्त्वपूर्ण बैठक घेण्यात आली. यावेळी नगररचना, जिल्हा प्रशासन, भूसंपादन विभाग, भूमी अभिलेख तसेच संबंधित विभागांचे अधिकारी उपस्थित होते. पिंपरी-चिंचवड महानगरपालिकेने यापूर्वी सादर केलेल्या विविध भूसंपादन प्रस्तावांचा बैठकीत आढावा घेण्यात आला. यावेळी बैठकीस उपसंचालक, नगररचना विभाग श्री. खोब्रागडे, उपअधीक्षक, भूमी अभिलेख हवेली श्री. गोफणे; नगर भूमापन अधिकारी श्री. ननावरे; कृषी अधिकारी मूल्यांकन श्री. धस; वनाधिकारी श्री. यादव; भूसंपादन अधिकारी गट क्रमांक १ व २ सौ. विश्वासराव; कार्यकारी अभियंता श्री. चौरे, 'फ' क्षेत्रीय कार्यालय; सहाय्यक संचालक, नगररचना श्री. खडतरे; तसेच भूसंपादन समन्वय अधिकारी तथा नायब तहसीलदार श्री. ब्रह्मे यांच्यासह संबंधित अधिकारी उपस्थित होते. महापालिकेकडून भूसंपादनाचे प्रस्ताव यापूर्वीच संबंधित विभागाकडे सादर करण्यात आले आहेत. त्यामुळे आता प्रस्ताव कधी सादर करायचा, यापेक्षा सादर झालेल्या प्रत्येक प्रस्तावावर पुढील कार्यवाही कोणत्या विभागाने, कोणत्या अधिकाऱ्याने आणि किती दिवसांत करायची, हे निश्चित करणे आवश्यक आहे, अशी भूमिका आमदार लांडगे यांनी मांडली. महापालिकेकडून आवश्यक असलेली अतिरिक्त माहिती किंवा कागदपत्रे मागविण्यात आल्यास ती सात दिवसांच्या आत उपलब्ध करून देण्याचे निर्देश देण्यात आले. तसेच प्रत्येक प्रस्तावासाठी महापालिकेचा नोडल अधिकारी निश्चित करून जिल्हा प्रशासनाशी सातत्याने समन्वय ठेवण्याच्या सूचना करण्यात आल्या. जिल्हाधिकारी कार्यालयातील भूसंपादन विभागाने महापालिकेकडून यापूर्वी सादर झालेल्या सर्व प्रस्तावांची प्रकरणनिहाय सद्यस्थिती तयार करावी, कोणत्या प्रकरणावर कोणती कार्यवाही प्रलंबित आहे, याची स्पष्ट यादी महापालिकेला उपलब्ध करून द्यावी, असेही निर्देश देण्यात आले. भूसंपादन प्रक्रियेतील महत्त्वाचा टप्पा असलेल्या मोजणीच्या प्रकरणांनाही गती देण्याचे निर्देश देण्यात आले. भूमी अभिलेख व मोजणी कार्यालयाकडे प्राप्त होणाऱ्या प्रकरणांची स्वतंत्र नोंद ठेवून आवश्यक मोजणीची कार्यवाही १५ दिवसांत पूर्ण करण्याचे नियोजन करण्याच्या सूचना देण्यात आल्या. मोजणी नकाशा, क्षेत्रफळ आणि हद्द निश्चितीचा अहवाल भूसंपादन विभागाला तातडीने उपलब्ध करून द्यावा. मोजणीसाठी प्रलंबित प्रकरणांचा स्वतंत्र आढावा घेऊन त्यावर साप्ताहिक कार्यवाही करण्याचेही निर्देश देण्यात आले. तसेच, भूसंपादनाची प्रकरणे वेगाने निकाली काढण्यासाठी मनुष्यबळाची कमतरता दूर करणे आवश्यक असल्याचेही आमदार लांडगे यांनी निदर्शनास आणून दिले. भूसंपादन कार्यालयातील ११ मंजूर पदांपैकी केवळ ४ पदे कार्यरत असून ७ पदे रिक्त आहेत. त्यामुळे पूर्णवेळ भूसंपादन अधिकारी नियुक्त करण्याबरोबरच मंजूर संपूर्ण मनुष्यबळ उपलब्ध करून देण्याची मागणी करण्यात आली.

# तिसऱ्या व चौथ्या रेल्वे मार्गिकेची कालमर्यादा स्पष्ट करा

## शिवसेना खासदार श्रीरंग बारणे यांची रेल्वे प्रशासनाला सूचना

■ पिंपरी (दै. संध्या)

पुणे–लोणावळा तिसऱ्या व चौथ्या रेल्वे मार्गाच्या कामाला गती देऊन काम पूर्ण होण्याची निश्चित कालमर्यादा स्पष्ट करावी. तळेगाव, पिंपरी, देहूरोड आणि चिंचवड या प्रमुख स्थानकांवर मेल, एक्स्प्रेस गाड्यांना थांबे देणे तसेच अतिरिक्त आरक्षित डब्यांची सुविधा उपलब्ध करावी. अमृत भारत स्टेशन योजनेंतर्गत चिंचवड, आकुर्डी, देहूरोड, तळेगाव आणि लोणावळा स्थानकांवरील कामांमध्ये आवश्यक सुधारणा करून ती तत्काळ पूर्ण करण्याची सूचना शिवसेना खासदार श्रीरंग बारणे यांनी केली.

खासदार श्रीरंग बारणे यांच्या अध्यक्षतेखाली पुणे आणि सोलापूर रेल्वे विभागाची आढावा बैठक पार पडली. पुणे, मावळ, पिंपरी-चिंचवड आणि सोलापूर विभागातील रेल्वे प्रवाशांच्या सोयी-सुविधा, सुरक्षितता आणि प्रलंबित प्रश्नांबाबत यावेळी सविस्तर चर्चा करण्यात आली. केंद्रीय राज्यमंत्री मुरलीधर मोहोळ, खासदार बजरंग सोनवणे, विशाल पाटील, डॉ. अमोल कोल्हे, भास्कर भगरे, मेधा कुलकर्णी, ज्योती वाघमारे, बालाजी काळगे, धैर्यशील माने, ओमराजे निंबाळकर, निलेश लंके, धैर्यशील मोहिते पाटील, मध्य रेल्वेचे महाव्यवस्थापक राजीव श्रीवास्तव, उपमहाव्यवस्थापक कृष्ण किशोर मिश्रा, पुणे रेल्वे व्यवस्थापक राजेश कुमार वर्मा, प्रधान मुख्य वाणिज्य व्यवस्थापक प्रभात कुमार, प्रधान मुख्य अभियंता रजनीश माथुर, मुख्य प्रशासकीय अधिकारी भुवनेश कुमार गुप्ता तसेच रेल्वे विभागातील संबंधित अधिकारी उपस्थित होते. खासदार बारणे म्हणाले, कामशेत एलजी गेट क्रमांक ४२ येथील सबवेमध्ये पाणी साचण्याच्या समस्येवर कायमस्वरूपी उपाय म्हणून आरओबी अथवा योग्य पर्यायी मार्ग उपलब्ध करावेत. मळवली एलजी गेट क्रमांक ३२ येथील प्रलंबित आरओबीचे काम लवकरात लवकर पूर्ण करून पर्यायी रस्त्याची दुरुस्ती करावी. केशवनगर–वडगाव गेट क्रमांक ४९ जवळील अंडरपास सुरू करावा. जांभुळवाडी येथील अंडरपासजवळील रस्त्याची दुरुस्ती करून खड्डे व पाणी साचण्याची समस्या



दूर करत काम पूर्ण करावे. पुण्याकडून येणाऱ्या महत्त्वाच्या एक्स्प्रेस गाड्यांमध्ये गर्दीमुळे पिंपरी-चिंचवडमधील प्रवाशांना चढण्यासाठी पुरेशी जागा मिळत नसल्याने आवश्यक अतिरिक्त सुविधा व व्यवस्था उपलब्ध कराव्यात.

फुगेवाडी येथील सुरू असलेल्या पुश पुलाच्या कामामुळे स्मशानभूमी व दफनभूमीकडे जाणारा पूर्वीचा मार्ग आरटीओशी समन्वय साधून लवकरात लवकर पुन्हा सुरू करणे तसेच काम पूर्ण होईपर्यंत नागरिकांसाठी पायी जाण्याचा मार्ग सुरू ठेवण्यात यावा. प्रगती एक्स्प्रेस, महालक्ष्मी एक्स्प्रेस आणि चेन्नई एक्स्प्रेसला चिंचवड रेल्वे स्थानकावर थांबा द्यावा. पुणे–लोणावळा मार्गावर प्रवाशांची गैरसोय लक्षात घेऊन दुपारच्या वेळेत अतिरिक्त लोकल सुरू करावी. कोविड काळात बंद करण्यात आलेले रेल्वे गाड्यांचे थांबे पुन्हा सुरू करावेत. सह्याद्री एक्स्प्रेस पूर्ववत मुंबईपर्यंत सुरू करावी.

## १०० हून अधिक सीसीटीव्ही फुटेजच्या मदतीने सराईत चोरटा गजाआड

■ वाकड(दै. संध्या)

पिंपरी-चिंचवड गुन्हे शाखेच्या युनिट ३ ने उत्कृष्ट तपास कौशल्य दाखवत १०० हून अधिक सीसीटीव्ही फुटेजची पाहणी करून एका सराईत चोरट्याला अटक केली आहे. या कारवाईत चोरीस गेलेला तब्बल ४ लाख २४ हजार ४७८ रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे.

गुन्हे शाखेचे पोलीस उपायुक्त रोहिदास पवार यांनी दिलेल्या माहितीनुसार, एमआयडीसी भोसरी पोलीस ठाण्यात दाखल असलेल्या घरफोडीच्या गुन्ह्याचा तपास सुरू असताना आरोपीचा माग काढण्यासाठी विविध ठिकाणांवरील सीसीटीव्ही फुटेज तपासण्यात आले. सुमारे १०० हून अधिक फुटेजची बारकाईने पाहणी केल्यानंतर पोलिसांनी संशयिताचा शोध घेत त्याला



ताब्यात घेतले. अटकेतील आरोपीकडून चोरीतील खालील मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे – सुमारे २ लाख २८ हजार ४८० रुपये किमतीचे सोन्याचे दागिने. ६० हजार रुपये किमतीचे डायमंड पिलर्स (२७ नग). ४० हजार रुपये किमतीचे स्टेनलेस स्टीलचे पाइप व इतर साहित्य. १ लाख रुपये किमतीची मोटारसायकल. अशाप्रकारे एकूण ४ लाख २४ हजार ४७८ रुपयांचा मुद्देमाल हस्तगत करण्यात पोलिसांना यश आले.

## तुकाराम मुंढे यांना 'झेड प्लस' सुरक्षा देण्याची मागणी

■ पिंपरी (दै. संध्या)

अन्न व औषध प्रशासन (एफडीए) विभागाचे आयुक्त तुकाराम मुंढे यांनी अन्न व औषध भेसळ माफियांविरोधात सुरू केलेल्या कठोर कारवाईमुळे त्यांच्या जीवितास गंभीर धोका निर्माण झाल्याचा दावा करत त्यांना तातडीने 'झेड प्लस' सुरक्षा देण्याची मागणी करण्यात आली आहे. याबाबत सामाजिक कार्यकर्ते मारुती भापकर यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस तसेच उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि सुनित्रा अजित पवार यांना निवेदन पाठविले आहे.

निवेदनात म्हटले आहे की, एफडीए आयुक्त तुकाराम मुंढे यांच्या नेतृत्वाखाली राज्यभर सुरू असलेल्या कारवाईमुळे अन्न व औषध भेसळ करणाऱ्या माफियांचे मोठ्या प्रमाणात आर्थिक नुकसान होत असून त्यांच्या बेकायदेशीर कारभाराला आळा बसत आहे. त्यामुळे संबंधित माफियांकडून मुंढे यांच्या जीवितास धोका निर्माण झाल्याची माहिती विश्वसनीय सूत्रांकडून मिळाल्याचा दावा निवेदनात करण्यात आला आहे.

मारुती भापकर यांनी राज्य सरकारला विनंती करताना म्हटले आहे की, तुकाराम मुंढे हे प्रामाणिक, कर्तृत्ववान आणि धाडसी आयएएस अधिकारी असून त्यांच्या सुरक्षेची जबाबदारी राज्य सरकारने घ्यावी.

त्यांच्या जीविताला कोणताही धोका निर्माण होऊ नये यासाठी तातडीने 'झेड प्लस' सुरक्षा प्रदान करावी.

या निवेदनावर मारुती भापकर यांच्यासह मानव कांबळे, डॉमिनिक लोबो, राजू साबळे आणि प्रकाश जाधव यांच्या स्वाक्षऱ्या आहेत.

## खान्देश सार्वजनिक कानबाई माता उत्सव २०२६ "ची जय्यत तयारी सुरू

■ पिंपरी (दै. संध्या)

पिंपरी-चिंचवड आणि पुणे परिसरात वास्तव्यास असलेल्या खान्देशवासीयांसाठी संस्कृती, परंपरा आणि धार्मिक सणाचा वारसा पुढील पिढ्यांपर्यंत अखंडितपणे पोहोचवण्याच्या उद्देशाने आयोजित तिसऱ्या 'भव्य खान्देश सार्वजनिक कानबाई माता उत्सव २०२६' च्या तयारीनिमित्त शिवनगरी येथील तुळजाभवानी मंदिरात नुकतीच एक महत्त्वाची बैठक पार पडली. खानदेश सार्वजनिक कानबाई उत्सव मंडळातर्फे आगामी २२ ऑगस्ट ते २४ ऑगस्ट २०२६ या कालावधीत हा सोहळा अत्यंत थाटामाटात साजरा केला जाणार आहे.

या भव्य महोत्सवाच्या विविध कार्यक्रमांसाठी राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, भारतीय जनता पार्टीचे प्रदेशाध्यक्ष रविंद्र चव्हाण, जलसंपदा मंत्री गिरीश महाजन, मंत्री चंद्रकांत पाटील, मंत्री संजय सावकारे, आणि मंत्री जयकुमार रावल आदी दिग्गज मान्यवर प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित राहणार आहेत. तीन दिवसीय उत्सवाचे सविस्तर वेळापत्रक.. शनिवार, २२ ऑगस्ट २०२६ (सत्ता पूजन): उत्साहाच्या शुभारंभानिमित्त सायंकाळी ५ वाजता तुळजाभवानी मंदिर, शिवनगरी, बिजलीनगर, चिंचवड येथे 'सप्ताह पूजन' (गहू दळणे) हा पारंपरिक धार्मिक कार्यक्रम पार पडेल. दुपारी २ ते ७: तुळजाभवानी मंदिर, शिवनगरी येथून शुभम गार्डन, वाल्हेकरवाडीपर्यंत कानबाई माता आगमन भव्य मिरवणूक काढली जाईल. या मिरवणुकीत शिरपूरची प्रसिद्ध 'गोल्डन बँड' आणि अमळनेरची 'राधेकृष्णा बँड' विशेष आकर्षण असणार आहे.

## नागरिकांच्या मूलभूत सुविधांना आमदार शेळके यांचे प्राधान्य

■ तळेगाव दाभाडे (दै. संध्या)

नागरिकांना आवश्यक असलेल्या मूलभूत सोयी-सुविधा उपलब्ध करून देणे आणि सर्वसमावेशक विकासकामे नियोजित वेळेत पूर्ण करणे, हा आपल्या कामाचा मुख्य ध्यास असल्याचे आमदार सुनील शेळके यांनी स्पष्ट केले. तळेगाव दाभाडे येथील बनेश्वर स्मशानभूमी परिसरातील सुधारणा तसेच परिसरातील रस्त्यांच्या विकासकामांची त्यांनी आज प्रत्यक्ष ठिकाणी भेट देऊन सविस्तर पाहणी केली.

नागरिकांच्या जीवनातील प्रत्येक टप्प्यावर आवश्यक असणाऱ्या सुविधा सक्षम असणे गरजेचे आहे. त्याच भावनेतून बनेश्वर स्मशानभूमी परिसराचा विकास करण्यात येत असून, अंत्यसंस्कार आणि उत्तरकार्याच्या वेळी नागरिकांना कोणत्याही प्रकारची गैरसोय होऊ नये, यासाठी आवश्यक त्या सर्व सुविधांचा आढावा आमदार सुनील शेळके यांनी घेतला.

स्मशानभूमी परिसराचे सुशोभीकरण, स्वच्छता, पुरेशी प्रकाशव्यवस्था, नागरिकांसाठी बसण्याची बैठक व्यवस्था, तसेच परिसरातील रस्त्यांचे काँक्रिटीकरण आणि रुंदीकरण यांसारख्या विविध कामांबाबत त्यांनी संबंधित पदाधिकारी व अधिकाऱ्यांकडून माहिती घेतली. कामांची गुणवत्ता आणि नागरिकांना त्याचा प्रत्यक्ष लाभ मिळणे याला प्राधान्य देण्याच्या सूचना यावेळी करण्यात आल्या.

तळेगाव दाभाडे शहराच्या विकासामध्ये केवळ मोठ्या प्रकल्पांनाच नव्हे, तर नागरिकांच्या दैनंदिन जीवनाशी निगडित असलेल्या मूलभूत सुविधांनाही तितकेच महत्त्व दिले जात असल्याचे या पाहणीमधून दिसून आले. स्मशानभूमीसारख्या संवेदनशील ठिकाणी नागरिकांना सन्मानजनक आणि आवश्यक सुविधा उपलब्ध करून देण्याची भूमिका आमदार सुनील शेळके यांच्या लोकाभिमुख कार्यपद्धतीची प्रचिती देणारी ठरत आहे. शहरातील विविध भागांमध्ये नागरिकांना भेडसावणाऱ्या अडचणी समजून घेऊन त्या सोडवण्यासाठी प्रत्यक्ष पाहणी, संबंधित यंत्रणांशी समन्वय आणि कामांचा सातत्याने पाठपुरावा करण्यावर आमदार सुनील शेळके यांचा भर आहे. विकासकामे केवळ कागदावर न राहता ती प्रत्यक्षात नागरिकांच्या उपयोगी पडावीत, ही त्यांची भूमिका असल्याचे यावेळी दिसून आले. तळेगाव दाभाडे शहराच्या सर्वांगीण विकासासाठी आवश्यक असलेल्या कामांना प्राधान्य देत नागरिकांना अधिक चांगल्या सुविधा उपलब्ध करून देण्याचा प्रयत्न सुरू आहे. नागरिकांच्या गरजा आणि त्यांच्या अपेक्षा केंद्रस्थानी ठेवून विकासकामे पुढे नेण्याची आमदार सुनील शेळके यांची भूमिका या पाहणीच्या निमित्ताने पुन्हा एकदा अधोरेखित झाली. यावेळी नगराध्यक्ष संतोष दाभाडे यांच्यासह अन्य पदाधिकारी उपस्थित होते.

# पक्षसंघटन मजबुतीसोबत जनसामान्यांचे प्रश्न सोडवा : खा. बारणे

■ पिंपरी (दै. संध्या)

पक्षसंघटन मजबूत करण्यासोबतच जनसामान्यांचे प्रश्न सोडवण्यासाठी कार्यकर्त्यांनी पूर्ण ताकदीने झोकून देऊन काम करावे, असे आवाहन शिवसेनेचे उपनेते, खासदार श्रीरंग बारणे यांनी केले.

पिंपरी-चिंचवड शहरातील संघटनात्मक बांधणी आणि आगामी कार्यक्रमांच्या नियोजनाबाबत मंगळवारी शिवसेनेची बैठक पार पडली. यावेळी माजी खासदार उमेश पाटील, उपनेते इरफान सय्यद, उपनेत्या सुलभा उबाळे, जिल्हाप्रमुख राजेश खांडभोर, शिवसेना जिल्हाप्रमुख भगवान पोखरकर, युवासेना पश्चिम महाराष्ट्र सचिव, गटनेते विश्वजीत बारणे, शिवसेना जिल्हा समन्वयक बाळासाहेब वाल्हेकर, शिवसेना जिल्हा संघटिका शीलाताई भोंडवे, पिंपरी-चिंचवड महानगर प्रमुख राजेश फलके, मावळ तालुकाप्रमुख राम सावंत, युवासेना जिल्हाप्रमुख सागर पाचारणे,



पिंपरी-चिंचवड महिला संघटिका सरिता साने, तसेच प्रमुख पदाधिकारी यावेळी उपस्थित होते.

खासदार बारणे म्हणाले, शहरातील तिन्ही विधानसभा मतदारसंघांमध्ये १०० टक्के 'बीएलओ' नियुक्तीचे काम पूर्ण झाल्याची माहिती घेतली. उर्वरित कामेही तातडीने पूर्ण करून उर्वरित पदाधिकाऱ्यांच्या कामगिरीचा आढावा घेण्यात आला. पक्षाचे मुख्य नेते आणि उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे तसेच खासदार डॉ. श्रीकांत शिंदे हे अहोरात्र जनतेच्या संपर्कात राहून काम करत आहेत. त्याच धर्तीवर स्थानिक पातळीवरही कार्यकर्त्यांनी थेट जनतेत जाऊन काम करण्याचे निर्देश देण्यात आले. येणाऱ्या सणासुदीच्या दिवसांचा आधार घेत पक्षस्तरावर विविध सामाजिक आणि सांस्कृतिक उपक्रम राबवण्यात येणार आहे. केंद्र व राज्य सरकारच्या लोककल्याणकारी योजनांची माहिती आणि उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या माध्यमातून घेतलेले महत्त्वपूर्ण निर्णय तळागाळातील गरजू नागरिक आणि विद्यार्थ्यांपर्यंत पोहोचवण्यावर भर देण्यात येणार आहे.

पिंपरी-चिंचवड शहरात तरुणांची मोठी ताकद असल्याने कॉलेज पातळीवर युवा सेनेच्या माध्यमातून युवकांचे संघटन मजबूत केले जाईल. तरुणांचे मेळावे घेऊन त्यांच्या अडचणी सोडवण्यासाठी पाठपुरावा केला जाणार आहे. याशिवाय, शहरातील पाणी, आरोग्य आणि रस्त्यांच्या समस्यांकडे विशेष लक्ष देऊन महापालिका प्रशासनाकडून प्रलंबित कामे करून घेण्यासाठी सनदशीर मार्गाने जनजागृती करण्याचे निर्देश कार्यकर्त्यांना देण्यात आले आहेत. संघटनात्मक बांधणी आणि सामाजिक उपक्रमांच्या माध्यमातून संघटन बळकट केले जाणार असल्याचे खासदार बारणे यांनी सांगितले.

दैनिक संध्या — नि:पक्ष समीक्षणाचे... निर्भीड दैनिक
शुक्रवार, दि. २१ ऑगस्ट २०२६



## थोडक्यात पण महत्वाचे

### कंद यांची राज्य कर निरीक्षकपदी निवड

**कोरेगावमुळ : दैनिक संध्या**



लोणीकंद गावचे सुपुत्र विवेक दत्तात्रय कंद यांची महाराष्ट्र लोकसेवा आयोगाच्या (एमपीएससी) परीक्षेतून राज्य कर निरीक्षक (एसटीआय) पदावर निवड झाली आहे. कृषी उत्पन्न बाजार समितीचे माजी उपसभापती तथा संचालक रविंद्र कंद यांचे पुतणे विवेक याच्या यशाने लोणीकंद गावाच्या शिरपेचात मानाचा तुरा रोवला आहे. त्यांच्या या उल्लेखनीय यशाबद्दल लोणीकंद,वाघोली सह हवेली तालुक्यातील गावांमधून त्यांच्यावर अभिनंदनाचा वर्षाव होत आहे. विवेक कंद हे कै.दत्तात्रय हरीभाऊ कंद यांचे चिरंजीव, कै.सावकार भाऊ व कृ.उ.बाजार समितीचे माजी सभापती नारायणराव कंद यांचे नातू आहेत. तर पुणे,हवेली तालुका कृषी उत्पन्न बाजार समितीचे माजी उपसभापती तथा संचालक रविंद्र कंद यांचे पुतणे आहेत. विवेक कंद यांनी प्रतिकूल परिस्थितीवर मात करत स्पर्धा परीक्षेच्या माध्यमातून मिळविलेले हे यश तरुणांसाठी प्रेरणादायी ठरले आहे. त्यांच्या यशामुळे कुटुंबीय,मित्रपरिवार आणि ग्रामस्थांमध्ये आनंदाचे वातावरण निर्माण झाले आहे. माझे पुतणे विवेक दत्तात्रय कंद याने आपल्या प्रतिकूल परिस्थितीवर मात करीत एम.पी.एस.सी परीक्षेत यश मिळवत राज्य कर निरीक्षक पद मिळवले आहे. याचा आमच्या कंद परिवार व लोणीकंद गावाला अभिमान वाटत आनंद झाला आहे. लोणीकंद गावचे नाव राज्य स्तरावर नेहण्याचे काम आमच्या विवेकने केले आहे.त्याच्या या मेहनतीला सलाम करीत त्याला पुढील वाटचालीस शुभेच्छा देत आहोत.



### वारुळवाडी येथे साहित्यरत्न अण्णाभाऊ साठे जयंती सोहळा उत्साहात साजरा

**नारायणगाव : दैनिक संध्या**

वारूळवाडी तालुका जुन्नर येथे ग्रामपंचायत संसद भवन येथे अण्णाभाऊ साठे जयंतीचे आयोजन रविवार दिनांक 16 ऑगस्ट 2026 रोजी सकाळी 10.30 वा. आयोजन करण्यात आले होते.या कार्यक्रमाच्या निमित्ताने गरीब व मागास विद्यार्थ्यीना शालेय दप्तराचे वितरण करण्यात आले. कला,क्रीडा,साहित्य, सेवा क्षेत्रात उल्लेखनीय कार्य करणारे मान्यवर कार्यसम्राज्ञी पुरस्कार माजी नगराध्यक्षा व विद्यमान नगरसेविका वैजयंतीताई उमरगेकर आळंदी, वैद्यकीय सेवा पुरस्कार डॉ. अमेय डोके, आदर्श मुख्याध्यापक पुरस्कार रामदास भालेराव वारुळवाडी, आदर्श मुख्यध्यापिका सौ. भारती कनिंगध्वज गारखिंड, सामाजिक कार्यकर्त्या पुरस्कार सौ. ज्योती शेलार पिंपरी पेंढार,सामाजिक योगदान पुरस्कार प्रदीपकाका कुलकर्णी खेड, उत्कृष्ट नृत्यांगना पुरस्कार अश्विनी जोशी अकोले, कलारत्न पुरस्कार ताशा सम्राट निसार पटेल चिंचोली ,आदर्श पत्रकार पुरस्कार ज्ञानेश्वर केंद्रे जुन्नर, वनसेवा पुरस्कार भानुदास शिंदे शिरूर,सामाजिक कार्यकर्ते पुरस्कार दिपक लोंढे पुणे आदी मान्यवरांना सन्मानित करण्यात आले. या कार्यक्रमाच्या निमित्ताने ज्येष्ठ तमाशा सम्राज्ञी रेणुका खुडे,प्रसिद नृत्यांगना अश्विनी जोशी, प्रसिद्ध गायिका शारदा नारायणगावकर, तमाशा सम्राज्ञी नंदा भोकटे, प्रसिध्द गायक दत्ता जाधव, बालकलाकार पराग खुडे या कलावंतांनी लोकशाहीर अण्णाभाऊ साठे यांच्या चरणी आपली कला सादर केली. या कार्यक्रमाच्या निमित्ताने वारुळवाडी गावचे आदर्श सरपंच विनायक भुजबळ , राज्य पुरस्कार प्राप्त हलगी सम्राट केरबा पाटील संस्थेचे संस्थापक अध्यक्ष काशिनाथ आल्हाट, आळंदी नगरपालिकेचे माजी नगराध्यक्ष अशोक उमरगेकर, प्रसिद्ध डॉ. अमेय डोके, वनपाल अधिकारी भानुदास शिंदे आदी मान्यवरांनी साहित्यरत्न अण्णाभाऊ साठे यांच्या जीवन चरित्राचा मागोवा घेतला. या कार्यक्रमाच्या निमित्ताने पिंपरी चिंचवड महानगरपालिका अण्णाभाऊ साठे जयंती सोहळ्याचे माजी अध्यक्ष नितीन घोलप , सेवानिवृत्त पोलीस अधिकारी बाळासाहेब सकाटे,प्रसिद्ध मृदंगाचार्य भास्कर महाराज राजगुरू, सामाजिक कार्यकर्ते रघूनाथ पवार, वन कर्मचारी अनिल शिंदे,सामाजिक कार्यकर्ते सुधाकर उनवणे, संजय उनवणे, संतोष पंचरास, आदर्श माजी केंद्रप्रमुख दादाभाऊ आल्हाट , आदर्श शिक्षक बाळासाहेब राजगुरू, सामाजिक कार्यकर्ते विद्याधर खुडे, गुलाबराव शेलार, ज्येष्ठ कलावंत महादेव खुडे, संगीतरत्न दत्ता महाडिक तमाशा फडाचे संचालक संजय महाडिक, डॉ सुनील आल्हाट,हलगी सम्राट एकनाथ आल्हाट,संभाजी आल्हाट आदि मान्यवर उपस्थित होते. कार्यक्रमाचे विशेष परिश्रम सुभाष दुबळे, साईनाथ कनिंगध्वज,अमित आल्हाट ,अनिल खुडे, अमोल गावडे,बाळू गावडे, प्रवीण खुडे ,नवनाथ आल्हाट,संजय खुडे,प्रा.सौ.रतन आल्हाट सौ.लक्ष्मीबाई आल्हाट , सौ.लक्ष्मीऊ खुडे, सौ सुनिता सकाटे, प्रा.सौ.मंगल उनवणे ,सौ.मनिषा पंचरास, सौ.सारीका शेलार,सोपान जाधव सर , विनोद बढेसर या मान्यवरांनी घेतले.



### श्रावणातील पहिला सोमवार आणि नागपंचमी एकाच दिवशी

**राजगुरुनगर : दैनिक संध्या**

श्रावणातील पहिला सोमवार आणि नागपंचमी हे दोन्ही सण तब्बल २३ वर्षांनंतर एकाच दिवशी आल्याने खेड तालुक्यात भक्तीमय वातावरण पाहायला मिळाले. तालुक्यातील विविध शिवमंदिरांमध्ये पहाटेपासूनच भाविकांसह महिलांची दर्शनासाठी मोठी गर्दी झाली. ज्योतिर्लिंग श्री क्षेत्र भीमाशंकर येथे लाखो भाविकांनी दर्शन घेतले, तर राजगुरुनगरच्या श्री सिद्धेश्वर मंदिरातही हजारो भाविकांची मांदियाळी पाहायला मिळाली. खेड तालुक्यातील बारा ज्योतिर्लिंगांपैकी सहावे ज्योतिर्लिंग असलेल्या श्री क्षेत्र भीमाशंकर येथे पहाटेपासूनच दर्शनासाठी लांबच लांब रांगा लागल्या होत्या. गेल्या काही महिन्यांपासून मंदिर आणि परिसरात विकासकामे सुरू असल्याने काही काळ दर्शन बंद होते. आता मंदिर दर्शनासाठी खुले झाल्याने आणि त्यातच श्रावणातील पहिला सोमवार व नागपंचमीचा दुर्मिळ योग एकाच दिवशी आल्याने भाविकांची मोठी गर्दी झाली. भीमाशंकरसह भोरगिरी येथील श्री कोटेश्वर, बुरसेवाडीचे श्री शंभू, वेताळे येथील श्री सिद्धेश्वर, चास येथील श्री सोमेश्वर, राजगुरुनगरचे श्री सिद्धेश्वर, चाकणचे श्री चक्रेश्वर, पाईटजवळील श्री कुंडेश्वर आणि वाकळवाडी येथील श्री वेळेश्वर मंदिरात भाविकांनी दर्शनासाठी गर्दी केली. तसेच निमगाव खंडोबा, खरपुडी खंडोबा आणि कडधे येथील श्री खंडोबा मंदिरातही भाविकांची मोठी उपस्थिती होती. गावागावातील शिवमंदिरांमध्येही धार्मिक वातावरण निर्माण झाले होते.

# कनेरसरमध्ये २३० वृक्षांची लागवड; तीन वर्षे संगोपनाची जबाबदारी

■ **कनेरसर (दै. संध्या)**

कनेरसर ग्रामपंचायत आणि १४ ट्री फाउंडेशन यांच्या संयुक्त विद्यमाने पर्यावरण संरक्षण व संवर्धनाच्या उद्देशाने जालिंदर नगर शाळा परिसर ते कनेरसर रस्ता या परिसरात वृक्ष लागवड व वृक्ष संगोपनाचा स्तुत्य उपक्रम राबविण्यात आला. बुधवार, दि. १९ ऑगस्ट २०२६ रोजी सकाळी ११ वाजता या उपक्रमाला सुरुवात झाली.

कार्यक्रमाच्या प्रारंभी वृक्षांचे पूजन करून वृक्ष लागवड करण्यात आली. १४ ट्री फाउंडेशनच्या वतीने वृक्ष लागवडीसाठी यंत्राच्या साहाय्याने २३० खड्डे घेण्यात आले. या खड्ड्यांमध्ये पाच ते सात फूट उंचीच्या एकूण २३० वृक्षांची लागवड करण्यात आली. यामध्ये वड, पिंपळ, चिंच, जांभूळ, कदम, कडुलिंब आदी विविध जातींच्या वृक्षांचा समावेश आहे.

या उपक्रमाच्या उद्घाटनप्रसंगी कनेरसर गावात १४ ट्री फाउंडेशनच्या माध्यमातून विविध भागांत एक हजार विविध जातींच्या वृक्षांची लागवड करण्यात येणार असल्याची घोषणा करण्यात आली. या उपक्रमासाठी ग्रामपंचायतीच्या वतीने फाउंडेशनला आवश्यक ते सर्व सहकार्य करण्याचे आश्वासन देण्यात आले.विशेष म्हणजे, केवळ वृक्ष लागवड करून थांबण्याऐवजी लागवड केलेल्या वृक्षांचे पुढील तीन वर्षे संगोपन व संवर्धन करण्याची जबाबदारी १४ ट्री फाउंडेशनने घेतली आहे. वृक्षांच्या संरक्षणासाठी जाळी, पाण्याची व्यवस्था, खते आदी आवश्यक सुविधा उपलब्ध करून देण्यात येणार आहेत. त्यामुळे वृक्ष लागवडीबरोबरच वृक्ष जगविण्यावरही भर देण्यात येत आहे. या उपक्रमामुळे कनेरसर परिसर अधिक हिरवागार होण्याबरोबरच पर्यावरणाचा समतोल राखण्यास निश्चितच मदत होईल, असा विश्वास उपस्थितांनी व्यक्त केला. कार्यक्रमाचे प्रास्ताविक १४ ट्री फाउंडेशनचे अनंत तायडे यांनी केले. त्यांनी वृक्ष लागवडीचा उद्देश, वृक्ष संगोपनाची जबाबदारी तसेच फाउंडेशनच्या वृक्ष लागवड आणि संवर्धनाच्या कार्याची सविस्तर माहिती दिली. यावेळी ज्येष्ठ नागरिक संघाचे अध्यक्ष बाळासाहेब खरपुडे, जयवंतराव दौंडकर आणि प्रा. डॉ. बाळासाहेब माशेरे यांनी मनोगत व्यक्त केले. कार्यक्रमास कनेरसरच्या सरपंच सुनीता केदारी, ग्रामसेवक मस्के भाऊसाहेब, ग्रामपंचायत सदस्य उमेश दौंडकर, बाळासाहेब खरपुडे, जयवंतराव दौंडकर, काशिनाथ हजारे, बाळासाहेब लोखंडे, भीमराव सोनवणे, बबनराव दौंडकर, सहदेव हजारे, चांगदेव झोडगे, नितीन दप्तरी, प्रा. डॉ. बाळासाहेब माशेरे तसेच जालिंदर नगर शाळेतील आदर्श शिक्षक दत्तात्रय वारे गुरुजी आदी मान्यवर उपस्थित होते. १४ ट्री फाउंडेशनचे अनंत तायडे, बजरंग बोरकर यांच्यासह फाउंडेशनचे कर्मचारीही मोठ्या संख्येने उपस्थित होते.



# पी.एम.श्री.केंद्रीय विद्यालयात देशभक्तीच्या जयघोषात स्वातंत्र्य दिन साजरा




■ **नांदेड (दै. संध्या)**

दक्षिण मध्य रेल्वे नांदेड येथील स्थानिक पी.एम.श्री केंद्रीय विद्यालयात 80 वा स्वातंत्र्य दिन अत्यंत उत्साह,चैतन्य आणि देशभक्तीच्या वातावरणात साजरा करण्यात आला.विद्यालयाच्या प्रांगणात आयोजित या रूबाबदार सोहळ्यात विद्यार्थी,शिक्षक आणि पालकांनी मोठ्या संख्येने सहभाग नोंदवत राष्ट्रभक्तीचे दर्शन घडविले. या कार्यक्रमाचे अध्यक्ष विद्यालयाचे प्राचार्य श्री.विवेक श्रीवास्तव हे होते तर विशेष उपस्थिती मध्ये मुख्याध्यापक श्री.राम श्रृंगारे व्यासपीठावर विराजमान होते.

सर्व प्रथम राष्ट्रध्वजास मानवंदना देवून संचलनाचे आकर्षण पाहण्यास मिळाले. सकाळच्या सत्रात प्रमुख मान्यवरांच्या हस्ते राष्ट्रध्वज फडकविण्यात आला. ध्वजारोहणानंतर उपस्थित सर्वांनी एकत्र येऊन 'वंदे मातरम्' आणि राष्ट्रगीत गायन केले.त्यानंतर सर्वांनी राष्ट्रध्वजाला मानवंदना दिली.विद्यालयीन स्कूल कॅप्टन, एन.सी.सी.कॅडेट्स,स्काउट गाईड पथक आणि हाऊसनिहाय विद्यार्थी संघांनी अत्यंत शिस्तबद्ध आणि रूबाबदार संचलन करत उपस्थितांची मने जिंकली.ध्वजा रोहणानंतर आयोजित सांस्कृतिक कार्यक्रमात विद्यार्थ्यांचा सहभाग खूप मोठ्या प्रमाणात लक्षणीय होता.विद्यार्थ्यांनी जोशपूर्ण उत्साहाने देशभक्तीपर समूहगीते, मनमोहक नृत्य आणि देशाच्या इतिहासावर प्रकाश टाकणारी प्रभावी भाषणे सादर केली. याशिवाय विविध स्पर्धांमध्ये उत्कृष्ट कामगिरी करणाऱ्या एन.सी.सी कॅडेट्सांना प्रमुख पाहुण्यांच्या हस्ते गौरविण्यात आले व बक्षिसे प्रदान करण्यात आली.

या कार्यक्रमाला मार्गदर्शन करताना प्राचार्य श्री. विवेक श्रीवास्तव यांनी प्रजासत्ताक दिनाचे ऐतिहासिक महत्त्व आणि संविधानाची महती उपस्थितांना समजावून सांगितली.आपल्या प्रेरणादायी भाषणात त्यांनी विद्यार्थ्यांना उद्देशून सांगितले की, देशाच्या प्रगतीत तरूणांचे योगदान अत्यंत महत्त्वाचे आहे.सर्वांनी एकत्र येऊन 'विकसित भारत' च्या निर्मितीसाठी कटिबद्ध राहावे आणि भविष्यात देशाचे नेतृत्व यशस्वीपणे करावे असे आव्हान त्यांनी केले.सर्व शिक्षकांच्या वतीने श्री.दत्तात्रय सांगळे सरांनी विद्यार्थ्यांना महान स्वातंत्र्यसैनिक आणि क्रांतीकारक यांच्या योगदानाची तसेच त्यांच्या त्याग, समर्पण आणि देशभक्तीची महती समजावून सांगितली. देशासाठी आपल्या प्राणांची आहुती देणाऱ्या स्वातंत्र्यसैनिकांच्या आदर्शांपासुन प्रेरणा घेवून विद्यार्थ्यांनी आपल्या दैनंदिन जीवनात देशभक्तीची भावना जपावी तसेच शाळेमध्ये शिस्त,गुरूजनांचा आदर,वेळेचे महत्त्व आणि ज्ञानार्जन या गोष्टींना प्राधान्य देवून विद्यार्थ्यांनी आपली जबाबदारी पार पाडावी.त्याच बरोबर प्रत्येक विद्यार्थ्यांनी आपल्या घरी आई वडिलांच्या आज्ञेचे पालन करून त्यांचा आदर करावा,

कुटुंबात व समाजात वावरताना नेहमी सौम्य,संयमी आणि संतुलित वर्तन ठेवावे. प्रत्येक विद्यार्थ्यांने आपल्या आचरणातून शिस्त, संस्कार आणि सामाजिक बांधिलकी जपत एक आदर्श विद्यार्थी म्हणून स्वतःची ओळख निर्माण करावी कारण हीच खरी देशभक्ती असुन जवाबदार, सुसंस्कृत आणि कर्तव्यनिष्ट नागरिक घडविणे हीच आपल्या स्वातंत्र्य सैनिकांना खरी आदरांजली ठरेल असे महत्वपुर्ण मार्गदर्शन त्यांनी केले.या संपुर्ण कार्यक्रमाचे दर्जेदार आणि प्रभावी सुत्रसंचलन विद्यार्थ्यांनी कु.अक्षता थोरात व स्वरा जामनिक यांना श्री. कैलास मोहनकर,श्री.नंदलाल,श्री. परमेश्वर भुरके व श्री.नरेश सुतार यांनी मार्गदर्शन केले.एन.सी.सी. कॅडेट्स व विद्यार्थ्यांच्या पथसंचलनासाठी श्री. श्रीनिवास व श्रीमती.पुजा चेरले यांचे मार्गदर्शन लाभले.विद्यार्थ्यांनी सादर केलेल्या सर्व देशभक्तीपर सांस्कृतिक नृत्य व गीत गायनासाठी श्री.प्रशांत शेकोकार,श्रीमती.दिपीका व श्री. विश्वदिप यांचे मार्गदर्शन लाभले. विद्यार्थ्यांच्या वतीने कुमारी जान्हवी वाघमारे वर्ग सातवा हिच्या वतीने प्रभावी आणि मार्गदर्शन पर भाषण करण्यात आले.या दिमाखदार सोहळ्याला २०० हून अधिक पालकवर्ग आवर्जून उपस्थित होता. पालकांच्या उपस्थितीमुळे विद्यार्थ्यांच्या उत्साहाला उधाण आले होते. संपूर्ण परिसर 'भारत माता की जय' 'वंदे मातरम्' च्या जयघोषाने दुमदुमून गेला. कार्यक्रमाच्या शेवटी मुख्याध्यापक श्री. राम श्रृंगारे यांनी उपस्थितांचे आभार मानले. हा सोहळा यशस्वी करण्यासाठी श्री. परमेश्वर भुरके आणि श्री.नरेश सुतार यांनी प्रभावी सुत्रसंचलन केले तर विद्यालयातील सर्व शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी विशेष परिश्रम घेवुन हा स्वातंत्र्य दिन नियोजन बद्ध पद्धतीने यशस्वी करून साजरा करण्यात आला.

# पीएमपीएमएलच्या तिकीट अनेक गावांची नावे गायब

■ **लोणी काळभोर (दै. संध्या)**

पुणे शहरातील असे अनेक विभाग आहेत की ग्रामीण भागातुन त्यांना पैसे मिळतात तरी ते ग्रामीण भागावर अन्याय करत आले आहेत. याचे उत्तम उदाहरण पुणे महानगर परिवहन महामंडल लिमिटेड म्हणजेच पीएमपीएमएल होय. हडपसर ते वरवंड मार्गावरील पीएमपीएमएल बसच्या तिकीट व्यवस्थेत प्रवाशांना त्यांच्या गावाचे नावच मिळत नसल्याचा धक्कादायक प्रकार समोर आला आहे. लोणी काळभोरच्या नावाऐवजी ‘रामाकृषी कारखाना’, तर काही ठिकाणी गावांच्या नावांऐवजी हॉटेल, मंगल कार्यालये आणि इतर ठिकाणांची नावे तिकीटावर छापली जात असल्याने प्रवाशांमध्ये संभ्रम निर्माण झाला आहे. या प्रकाराची तातडीने दखल न घेतल्यास ‘पीएमपीएमएल बस रोको’ आंदोलन करण्याचा इशारा रेल्वे प्रवासी सेना तथा शिवसेनेचे हवेली विभागप्रमुख अनिल दशरथ शिंदे यांनी दिला आहे.

पीएमपीएमएलचे मुख्य वाहतूक व्यवस्थापक यशवंत हिंगे यांची शिंदे यांनी भेट घेऊन निवेदन दिले. यावेळी प्रशासनाने मागणीबाबत सकारात्मक प्रतिसाद दिल्याचे शिंदे यांनी सांगितले. या निवेदनात शिंदे यांनी म्हटले आहे कि, वरवंड ते हडपसर दरम्यान लोणी काळभोर, कदमवाकवस्ती, सोरतापवाडी आणि कुंजीरवाडी यांसारखी मोठी गावे आहेत. मात्र, या गावांमध्ये उतरायचे असतानाही तिकीट मशीनमध्ये संबंधित गावांची अधिकृत नावे उपलब्ध नसल्याची तक्रार प्रवाशांनी केली आहे. विशेषतः उरुळी कांचनहून लोणी काळभोरला येणाऱ्या प्रवाशांच्या तिकिटावर ‘लोणी काळभोर’ऐवजी ‘रामकृषी रसायन कारखाना’ असे नाव येत असल्याचे निदर्शनास आले आहे. त्यामुळे तिकीटावरील नाव आणि प्रत्यक्ष उतरायचे ठिकाण यामध्ये फरक आहे.

काही बसथांब्यांची नावे बदलून त्याऐवजी हॉटेल, मंगल कार्यालये अथवा कारखान्यांची नावे तिकीट मशीनमध्ये समाविष्ट करण्यात आल्याचे प्रवाशांचे म्हणणे आहे. त्यामुळे पीएमपीएमएलच्या तिकीट व्यवस्थेत गावांची अधिकृत ओळखच का बाजूला सारली जात आहे ? असा सवाल उपस्थित होत आहे. प्रवाशांना नेमक्या ठिकाणी उतरायचे असल्याने तिकीटावर प्रत्यक्ष बसथांबा किंवा संबंधित गावाचे अधिकृत नाव असणे आवश्यक आहे. अन्यथा प्रवाशांना तिकीट तपासणीच्या वेळी अडचणी निर्माण होण्याची शक्यता आहे. बसथांब्यांची नावे कोणत्या आदेशानुसार बदलण्यात आली, त्यासाठी कोणती मंजुरी घेण्यात आली, जुने व नवीन नाव काय आहे आणि तिकीट मशीनमध्ये हे बदल कोणी केले, याची माहिती प्रशासनाने जाहीर करावी, अशी मागणी रेल्वे प्रवासी सेनेने केली आहे. प्रवाशांना ज्या गावात उतरायचे आहे, त्याच गावाचे किंवा अधिकृत बसथांब्याचे नाव तिकीटावर देण्यात यावे. तिकीट मशीनमधील चुकीची व संभ्रम निर्माण करणारी नावे तातडीने दुरुस्त करावीत, अशी मागणी अनिल दशरथ शिंदे यांनी केली आहे.

प्रवाशांकडून तिकीटाचे पैसे घेताना त्यांच्या प्रवासाच्या ठिकाणाची स्पष्ट नोंद तिकीटावर असणे हा त्यांचा अधिकार आहे. गावांची नावे हटवून इतर ठिकाणांची नावे देण्याचा प्रकार तातडीने थांबवावा. अन्यथा प्रवाशांच्या हितासाठी पीएमपीएमएल बस रोको आंदोलन करण्यात येईल असा इशारा शिंदे यांनी दिला.




# ‘ज्ञानेश्वर माऊली आणि स्वामी स्वरूपानंद यांचे विचार एकच’ : बागडे

■ **आळंदी (दै. संध्या)**

संत ज्ञानेश्वर महाराज आणि स्वामी स्वरूपानंद यांनी आपल्या जीवनातून प्रेम, भक्ती, समता, आत्मशुद्धी आणि मानवतेचा संदेश दिला. दोन्ही संतांच्या विचारांमध्ये विलक्षण एकरूपता असून, त्यांच्या शिकवणीतून आजच्या समाजाला योग्य दिशा मिळते, असे प्रतिपादन उमेश महाराज बागडे यांनी केले.

स्वामी स्वरूपानंद यांच्या पुण्यतिथीनिमित्त स्वामी कृपा हॉल येथे कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. दुपारी साडेतीन ते साडेचार या वेळेत स्वामींनी सिद्ध केलेल्या ‘ॐ राम कृष्ण हरी’ या मंत्राचा सामूहिक जप करण्यात आला. त्यानंतर ज्ञानेश्वरीतील १०८ ओव्यांचा संग्रह असलेल्या नित्यपाठाचे वाचन करण्यात आले. यावेळी स्वामी स्वरूपानंद यांच्या अभंगांचा कार्यक्रम झाला. प्राजक्ता गोखले आणि मिताली यार्डे यांनी अभंग सादर करून उपस्थितांची दाद मिळविली. यानंतर उमेश महाराज बागडे यांचे प्रवचन झाले. ‘श्री ज्ञानेश्वर माऊली आणि स्वामी स्वरूपानंद यांच्यातील एकरूपता’ या विषयावर त्यांनी विविध दाखले देत अभ्यासपूर्ण विवेचन केले. संत ज्ञानेश्वर महाराजांनी ‘हे विश्वचि माझे घर’ या विचारातून विश्वबंधुत्वाचा संदेश दिला.



# श्री कानिफनाथ महाराज प्रगट दिन सोहळा उत्साहात

■ **पुरंदर(दै. संध्या)**

पुरंदर तालुक्यातील श्री क्षेत्र कानिफनाथ गडावर श्री नवनाथ देवस्थान पंचायत कमिटी ट्रस्ट, बोपगाव यांच्यावतीने श्री कानिफनाथ महाराज प्रगट दिन सोहळा रविवार दि. १६ ऑगस्ट रोजी दुपारी १२ वा. मोठ्या थाटामाटात व उत्साही वातावरणात साजरा केला. श्री कानिफनाथ महाराज प्रगट दिन सोहळा कार्यक्रमाचे संयोजन श्री नवनाथ देवस्थान पंचायत कमिटी ट्रस्ट अध्यक्ष- सुरेश नानासाहेब यांनी केले.




दैनिक संध्या
नि:पक्ष समीक्षणाचे... निर्भीड दैनिक



# अशोक सराफ यांनी मराठी सिनेमाला वेगळी उंची दिली

## मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस : अभिनेते अशोक सराफ यांचा नागरी सत्कार

■ नागपूर (दै. संध्या)

मराठी माणूस हा वास्तविक आहे. त्याच्या जीवनातील संघर्ष, वास्तव, मर्यादा, दुःख आणि आनंद हे अशोक सराफ यांच्या कलाकृतींमध्ये दिसतात. सर्वसामान्यांच्या जीवनातील या भावभावनांना त्यांनी आपल्या अभिनयातून हास्याची आणि आनंदाची किनार दिली. मराठी सिनेमा खऱ्या अर्थाने लोकाभिमुख करून या सिनेमाला वेगळी उंची प्राप्त करून देण्याचे कार्य अभिनेते अशोक सराफ यांनी केले असल्याचे प्रतिपादन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी केले.

नागपूर महानगरपालिका, विदर्भ गौरव प्रतिष्ठान आणि श्री सिद्धीविनायक ट्रस्ट यांच्या संयुक्त विद्यमाने ज्येष्ठ चित्रपट अभिनेते महाराष्ट्र भूषण पद्मश्री अशोक सराफ यांचा नागरी सत्कार सोहळा वसंतराव देशपांडे सभागृहात झाला. त्यावेळी मुख्यमंत्री श्री. फडणवीस बोलत होते.

कायर्क्रमास महापौर नीता ठाकरे, विदर्भ गौरव प्रतिष्ठानचे अध्यक्ष डॉ. गिरीश गांधी, श्री सिद्धीविनायक सेवा ट्रस्टचे अध्यक्ष, माजी आमदार संदीप जोशी, उपमहापौर लीला हाथीबेड, स्थायी समिती अध्यक्ष शिवानी दाणी- वखरे, नागपूर मनपातील सत्ता पक्षनेते नरेंद्र बोरकर, मनपा आयुक्त डॉ. विपीन इटनकर उपस्थित होते.

मुख्यमंत्री म्हणाले की, अशोक सराफ यांच्यासारखे कलाकार लाभणे ही मराठी रंगभूमी, चित्रपटसृष्टी आणि रसिकांसाठी अभिमानाची बाब आहे. त्यांच्या कलेचे कौतुक करण्यासाठी आणि त्यांच्या योगदानाचा गौरव करण्यासाठी आजचा नागरी सत्कार हा नागपूरकरांच्या वतीने कृतज्ञता व्यक्त करण्याचा क्षण आहे.

अशोक सराफ यांच्या कलाकृतींनी अनेक पिढ्यांना आनंद दिला आहे. अशोक सराफ यांनी आपल्या सर्वांना मराठी सिनेमाची गोडी लावली आहे. रसिकांच्या मनात त्यांनी निर्माण केलेल्या आनंदाचा हा सत्कार असल्याचे त्यांनी सांगितले.

आजच्या इतका भव्य सत्कार माझा आजवर झाला नाही, पण प्रेक्षक आहेत म्हणून आम्ही आहोत, अशी भावना सत्काराला उत्तर देताना अशोक सराफ यांनी व्यक्त केली.

यावेळी मुख्यमंत्री श्री. फडणवीस यांच्या हस्ते सन्मान चिन्ह आणि 5 लाख रुपयांचा धनादेश प्रदान करून अशोक सराफ यांचा सत्कार करण्यात आला. विदर्भ गौरव प्रतिष्ठानतर्फे गिरीश गांधी यांनी सन्मान चिन्ह आणि 51 हजार रुपयांचा धनादेश देऊन गौरव केला. तसेच श्री सिद्धीविनायक ट्रस्टतर्फे १ लाख रुपयांचा धनादेश प्रदान करण्यात आला. अशोक सराफ यांनी ऐंशीव्या वर्षात पदार्पण केल्याबद्दल त्यांचे 80 दिव्यांनी औक्षण करण्यात आले.

प्रारंभी अभिनेते पुष्कर श्रोत्री यांनी सराफ यांची प्रकट मुलाखत घेतली.



# थोडक्यात पण महत्वाचे

## उपजिल्हा रुग्णालय तातडीने सुरू करा

मुंबई : पुणे जिल्ह्यातील लोहगाव उपजिल्हा रुग्णालय नागरिकांच्या सेवेत तातडीने सुरू करण्यासाठी आवश्यक परवानग्या, मनुष्यबळ आणि पायाभूत सुविधांची पूर्तता करून उर्वरित कामे कालबद्ध पद्धतीने पूर्ण करण्याचे निर्देश उपमुख्यमंत्री सुनेत्रा अजित पवार यांनी आज दिले. ग्रामीण, दुर्गम आणि आदिवासी भागातील नागरिकांना त्यांच्या जवळच्या परिसरात दर्जेदार आरोग्य सुविधा उपलब्ध करून देण्यासाठी प्रलंबित प्रस्तावांवरील कार्यवाहीला गती देण्याच्या सूचनाही त्यांनी दिल्या. सह्याद्री राज्य अतिथीगृह येथे त्यांच्या अध्यक्षतेखाली लोहगाव उपजिल्हा रुग्णालयासह पुणे जिल्ह्यातील आरोग्य विभागाच्या विविध विषयांबाबत बैठक झाली. यावेळी आरोग्यमंत्री प्रकाश आबिटकर, पुणे जिल्हा परिषदेचे अध्यक्ष वीरधवल जगदाळे, आमदार बापूसाहेब पठारे, माजी आमदार सुनील टिंगरे, जिल्हा परिषदेचे समाज कल्याण सभापती जितेंद्र बडेकर, उपमुख्यमंत्र्यांचे सचिव डॉ. राजेश देशमुख, पुण्याचे जिल्हाधिकारी जितेंद्र डूडी (दूरदृश्य प्रणालीद्वारे), पुणे जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी गजानन पाटील, जिल्हा परिषदेच्या सदस्या मोनिका हरगुडे यांच्यासह वरिष्ठ अधिकारी उपस्थित होते. लोहगाव उपजिल्हा रुग्णालय हे परिसरातील नागरिकांसाठी अत्यंत महत्त्वाचे असून, ते लवकरात लवकर कार्यान्वित होणे आवश्यक आहे. रुग्णालय सुरू करण्यासाठी आवश्यक असलेल्या सर्व परवानग्या व बाबींची पूर्तता करावी. प्रलंबित कामे तातडीने पूर्ण करताना बांधकाम व इतर सुविधा दर्जेदार असतील, याची दक्षता घ्यावी. रुग्णालय प्रत्यक्ष नागरिकांच्या सेवेत येण्यासाठी आवश्यक प्रशासकीय कार्यवाही कालबद्ध पद्धतीने पूर्ण करण्याचे निर्देश उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार यांनी दिले.

## शाळांतील विद्यार्थ्यांना मोफत दप्तर

मुंबई : राज्यातील स्थानिक स्वराज्य संस्थांच्या शाळांमध्ये शिक्षण घेणाऱ्या इयत्ता पहिली ते आठवीच्या विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्य पुरविणे या उपक्रमांतर्गत मोफत शालेय दप्तर उपलब्ध करून देण्यास राज्य शासनाने प्रशासकीय मान्यता दिली आहे. या योजनेसाठी सुमारे 174 कोटी 19 लाख 35 हजार 424 रुपयांच्या प्रस्तावास मान्यता देण्यात आली असून, यासंदर्भातील शासन निर्णय शालेय शिक्षण विभागाने निर्गमित केला आहे. बालकांचा मोफत व सक्तीच्या शिक्षणाचा हक्क अधिनियम, 2009 तसेच राष्ट्रीय शैक्षणिक धोरण 2020 च्या उद्दिष्टांच्या अनुषंगाने विद्यार्थ्यांना गुणवत्तापूर्ण आणि आनंददायी शिक्षणासाठी आवश्यक सुविधा उपलब्ध करून देण्यावर शासनाचा भर आहे. त्याच पार्श्वभूमीवर स्थानिक स्वराज्य संस्थांच्या शाळांमधील विद्यार्थ्यांना मोफत दप्तर उपलब्ध करून देण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. या निर्णयानुसार, दप्तर खरेदीसाठी ई-निविदा प्रक्रियेचा अवलंब करण्यात येणार असून, शासनाच्या प्रचलित खरेदी नियमावलीनुसार पारदर्शक पद्धतीने संपूर्ण प्रक्रिया राबविण्यात येईल. दप्तरांच्या किमतीमध्ये डिझाइन, पुरवठा, वाहतूक आणि जीएसटीसह सर्व बाबींचा समावेश असेल. या योजनेसाठी आवश्यक निधी वितरणाबाबतचे स्वतंत्र आदेश नंतर जारी करण्यात येतील.

## प्रलंबित प्रश्नांबाबत धोरण निश्चित करणार

मुंबई : राज्यातील सहकारी गृहनिर्माण संस्थांच्या स्वयंपुनर्विकास प्रक्रियेतील प्रलंबित प्रश्न आणि महसूल विभागाशी संबंधित सवलतींची तात्काळ अंमलबजावणी करण्याच्या दृष्टीने धोरण निश्चित करण्यात येणार असल्याचे महसूलमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी सांगितले. महसूलमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांच्या अध्यक्षतेखाली मंत्रालयात यासंदर्भातील बैठकीचे आयोजन करण्यात आले होते. या बैठकीला आमदार प्रवीण दरेकर, आमदार संजय केळकर यांच्यासह संबंधित अधिकारी उपस्थित होते. या बैठकीत गृहनिर्माण संस्थांच्या अनेक वर्षांपासून प्रलंबित असलेल्या समस्यांवर चर्चा होऊन महत्वपूर्ण निर्णय घेण्यात आले. सध्या अनेक संस्था एकीकृत विकास नियंत्रण आणि प्रोत्साहन नियमावली (युडीसीपीआर) मध्ये समाविष्ट नसल्याने त्यांच्या स्वयंपुनर्विकासात अडचणी येत आहेत. यावर तोडगा काढण्यासाठी २०१९ च्या शासन निर्णयानुसार इतर करांमध्ये सवलत देण्याचे आणि १० टक्के प्रोत्साहन (इन्सेन्टिव्ह) देण्याचे आदेश महसूलमंत्र्यांनी दिले आहेत. तसेच, स्वयंपुनर्विकासासाठी 'वर्क कॉन्ट्रॅक्ट' आणि 'डेव्हलपमेंट ॲग्रीमेंट' बाबतचा सुटसुटीत मसुदा तयार करून देण्याच्या सूचनाही देण्यात आल्या आहेत.

# जलसंधारणाच्या उपाययोजना

राज्यात यंदा २१ ऑगस्ट हा 'जलसंधारण दिन' तसेच १५ ऑगस्ट २०२६ ते २६ जानेवारी २०२७ या कालावधीत 'जलसंधारण अभियान' राबविण्यात येत आहे. माजी मुख्यमंत्री दिवंगत सुधाकरराव नाईक यांच्या जयंतीनिमित्त साजरा होणारा हा जलसंधारण दिन त्यांच्या जलसंधारणविषयक दूरदृष्टीला अभिवादन करण्याबरोबरच महाराष्ट्राच्या जलसुरक्षित भविष्यासाठी नव्या संकल्पाची सुरुवात ठरणार आहे. या जलसंधारण अभियानाच्या निमित्ताने जलसंधारणाच्या विविध उपाययोजनाविषयी ही माहिती....




मृद व जलसंधारण विभाग
महाराष्ट्र शासन

कमी पाण्यामध्ये जास्त फायदा घेण्यासाठी शेतकऱ्यांनी जलसंधारणाच्या उपाययोजना आपल्या शेतीमध्ये करणे गरजेचे आहे. त्यामुळे शेतीमधील पिकांमध्ये तसेच उत्पादनामध्ये प्रचंड वाढ होऊ शकते. त्याबरोबरच शेतीसाठी लागणाऱ्या पाण्याचे काटकसरीने वापर केला जाऊ शकतो व कमी पाण्यात बहारदार शेतीचा प्रयोग करता येऊ शकतो या पार्श्वभूमीवर शेतकऱ्यांनी जलसंधारणाच्या उपाययोजनांचा कल्पकतेनं वापर केला पाहिजे.

मृद व जलसंधारणाच्या पद्धतींचा वापर करताना पाऊसमान, जमिनीचा प्रकार, उतार, जमिनीची खोली आणि जमिनीवरील आच्छादन या बाबी लक्षात घ्याव्यात. ज्या ठिकाणी कमी पाऊस, कमी उतार व कमी खोलीच्या जमिनी आहेत, अशा ठिकाणी जागच्या जागी पाणी मुरविण्याच्या पद्धतींचा अवलंब करावा. ज्या ठिकाणी जास्त पाऊस आणि जास्त उताराच्या जमिनी आहेत, अशा ठिकाणी मूलस्थानी जलसंधारणाबरोबर अभियांत्रिकी कामे करून मृद व जलसंधारणाचे उपाय करावेत.

जमिनीच्या उतारानुसार जमिनीचे निरनिराळे भाग करावेत. त्यानुसार बांध टाकावेत, बांधाच्या आतील भागाचे सपाटीकरण करावे. सध्याच्या काळात फुटलेले बांध दुरुस्त करावेत. योग्य ठिकाणी सांडवा ठेवावा. त्यामुळे जादा झालेले पाणी सुरक्षितरीत्या शेताबाहेर काढता येते. सांडव्यामधून माती वाहून जाऊ नये म्हणून त्यामध्ये दगडी बांध घालावेत. मातीचे बांध पुन्हा पावसाने फुटू नयेत यासाठी पावसाळ्यात त्यावर स्टायलो, मद्रास अंजन, खस, सुबाभूळ, ग्लिरिसिडियाची लागवड करावी.

जमिनीची प्राथमिक मशागत केल्यानंतर पाऊस जागच्या जागी मुरविण्यासाठी मूलस्थानी जलसंधारण पद्धतीचा अवलंब करावा. शेतामध्ये जादा होणारे पाणी शेताबाहेर काढण्यासाठी योग्य ठिकाणी ढाळीचे बांध ठेवावेत. जादा झालेले पाणी हे पाणी वाहून नेणाऱ्या चरामध्ये सोडावे. हा चर गवताने आच्छादित करावा. चराच्या उताराबद्दल काळजी घ्यावी. त्यामुळे जमिनीची धूप होत नाही. शेतातील जादा झालेले पाणी हे योग्य त्या तांत्रिक गोष्टींचा अवलंब करून विहीर किंवा कूपनलिका पुनर्भरणासाठी वापरावे.

### मृद व जलसंधारणाच्या पद्धती

मृद व जलसंधारणाच्या पद्धतींचा वापर हा पाऊसमान, जमिनीचा प्रकार, जमिनीचा उतार, जमिनीची खोली आणि जमिनीवरील आच्छादन इत्यादी बाबी लक्षात घेऊन करावा. ज्या ठिकाणी कमी पाऊस, कमी उतार व कमी खोलीच्या जमिनी आहेत, अशा ठिकाणी जागच्या जागी पाणी मुरविण्याच्या पद्धतींचा अवलंब करावा. ज्या ठिकाणी जास्त पाऊस आणि जास्त उताराच्या जमिनी आहेत, अशा ठिकाणी मूलस्थानी जलसंधारणाबरोबर अभियांत्रिकी कामे करून मृद व जलसंधारणाचे उपाय करावेत. या पद्धती अत्यंत परिणामकारक आणि कमी खर्चाच्या आहेत. या पद्धतीमध्ये जागच्या जागी जमिनीत पाणी मुरविले जात असल्यामुळे अभियांत्रिकी मृद व जलसंधारण पद्धतीपेक्षा बाष्पीभवन कमी होते.

### भौतिक पद्धती

- अवर्षणप्रवण विभागात ८० टक्के क्षेत्र रब्बी पिकाखाली असते. या प्रचलित रब्बी पीकपद्धतीमध्ये पावसाळ्यात म्हणजे खरीप हंगामात बहुधा पीक घेतले जात नाही. त्यामुळे खरीप हंगामात जमिनीस पिकाचे पांघरुण मिळत नाही. रब्बी हंगाम हा पिकांचा दुसरा हंगाम पावसाळ्याच्या शेवटी सुरू होतो. या हंगामात पिकांना प्रत्यक्ष पावसाचे पाणी फारसे मिळत नाही. खरीप हंगामात पडलेले पावसाचे पाणी भारी खोल जमिनीत खरीप पिके न घेता मुरविले जाते आणि जमिनीतील ओलावा वाढविला जातो. अशा जमिनीत रब्बी हंगामातील पिके चांगली येतात. कोरडवाहू शेतीमध्ये जेथे पाणी मुरण्याचा वेग जास्त आहे आणि जमिनीला फारसा उतार नाही, अशा ठिकाणी उताराला आडवे वाफे तयार करावेत. वाफे तयार करताना प्रथम कुळवाची पाळी द्यावी.
- त्यानंतर बळिराम नांगराने उभे-आडवे ६ मीटर x ६ मीटर अंतरावर उतारास आडवे सपाट वाफे तयार करावेत. वरंब्याची उंची साधारणपणे २० ते ३० सें.मी. ठेवावी. असे वाफे जागोजागी पाणी मुरविण्यास मदत करतात. त्यामुळे जमिनीमध्ये नेहमीपेक्षा ५० टक्के जास्त ओल साठविली जाते. मध्यम ते भारी जमिनीत बळीराम नांगराने उतारास आडवे तास घालावे. त्यामुळे सऱ्या तयार होतात आणि पडणाऱ्या पावसाचे पाणी सऱ्यांमधून जमिनीत मुरते. या पद्धतीत ८० टक्क्यांपर्यंत पाणी जमिनीत मुरते. जमिनीतून माती वाहून जात नाही. सऱ्यांची लांबी साधारणतः ९० मीटरपर्यंत ठेवावी. या पद्धतीमुळे उत्पादनात ३५ ते ४० टक्के वाढ दिसून येते. या पद्धतीत मुख्य वरंबे उताराला आडवे ठेवावेत, तर बंदिस्त वरंबे उताराच्या दिशेने ठेवावेत. अशा रीतीने उताराला आडवे बंदिस्त सरी वरंबे तयार होतात. मुख्य वरंब्याची उंची ६ मीटर व उंची ३० सें.मी. ठेवावी, तर बंदिस्त वरंब्याची उंची २० सें.मी. व दोन वरंब्यांतील अंतर ३ मीटर ठेवावे. या पद्धतीत जास्त पाऊस पडला तरी बंदिस्त वरंबे फुटून संथ गतीने पाणी शेतातून बाहेर जाते. ही पद्धत कोरडवाहू भागात चोपण व क्षारयुक्त जमिनीत पाणी मुरविण्यासाठी उपयुक्त असून, त्यामुळे जमिनीतील विद्राव्य क्षारांचे प्रमाण कमी होण्यास मदत होते.
- मृद व जलसंधारणाची अभियांत्रिकी कामे मूलस्थानी जलसंधारणाच्या कामांबरोबरच मृद व जलसंधारणाचे अभियांत्रिकी उपचार पाणलोट क्षेत्र विकासाच्या माथा ते पायथा या सूत्रानुसार करावेत. पाणलोट क्षेत्राच्या माथ्यावरील पडीक जमिनीच्या पृष्ठभागावरून वाहून जाणारे पाणी अडविण्यासाठी सलग समतल चराचा वापर करतात. यासाठी समपातळी रेषेवर ३० सें.मी. खोल व ६० सें.मी. रुंद असे सलग चर खोदावेत. या चरातून निघणारी माती चराच्या खालच्या बाजूस लावावी. त्यामुळे दोन चरांमधील पट्ट्यामध्ये ओलावा दीर्घ काळ राहतो. या ओलाव्याचा फायदा गवताची वाढ चांगल्या प्रकारे होण्यास होते. शिवाय जमिनीवरून वाहून जाणाऱ्या पाण्याचा प्रवाह थांबविला जातो. चराच्या खालच्या बाजूस जो बांध तयार होतो, त्यावर झाडे लावता येतात.
- तुटक समतल चर हा सलग समतल चरासारखाच असून, यामध्ये समतल चर हा सलग नसून, तुटक स्वरूपात असतो. पावसाचे वाहून जाणारे पाणी जमा करण्यासाठी आणि त्याचा पुन्हा वापर करण्यासाठी पाणलोट क्षेत्रात योग्य ठिकाणी शेततळे खोदावे. जमिनीवरून वाहून जाणारे पाणी शेततळ्याकडे वळविण्यासाठी योग्य ठिकाणी गवत लागवड केलेली चारी तयार करावी. शेततळ्यामुळे जमिनीतील पाण्याची पातळी वाढविण्यास मदत होते. शेततळ्यास योग्य पद्धतीचे अस्तरीकरण केल्यास त्यामध्ये पाणी जास्त काळ साठविता येते. हे साठविलेले पाणी पिकास आणि फळबागेस निकडीच्या अवस्थेत संरक्षित पाणी म्हणून वापरावे. सिमेंट नालाबांधामुळे मोठ्या प्रमाणावर पाण्याचा साठा अडवून जवळपासच्या विहिरीतील पाण्याची पातळी वाढते.
- भूपृष्ठावरून वाहणाऱ्या पाण्याची गती कमी करून थांबविणे, बांधाच्या प्रभाव क्षेत्रातील भूगर्भातील पाण्याची पातळी वाढविणे आणि त्याद्वारा सिंचन क्षेत्रात वाढ करणे, हे सिमेंट नालाबांधाचे उद्देश आहेत. सिमेंट नालाबांधासाठी जागेची निवड करताना नाल्याची रुंदी ५ ते ३० मी.पर्यंत असावी, तसेच नाल्याचे पाणलोट क्षेत्र ४० हेक्टरपासून १०० हेक्टरपर्यंत असावे. नाल्याच्या दोन्ही बाजूंस स्थिर काठ असावेत. नाल्याच्या तळाचा उतार तीन टक्क्यांपेक्षा जास्त असू नये.

# सोलापूर जिल्ह्याला १६ कोटींचे प्रोत्साहन अनुदान मंजूर

■ सोलापूर (दै. संध्या)

जागतिक बँकेच्या अर्थसहाय्याने राबवण्यात येत असलेल्या आणि नियोजन विभाग अंतर्गत असलेल्या महास्टाराईड ऑपरेशन (MahaSTRIDE Operation) मध्ये सोलापूर जिल्ह्याने राज्यात उल्लेखनीय कामगिरी केली आहे. आर्थिक वर्ष २०२५-२६ साठी राज्यातील १३ जिल्ह्यांची निवड झालेल्या यादीत सोलापूरचा समावेश असून, जिल्ह्याला १६ कोटी रुपयांचे परफॉर्मन्स बेस्ड इन्सेंटिव्ह ग्रँट (Performance-Based Incentive Grant) मंजूर करण्यात आले आहे.

मुख्यमंत्री श्री. देवेंद्र फडणवीस यांनी जिल्हाधिकारी श्री. एस. कार्तिकेयन यांना पत्र पाठवून या कामगिरीबद्दल अभिनंदन केले आहे. पत्रानुसार सोलापूर जिल्ह्याला यावेळी 82% Composite Score मिळाला आहे. यामुळे राज्यातील १३ पात्र जिल्ह्यांमध्ये सोलापूरचा ४था क्रमांक लागला आहे. तसेच पुणे विभागातील ४ जिल्ह्यांमध्ये ३रा क्रमांक मिळाला आहे. जिल्हा प्रशासनाने राबवलेल्या District Strategic Plans ची मुख्यमंत्री यांनी विशेष दखल घेतली आहे. मुख्यमंत्र्यांनी पत्रात म्हटले आहे की, सोलापूर जिल्ह्याने Annual Strategic Action Plan राबवण्यासाठी जवळपास १४२ कोटी रुपयांचे खाजगी भांडवल उभे केले आहे. यामुळे सोलापूर गुंतवणुकीसाठी एक आकर्षक जिल्हा म्हणून पुढे येत आहे. राज्याच्या "विकसित महाराष्ट्र" या संकल्पनेला बळ देण्यात सोलापूरचा मोठा वाटा आहे, असेही त्यांनी नमूद केले. या कामगिरीच्या सन्मानार्थ सोलापूर जिल्ह्याला १६ कोटी रुपयांचे प्रोत्साहन अनुदान मंजूर करण्यात आले आहे. या अनुदानाच्या वापरासाठीच्या सविस्तर अटी MITRA विभागाकडून जिल्हा प्रशासनाला कळवण्यात आल्या आहेत. मुख्यमंत्र्यांनी पुढे सांगितले की, जिल्हा प्रशासनाने या गतीने काम करत राहावे. विशेषतः खाजगी भांडवल उभारणी आणि जिल्ह्याचे *GDDP म्हणजेच Gross District Domestic Product* वाढवण्यासाठी अधिक महत्वाकांक्षी उद्दिष्टे ठेवावीत.

सोलापूर जिल्ह्याला MahaSTRIDE टीम अंतर्गत १६ कोटींचे प्रोत्साहन अनुदान मंजूर झाल्याबद्दल जिल्हाधिकारी एस. कार्तिकेयन यांचा पुष्पगुच्छ देऊन सत्कार जिल्हा नियोजन अधिकारी दिलीप पवार, सहायक जिल्हा नियोजन अधिकारी श्रीकांत कुंटला यांनी नियोजन भवन येथे केला. यावेळी नियोजन विभागाचे अधिकारी कर्मचारी उपस्थित होते. सोलापूर जिल्ह्याच्या या यशामुळे राज्यातील इतर जिल्ह्यांसाठीही तो एक आदर्श ठरणार आहे.

# दापचरी येथील प्रस्तावित आंतरराष्ट्रीय कृषी बाजार परिसराची पाहणी

■ पालघर (दै. संध्या)

पालघर जिल्ह्यातील दापचरी येथे १ हजार ३९५ एकर जमिनीवर लवकरच आंतरराष्ट्रीय दर्जाचे सर्व सुविधायुक्त अत्याधुनिक कृषी बाजार उभारण्यात येणार असून, यामाध्यमातून स्थानिकांसाठी यामधून मोठ्या प्रमाणात रोजगाराच्या संधी निर्माण होतील, असे प्रतिपादन पणन मंत्री जयकुमार रावल यांनी केले. हा आंतरराष्ट्रीय कृषी बाजार महाराष्ट्रासह देशातील शेतकऱ्यांना जागतिक बाजारपेठेशी थेट जोडणारा महत्त्वाकांक्षी प्रकल्प ठरेल, असा विश्वासही त्यांनी व्यक्त केला.

दापचरी येथे होणाऱ्या प्रस्तावित आंतरराष्ट्रीय कृषी उत्पन्न बाजार प्रकल्पाच्या जागेची मंत्री रावल यांनी पाहणी केली. यावेळी पालघर अपर जिल्हाधिकारी सुभाष भागडे, अपर जिल्हाधिकारी, बाप्पासाहेब थोरात, पणन मंडळाचे कार्यकारी संचालक संजय कदम आदी अधिकारी उपस्थित होते.

मंत्री रावल यांनी संपूर्ण जमिनीची पूर्ण पाहणी करून अधिकाऱ्यांना आवश्यक सूचना केल्या. यावेळी प्रकल्पाच्या गोशाळा परिसर, गोहर धाड कृषी विभाग, नवा मोहरा कृषी विभाग अशा विविध विभागांची पाहणी करण्यात आली. मंत्री रावल म्हणाले, महाराष्ट्र सरकारने येथे फ्रान्समधील रुंगीस मार्केटच्या धर्तीवर अत्याधुनिक संसाधनांनी युक्त आंतरराष्ट्रीय दर्जाची जगातील सर्वात मोठी आंतरराष्ट्रीय कृषी बाजारपेठ उभारण्याचा संकल्प केला आहे. विदर्भ, मराठवाडा, उत्तर महाराष्ट्र, कोकण आणि पश्चिम महाराष्ट्रासह देशभरातील शेतकऱ्यांचा शेतीमाल या बाजारात येईल. वाढवण बंदर, रेल्वे, राष्ट्रीय महामार्ग, समृद्धी महामार्ग आणि भविष्यातील विमानतळामुळे हे ठिकाण इंटिग्रेटेड मल्टी-मोडल कृषी लॉजिस्टिक्स हब म्हणून विकसित होणार आहे. येथे फळे, भाजीपाला, फुले, धान्य, मासे, दुग्धजन्य पदार्थ, मांस आदी कृषी उत्पादनांसाठी अत्याधुनिक बाजार, प्रक्रिया, पॅकिंग, साठवण आणि निर्यात सुविधा उपलब्ध होतील. हा राज्यातील आणि देशातील शेतकऱ्यांच्या दृष्टीकोनातून अत्यंत महत्त्वाकांक्षी प्रकल्प असून सर्वांच्या सहकार्याने आपण हा प्रकल्प लवकर उभारणार आहोत, असेही मंत्री जयकुमार रावल म्हणाले. या प्रकल्पामुळे स्थानिक नागरिकांना सर्वाधिक फायदा होणार असून, सुमारे १० हजार रोजगाराच्या संधी निर्माण होतील. रोजगारामध्ये स्थानिक युवकांना प्राधान्य दिले जाईल. कृषी प्रक्रिया उद्योग, गोदामे, कोल्ड स्टोरेज, लॉजिस्टिक्स, पॅकिंग, वाहतूक आणि इतर पूरक सेवांमध्ये मोठ्या प्रमाणावर रोजगार उपलब्ध होईल.

## थोडक्यात पण महत्वाचे



### चाकणला गरजू विद्यार्थ्यांना शालेय साहित्यांचे वाटप

चाकण : दैनिक संध्या

शालेय साहित्यांपासून वंचित असलेल्या गरजू विद्यार्थ्यांना चाकण येथील आरके ग्रुप व क्रांतिवीर संघटनेच्या वतीने शालेय साहित्यांचे मोफत वाटप करण्यात आले. गरीब विद्यार्थ्यांच्या शिक्षणाला हातभार लागावा हा हेतु डोळ्यासमोर ठेवून गरजू विद्यार्थ्यांना मदतीचा हात देत चाकण नगरपरिषदेच्या नगराध्यक्षा मनिषा गोरे व महिला आणि बाल कल्याण समितीच्या सभापती रुपाली कांडगे यांच्या हस्ते व क्रांतिवीर संघटनेच्या माध्यमातून चाकण लगतच्या आगरवाडी व राक्षेवाडी येथील जिल्हा परिषदेच्या प्राथमिक शाळेत हा उपक्रम राबविण्यात आला. यावेळी नगरसेविका सुवर्णा राक्षे, ॲड. वर्षा शेवकरी, उद्योजक राहुल कांडगे, आरती परदेशी, स्वाती लेंडघर, साधना गोरे, पुनम शेवकरी, गुलाबराव शेवकरी, शशिकांत जाधव, मंगेश कांडगे, रणजीत जरे, अनिता घोगरे, हर्षद लेंडघर, रेश्मा मुटके, ॲड. प्रकाश गोरे, धीरज मुटके, योगेश राजापूरकर, अमर इंगळे आदींसह विविध क्षेत्रातील प्रतिष्ठित मान्यवर, ग्रामस्थ उपस्थित होते. चाकण नगरपरिषद हद्दीतील पठारवाडी व राक्षेवाडी शाळेतील गरजू विद्यार्थ्यांची नाजूक परिस्थिती पाहून त्यांना शालेय साहित्यांचे वाटप करून कांडगे यांनी समाजासमोर आदर्श ठेवला आहे. विद्यार्थ्यांच्या चेहऱ्यावर त्यामुळे आनंद फुलला होता. मनोहर मोहरे यांनी सर्वांचे स्वागत केले. योगेश राजापूरकर यांनी सूत्रसंचालन केले.

### उरुळी कांचनमध्ये अल्पवयीन मुलीचा विनयभंग; तिघांना अटक

उरुळी कांचन : दैनिक संध्या

शिंदवणे (ता. हवेली) परिसरात अल्पवयीन मुलीचा विनयभंग केल्याप्रकरणी तसेच मुलीच्या आई-वडिलांना मारहाण केल्याच्या आरोपावरून उरुळी कांचन पोलिसांनी तिघांना अटक केली आहे. ही घटना मंगळवार (ता. १८ ऑगस्ट) रोजी सायंकाळी साडेसहा वाजण्याच्या सुमारास ऋतु फार्मच्या पाठीमागील कामठे मळा परिसरात घडली. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, पीडित मुलीला तिच्या आईने दूध आणण्यासाठी दुकानात पाठवले होते. त्यावेळी मुलीने आईला आवाज दिल्यानंतर तिची आई घराबाहेर आली. तेव्हा मुलीजवळ तीन तरुण मोटारसायकलसह उभे असल्याचे दिसून आले. त्यापैकी एकाने मुलीचा हात धरल्याचे पोलिस तक्रारीत नमूद करण्यात आले आहे. मुलीच्या आईने संबंधित तरुणांना मुलीला त्रास का देता, अशी विचारणा केली असता तिघांनी मुलगी त्यांच्याशी बोलत नसल्याचे सांगितले. त्यानंतर तिघांनी मुलगी तसेच तिच्या आई-वडिलांना हाताने व लाथाबुक्क्यांनी मारहाण केल्याचा आरोप आहे. यावेळी एका आरोपीने वीट उचलून मुलीच्या आईच्या उजव्या पायाच्या नडगीवर मारल्याचे, तसेच मुलीच्या पोटात लाथ मारल्याचे तक्रारीत नमूद आहे. या प्रकरणी उरुळी कांचन पोलीस स्टेशनमध्ये बालकांचे लैंगिक अपराधांपासून संरक्षण अधिनियम २०१२ मधील कलम ८ व १२ नुसार विवीध कलमानुसार गुन्हा दाखल करण्यात आला आहे. या प्रकरणातील साहील विलास चौधरी, अविनाश आनंद शिंदे आणि अजिंक्य दिलीप सावंत या तिन्ही आरोपींना पोलिसांनी अटक केली आहे. गुन्ह्याचा तपास सहाय्यक पोलीस निरीक्षक पांडुरंग पवार करीत असून, उरुळी कांचन पोलीस स्टेशनच्या वरिष्ठ पोलीस निरीक्षक विजयमाला पवार यांच्या मार्गदर्शनाखाली पुढील तपास सुरू आहे.




### व्यसनमुक्ती केंद्रांना स्थानिक पोलीस प्रशासनाकडून संरक्षण पुरवावे

राजगुरुनगर : दैनिक संध्या

तरुणांमध्ये अमली पदार्थांच्या सेवनाचे प्रमाण वाढत चालले असून,अमली पदार्थांच्या आहारी गेल्यामुळे त्यांच्या शारीरिक व मानसिक आरोग्यावर, तसेच त्यांच्या कुटुंबावर आणि सामाजिक जीवनावर विपरीत परिणाम होत आहेत. अनेक वेळा अमली पदार्थांच्या सेवनातून भांडणे, वादविवाद आणि कायदा-सुव्यवस्थेचे प्रश्न निर्माण होतात. पुढे या घटनांचे रूपांतर गंभीर गुन्ह्यांमध्ये होण्याची शक्यता असते. त्यामुळे व्यसनाधीन तरुण हळूहळू गुन्हेगारी क्षेत्राकडे ओढले जाण्याचा धोका वाढतो. तरुण पिढीला अमली पदार्थांपासून दूर ठेवण्यासाठी जनजागृती, समुपदेशन आणि कुटुंबासह समाजाचा सक्रिय सहभाग आवश्यक आहे.असे मत रिपाइं श्रमिक ब्रिगेडचे पुणे जिल्हाध्यक्ष संतोषनाना डोळस यांनी व्यक्त केले. पोलीस अधीक्षक कार्यालय पुणे ग्रामीण भीमाशंकर भवन येथील व्यसनमुक्त जनजागृती अभियान मिशन परिवर्तन २०२६ अंतर्गत कार्यक्रमात डोळस बोलत होते. याबाबत डोळस यांनी लेखी निवेदन कोल्हापूर परिक्षेत्राचे विशेष पोलीस महानिरीक्षक रंजनकुमार शर्मा यांना समक्ष भेटून दिले या कार्यक्रमाचे आयोजन पोलीस अधीक्षक संदीपसिंह गिल्ल, पोलीस उपअधीक्षक अविनाश शिळीमकर यांच्या प्रमुख मार्गदर्शनाखाली समाज प्रबोधनार्थ करण्यात आले होते यामध्ये अनेक विविध व्यसनमुक्ती केंद्र चालकांनी उपस्थित राहून आपल्या भुमिका मांडून पोलीस प्रशासनाला सहकार्य करण्याचे आश्वासन दिले यावेळी डॉ.विजय मोरे,ॲड अर्चना किर्लोस्कर, समाजसेविका सुशिला मोरे यासह अनेक डॉक्टर,पोलीस अधिकारी,महीला वर्ग,पत्रकार मोठया प्रमाणात उपस्थित होते.

### आळंदीत खुनाचा गुन्हा अवघ्या तासाभरात उघड; आरोपी अटक

राजगुरुनगर : दैनिक संध्या

आळंदी : झोपण्याच्या जागेवरून झालेल्या वादातून लोखंडी सळईने डोक्यात, तोंडावर व पायावर मारहाण करून एका व्यक्तीचा खून करण्यात आल्याची घटना आळंदीत घडली. आळंदी पोलिसांनी या प्रकरणाचा अवघ्या तासाभरात तपास लावत आरोपीला अटक केली. बाबासाहेब उर्फ राहुल साहेबराव कांबळे (रा. लिंबाची वाडी, जि. बीड) असे खून झालेल्या व्यक्तीचे नाव आहे. याप्रकरणी अनंत दिगंबर तौर (रा. शेलगाव धडी, ता. माजलगाव, जि. बीड) याला पोलिसांनी अटक केली आहे. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, सोमवारी (दि. १७) रात्री साडेदहा वाजण्याच्या सुमारास आळंदीतील प्रदक्षिणा रोडवरील भाई मनोहर कोतवाल गोडी कामगार धर्मशाळा ट्रस्टच्या शेडमधील मोकळ्या जागेत ही घटना घडली. झोपण्याच्या जागेच्या कारणावरून आरोपी तौर आणि राहुल कांबळे यांच्यात वाद झाला. या वादातून तौर याने लोखंडी सळईने कांबळे यांच्या डोक्यावर, तोंडावर तसेच पायावर मारहाण केली.

# चुकीचा आराखडा लादून चाकण शहराचा गळा दाबू देणार नाही

■ चाकण (दै. संध्या)

चाकणच्या औद्योगिक बैठकीत उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी सदोष विकास आराखडा मंजूर करण्याचे दिलेले संकेत अमान्य आहेत. पीएमआरडीए प्रमाणे चाकणचाही आराखडा रद्द करून 'स्ट्रक्चरल प्लॅन' करण्यासाठी मंजुरी देण्याची गरज आहे. काही झालं तरी चुकीचा आराखडा लादून आम्ही चाकण शहराचा गळा दाबू देणार नाही, असा इशारा काँग्रेसचे प्रवक्ते ॲड. निलेश कड पाटील यांनी दिला आहे.

चाकण औद्योगिक क्षेत्रातील समस्यां बाबतच्या बैठकीत शासन दरबारी मंजुरीच्या टप्प्यात असलेला चाकणचा विकास आराखडा कधी मंजूर करणार? असा प्रश्न उपस्थित झाला असता, मात्र उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी 'मी तो मंजूर करतो' असे सांगितले. उपमुख्यमंत्र्यांच्या या भूमिकेला आमचा तीव्र विरोध आहे. या सदोष आराखड्याबाबत आम्ही प्रशासनाला लेखी निवेदन देऊनही त्याचे अद्याप कोणतेही उत्तर आलेले नाही. त्यामुळे हा त्रुटींनी भरलेला आणि चुकीचा आराखडा मंजूर करण्याचे उपमुख्यमंत्र्यांचे सुतोवाच आम्हांला कोणत्याही परिस्थितीत मान्य नाही," अशी आग्रही आणि आक्रमक भूमिका जिल्हा काँग्रेसचे प्रवक्ते ॲड. निलेश कड पाटील यांनी घेतली आहे.



तीन वर्षांपूर्वी म्हणजे दि.२ ऑक्टोबर, २०२३ रोजी याच सदोष विकास आराखड्या बाबत झालेल्या तीव्र आंदोलनाचा संदर्भ देत ॲड. निलेश कड यांनी शासनाच्या धोरणावर जोरदार प्रहार केला. कड म्हणाले, "सध्या शासन पातळीवर मंजुरीच्या अंतिम प्रक्रियेत असलेला चाकणचा विकास आराखडा अत्यंत सदोष आहे. जर हाच चुकीचा आराखडा मंजूर झाला, तर चाकणमधील स्थानिक नागरिकांच्या आणि शेतकऱ्यांच्या जमिनी मोठ्या प्रमाणावर 'लँड लॉक' होतील, आणि हे करण्याचे डाव पीएमआरडीए माध्यमातून होत आहे. कारण यापूर्वीच पीएमआरडीए यांनी चाकण व राजगुरुनगर नगरपरिषद हद्दवाढ प्रस्ताव मंजूर झाले तर खेड तालुक्यातील महसुल देणारी गावांची प्राधिकरणाला घट होईल हे लेखी दिले. त्यानंतर काही भांडवलदार यांनी प्रस्तावास विरोध करण्यासाठी काही राजकीय पुढारी यांना रसद दिली. परंतू आता नगरपरिषद सदोष विकास आराखडा मंजूर झाला तर यामुळे थेट चाकण शहराच्या नियोजनबद्ध विकासाला कायमची खिळ बसेल. त्यामुळे पीएमआरडीएचे वादग्रस्त प्रारूप आराखडे ज्याप्रमाणे रद्द करण्यात आले, तोच 'सम न्याय' चाकणलाही मिळाला पाहिजे. चाकण नगरपरिषदेचा शासन स्तरावर असलेला सदोष आराखडा तातडीने रद्द करून, येथे पीएमआरडीए प्रमाणे चाकण नगरपरिषदेस नवीन 'स्ट्रक्चरल प्लॅन' तयार करण्यास मंजुरी द्यावी. केवळ राजकीय घाईघाईत चुकीचा आराखडा लादून आम्ही चाकण शहराचा गळा दाबू देणार नाही."

"आमची शासनाकडे स्पष्ट मागणी आहे की, चाकण आणि परिसरातील १६ गावांचा समावेश करून नगरपरिषदेची प्रलंबित हद्दवाढ आधी तातडीने मंजूर करावी. हद्दवाढ झाल्यानंतर, जुना सदोष आराखडा बाजूला सारून चाकण नगरपरिषदेच्या माध्यमातूनच स्थानिक गरजांनुसार नवीन आणि सुधारित 'स्ट्रक्चरल प्लॅन' तयार केला पाहिजे. दिवंगत नेते अजित पवार यांनीही सन २०२३ मध्ये आमच्या आंदोलनाचे संदर्भाने विशेष बैठक घेऊन नगरपरिषद हद्दवाढ आणि सर्वसमावेशक विकास आराखड्याची गरज मान्य केली होती.

#### अंतिम निर्णय लालफितीत

तीन वर्षापूर्वी म्हणजेच दि.२४ ऑक्टोबर, २०२३ रोजी शासनाला हद्दवाढीचा प्रस्ताव पुन्हा सादर करूनही अद्याप अंतिम निर्णय लालफितीत अडकला आहे व हिच स्थिती चाकण औद्योगिक नगरी प्राधिकरण प्रस्तावाची देखील आहे.

#### मध्यस्थी करण्याची गरज

उपमुख्यमंत्री व पालकमंत्री सुनेत्रा पवार यांनी या प्रकरणात तातडीने मध्यस्थी करावी आणि मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे व नगरविकास राज्यमंत्री माधुरी मिसाळ यांच्याकडून चाकणचा सध्याचा सदोष आराखडा रद्द करून, नगरपरिषदेला नवीन स्ट्रक्चरल प्लान तयार करण्यासाठी शासन निर्देश द्यावेत," या मागणीवर ॲड. निलेश कड पाटील ठाम आहेत.

## चाकण येथील रक्तदान शिबिरात महिलांचा सहभाग




■ चाकण (दै. संध्या)

रक्ताचा तुटवडा भासू नये यासाठी नवयुग मित्र मंडळ व नगरसेवक मंगेश कांडगे मित्र परिवाराच्या वतीने चाकण येथे आयोजित करण्यात आलेल्या महारक्तदान शिबिरात तरुणांसह महिलांनी भाग घेऊन एकूण अडीचशे जणांनी रक्तदान केले. मोरया रक्तपेढीच्या सहकार्याने येथील श्री खंडोबा मंदिरात या शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. चाकण नगरपरिषदेच्या नगराध्यक्षा मनिषा गोरे, उपनगराध्यक्षा जयश्री नायकवाडी व गटनेते नितीन गोरे यांच्या हस्ते या शिबिराचा शुभारंभ करण्यात आला. याप्रसंगी शिवसेनेचे चाकण शहर प्रमुख महेश शेवकरी, नगरसेवक ॲड. प्रकाश गोरे, मंगेश कांडगे, शशिकांत जाधव, अनिल सोनवणे, रूपाली कांडगे, रक्तदात्यांचा यावेळी शाल, श्रीफळ, पुष्पगुच्छ व प्रमाणपत्र देऊन गौरव करण्यात आला. अपघातग्रस्तांना व गरजूंना तातडीने रक्ताचा पुरवठा करता यावा, आणि यातून रुग्णाचे प्राण वाचले जावेत, हा हेतू डोळ्यासमोर ठेवून चाकण नगरपरिषद हद्दीतील प्रभाग क्रमांक नऊ मध्ये असलेल्या खंडोबा मंदिरात या शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. या रक्तदान शिबिरात जास्तीत जास्त रक्त संकलित करण्याचा निर्धार नवयुग मित्र मंडळाच्या कार्यकर्त्यांनी केल्याने शितल कांडगे व पुनम गुप्ता या महिलांसह एकूण अडीचशे जणांनी रक्तदान केले. रक्तदात्यांनी उत्स्फूर्तपणे रक्तदान करण्याचे आवाहन नगरसेवक मंगेश कांडगे, महिला व बालकल्याण समितीच्या सभापती रुपाली कांडगे, नगरसेविका आरती परदेशी, माजी उपनगराध्यक्षा सुवर्णा राक्षे, उद्योजक राहुल कांडगे, प्रीतम परदेशी, शिवसेनेचे चाकण शहर प्रमुख महेश शेवकरी, विशाल नायकवाडी, शशिकांत जाधव, स्मिता जाधव आदींनी केले होते.

## कलाशिक्षक कार्यशाळा उत्साहात संपन्न

■ चाकण (दै. संध्या)

पुणे जिल्हा परिषद माध्यमिक शिक्षण विभाग, पुणे जिल्हा मुख्याध्यापक संघ आणि पुणे जिल्हा कलाशिक्षक संघ यांच्या संयुक्त विद्यमाने पुरंदर तालुका कलाशिक्षक संघाच्या संयोजनाने जिल्हास्तरीय एकदिवसीय कलाशिक्षक कार्यशाळेचे आयोजन आचार्य अत्रे सांस्कृतिक भवन, सासवड येथे उत्साहात करण्यात आले.

कार्यशाळेचे उद्‌घाटन महाराष्ट्र राज्य कलाशिक्षण मंडळाच्या सचिव स्मिता किंकाळे यांच्या हस्ते झाले. यावेळी महाराष्ट्र राज्य कला शिक्षक महासंघाचे राज्य उपाध्यक्ष किरण सरोदे, जिल्हाध्यक्ष मिलिंद शेलार, महाराष्ट्र राज्य मुख्याध्यापक संघाचे सचिव प्राचार्य नंदकुमार सागर, विभागीय उपाध्यक्ष अशोक साबळे, कलाशिक्षक संघाचे संस्थापक अध्यक्ष हुसेन खान (चाचा), जिल्हा सचिव वाहिद खान, सोपान तावरे, अभिनेत्री माधवी जुवेकर, हास्यसम्राट फेम दीपक देशपांडे यांच्यासह विविध क्षेत्रांतील मान्यवर उपस्थित होते.

उद्‌घाटनप्रसंगी अभिनेत्री माधवी जुवेकर यांना 'कलाभूषण पुरस्कार', हास्यसम्राट फेम दीपक देशपांडे यांना 'कला गौरव पुरस्कार', राज्यस्तरीय नाट्य समीक्षक प्रकाश खोत यांना 'विशेष कला सन्मान', तर मिलिंद शेलार यांना 'कलामहर्षी पुरस्कार' देऊन गौरविण्यात आले. कार्यशाळेत कलाशिक्षकांसाठी स्मरणचित्र, स्थिरचित्र आणि शिल्पकला या विषयांवर तज्ज्ञांकडून प्रत्यक्ष प्रात्यक्षिके सादर करण्यात आली. तसेच 'एआय आणि कलाशिक्षक' या विषयावर मार्गदर्शन करण्यात आले. इयत्ता सहावीच्या नवीन कला अभ्यासक्रमाविषयी अभ्यासक्रम समितीचे तज्ज्ञ बाळासाहेब गोतारणे यांनी मार्गदर्शन केले. कार्यशाळेच्या अंतिम सत्रात जिल्ह्यातील प्रत्येक तालुक्यातून निवड झालेल्या दोन कलाशिक्षकांना 'जिल्हास्तरीय गुणवंत कलाशिक्षक पुरस्कार' प्रदान करून गौरविण्यात आले. सासवड नगरपरिषदेच्या अध्यक्षा आनंदीकाकी जगताप, नंदकुमार सागर, किरण सरोदे आणि मिलिंद शेलार यांच्या हस्ते पुरस्कार वितरण करण्यात आले.

## पुरंदरमधून ५०० हून अधिक युवक-युवती 'छात्रोंकी गुंज' कार्यक्रमात सहभागी होणार : झुरंगे

■ पुरंदर (दै. संध्या)

युवक, युवती, शेतकरी, कामगार तसेच सर्वसामान्य नागरिकांच्या विविध प्रश्नांना वाचा फोडून ते प्रश्न केंद्र व राज्य शासनापर्यंत पोहोचविण्यासाठी काँग्रेस पक्षाच्या वतीने पुणे येथे विशेष कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे. या कार्यक्रमात पुरंदर तालुक्यातून ५०० पेक्षा अधिक युवक-युवती सहभागी होणार असल्याची माहिती पुणे जिल्हा परिषदेचे माजी सदस्य तथा काँग्रेसचे नेते दत्तात्रय मारुती झुरंगे यांनी दिली.

काँग्रेस पक्षाचे राष्ट्रीय नेते तथा लोकसभेतील विरोधी पक्षनेते यांच्या प्रमुख उपस्थितीत २२ ऑगस्ट रोजी पुणे येथे 'छात्रोंकी गुंफ' हा कार्यक्रम आयोजित करण्यात आला आहे. एस.एस. पी.एम.एस. कॉलेज ग्राउंड, आरटीओ कार्यालयाशेजारी, शिवाजीनगर, पुणे येथे हा कार्यक्रम होणार आहे. युवक-युवती, विद्यार्थी, शेतकरी व कामगारांच्या प्रश्नांकडे शासनाचे लक्ष वेधणे, त्यांच्या समस्या संबंधित यंत्रणांपर्यंत पोहोचविणे तसेच युवकांच्या भविष्यासंदर्भातील विविध मुद्द्यांवर चर्चा करणे, हा या कार्यक्रमाचा प्रमुख उद्देश असल्याचे झुरंगे यांनी सांगितले.

पुरंदर तालुक्यातील विविध गावांमधील युवक-युवतींशी संपर्क साधण्यात आला असून, आतापर्यंत ५०० पेक्षा अधिक युवक-युवतींनी कार्यक्रमाला उपस्थित राहण्याची तयारी दर्शविली आहे. याशिवाय आणखी अनेक युवक-युवती कार्यक्रमात सहभागी होण्यासाठी संपर्क साधत आहेत.

#### युवक-युवतींनी मोठ्या संख्येने सहभागी व्हावे

पुरंदर तालुक्यातील ज्या युवक-युवतींना या कार्यक्रमात सहभागी व्हायचे आहे, त्यांनी कार्यक्रमास उपस्थित राहावे, असे आवाहन दत्तात्रय झुरंगे यांनी केले आहे. सहभागी होणाऱ्या युवक-युवतींसाठी पुणे येथे जाण्या-येण्यासाठी आवश्यक वाहतूक व्यवस्था करण्यात येणार असल्याचेही त्यांनी स्पष्ट केले.

> युवकांच्या प्रश्नांना संघटितपणे व्यासपीठ मिळावे आणि त्यांच्या समस्या शासनाच्या निदर्शनास याव्यात, यासाठी पुरंदरमधून जास्तीत जास्त युवक-युवतींनी या कार्यक्रमात सहभागी व्हावे, असेही झुरंगे यांनी आवाहन केले.
>
> - दत्तात्रय मारुती झुरंगे माजी सदस्य, पुणे जिल्हा परिषद,

## उरुळी कांचनमध्ये बँकेसमोरून वृद्ध शेतकऱ्याची एक लाखांची रोकड लंपास

■ उरुळी कांचन (दै. संध्या)

उरुळी कांचन (ता. हवेली) येथे सनमित्र बँकेसमोर मोटारसायकलच्या हँडलला अडकवलेल्या पिशवीतून अज्ञात चोरट्याने तब्बल १ लाख रुपयांची रोकड आणि महत्त्वाची बँकिंग व विमा कागदपत्रे चोरून नेल्याची घटना बुधवारी (ता. १९ ऑगस्ट) दुपारी घडली. याप्रकरणी उरुळी कांचन पोलीस ठाण्यात अज्ञात चोरट्याविरुद्ध चोरीचा गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, नाना बाबुराव गायकवाड (वय ६०, रा. बोरीऐंदी, ता. दौंड) हे १९ ऑगस्ट रोजी दुपारी साडेबारा ते १.२० वाजण्याच्या सुमारास उरुळी कांचन गावच्या हद्दीत सनमित्र बँकेसमोर आले होते. त्यांनी आपली स्प्लेंडर मोटारसायकल (क्र. MH-42-BA-7857) उभी केली होती. मोटारसायकलच्या डाव्या बाजूच्या हँडलला राखाडी रंगाची पिशवी अडकवण्यात आली होती. याच पिशवीमध्ये ५०० रुपयांच्या २०० नोटा म्हणजेच १ लाख रुपयांची रोकड, तसेच कुटुंबातील सदस्यांच्या नावावरील सनमित्र बँकेची एफडी प्रमाणपत्रे, चेकबुक, आरडी व एसबी खात्यांची पुस्तके, एलआयसीच्या पावत्या आणि विविध बँक खात्यांची पासबुक व चेकबुक ठेवण्यात आली होती. अज्ञात व्यक्तीने संधी साधून ही पिशवी चोरून नेल्याचे फिर्यादीत नमूद करण्यात आले आहे. घटनेनंतर गायकवाड यांनी उरुळी कांचन पोलीस ठाण्यात तक्रार दाखल केली. उरुळी कांचन पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

या चोरीचा तपास सहाय्यक फौजदा ररमेश भोसले करीत असून, गुन्हा दाखल करण्याची कार्यवाही पोलीस हवालदार चौधर यांनी केली. वरिष्ठ पोलीस निरीक्षक विजयमाला पवार यांच्या मार्गदर्शनाखाली पोलिसांकडून अज्ञात चोरट्याचा शोध चालु असुन पुढील तपास पोलीस करीत आहेत.

# चाकणला नवसह्याद्री चॅरिटेबल ट्रस्टतर्फे एक हजार वृक्षारोपणाचा संकल्प

■ चाकण (दै. संध्या)

येथील नवसह्याद्री चॅरिटेबल ट्रस्टच्या स्व. भागुबाई पिंगळे कला, वाणिज्य व विज्ञान रात्र महाविद्यालयात एक हजार वृक्षारोपणाचा संकल्प करण्यात आला. सहाय्यक धर्मदाय आयुक्त यांनी नवसह्याद्री चॅरिटेबल ट्रस्ट पुणे यांना केलेल्या सूचनेनुसार झाडे लावण्याचा उपक्रम हाती घेण्यात आला. संस्थेचे अध्यक्ष डॉ. निवृत्ती पिंगळे यांच्या मार्गदर्शनाखाली हा संकल्प करण्यात आला. या उपक्रमांतर्गत नवसह्याद्री चॅरिटेबल ट्रस्टच्या कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, अध्यापक महाविद्यालय, इन्स्टिट्यूट ऑफ बिजनेस मॅनेजमेंट व रिसर्च कॉलेज, कै. निर्मलाताई पिंगळे विधी महाविद्यालय, निर्मला पिंगळे इन्स्टिट्यूट ऑफ इंजिनिअरिंग अँड मॅनेजमेंट कॉलेज, इन्स्टिट्यूट ऑफ मॅनेजमेंट सायन्स कॉलेज, कै भागूबाई पिंगळे विधी महाविद्यालय आदी ठिकाणी आंबा, फणस, जांभूळ, चिंच, आवळा, साग, कडूलिंब अशी एकूण एक हजार झाडे लावली जाणार आहेत. या अभियानाची सुरुवात चाकण येथील कॅम्पसमध्ये एकाच दिवसात ४५० झाडे लावून करण्यात आली. याप्रसंगी चाकण नगरपरिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ. अंकुश जाधव, चाकण वनपरिक्षेत्र अधिकारी संतोष कंक, महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. बाळकृष्ण झावरे, सचिव डॉ. शीतल टिळेकर, समन्वयक ज्ञानेश्वर दुधवडे, माजी नगराध्यक्ष शेखर घोगरे, उपप्राचार्य संतोष बुट्टे आदींसह विविध क्षेत्रातील प्रतिष्ठित मान्यवर, ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.

